

मासिक वार्तापत्र • अंक 29 • सप्टेंबर 2022 • सहयोग मूल्य - रु. 10 • 16 पाने

# कामगार बिगुल

**नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक**

स्वातंत्र्यदिनी भाजप सरकारकडून बलात्कारी-खुन्यांची सुटका! 3

'हर घर तिरंगा'चे संघ-भाजपचे ढोंग ओळखा! 4

आरे मेट्रो प्रकल्प: भाजपचा आणखी एक घोटाळा! 12

## तिसरी आघाडी, प्रादेशिक पक्ष, समाजवादी कडबोळे, सर्वधर्मसमभावाबद्दलचे भ्रम सोडा!

## उदारवाद, समाजवाद नव्हे तर कामगारवर्गीय क्रांतिकारी पर्यायच फॅसिझमला टक्कर देऊ शकतो!

## भांडवलदार वर्गाच्या प्रतिनिधींचा नाही, तर कामगार वर्गाचा स्वतंत्र पर्याय उभा करा!

**संपादक मंडळ**

मोदी सरकारच्या 8 वर्षांमधील निरंकुश कारभारामुळे देशातील बहुसंख्य जनता नागवली जात असताना, महागाई, बेरोजगारी, गरिबी नवनवे उच्चांक गाठत असताना, देशातील "भाजप"ला विरोध करणाऱ्या उदारवाद्यांना टवटवी आणणाऱ्या घटना घडत आहेत. बिहारमध्ये जनता दल (युनायटेड) चे मुख्यमंत्री नितिश कुमार यांनी भाजपला "चकवा" देत, भाजपसोबत असलेली युती तोडून, लालू-प्रसाद यादव आणि त्यांचा मुलगा तेजस्वी यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलासोबत हातमिळवणी केली आहे आणि नवीन सरकार बनवले आहे. सोबतच काँग्रेसने "भारत जोडो यात्रा" सुरू केली आहे. या घडामोडींमुळे पुन्हा एकदा उदारवाद्यांना अचानक भरते आले आहे की आता भाजपला आह्वान उभे राहणे सुरू झाले आहे!

फॅसिझमच्या संपूर्ण परिघटनेला फक्त निवडणुकीच्या राजकारणापुरते मर्यादित करणाऱ्या, येनकेन-प्रकारेण भाजपला सत्तेतून कसे हटवता येईल याचीच खलबते करणाऱ्या, कोणते तरी बेरजेचे-वजाबाकीचे राजकारण करून भाजपला सत्तेबाहेर कसे ठेवता येईल याचाच विचार करणाऱ्या उदारवाद्यांकडून दुसरी अपेक्षाही केली जाऊ शकत नाही. महाराष्ट्रामध्ये भाजपने शिवसेनेला "फसवून" ज्याप्रकारे शिंदे-गटासोबत सरकार बनवले आहे, त्यामुळे शिवसेनेचे फॅसिस्ट वास्तव नजरेआड करणाऱ्या अशा अनेक उदारवाद्यांचा हिरमोड झाला होता, आणि आता नितिश कुमारने भाजपला त्यांच्याच पद्धतीने चितपट केले या भावनेतून उदारवादी मंडळी पुन्हा प्रफुल्लित झाली आहेत. त्याचवेळी काँग्रेस पक्षाने राहुल गांधींच्या नेतृत्वात काढलेल्या "भारत जोडो" यात्रेमुळे सुद्धा उदारवाद्यांचा एक गट आशावादी बनला आहे की आता देशातील भाजप-विरोधक सगळे एकत्र येतील आणि फॅसिझमला पर्याय उभा राहणे चालू होईल.

समाजवादी, तिसरी आघाडी वा काँग्रेस यांच्याबद्दल आशा निर्माण करणारी ही सर्व लोकं ना फक्त कामगार वर्गाला आणि कामकरी जनतेला भरकटवत आहेत, तर उलट फॅसिझमशी लढण्याच्या रणनितीच्या मार्गातील एक मुख्य अडथळा सुद्धा आहेत. नितिश कुमारांसारखे सर्व सामाजिक-जनवादी (समाजवादी) फॅसिझमशी लढणे दूरच, उलट त्यांचे दीर्घकालिक साथीदार राहीले आहेत. दुसरीकडे या समाजवाद्यांनी आणि मुख्यत्वे काँग्रेसने सतत लागू केलेली भांडवली धोरणेच फॅसिझमच्या वाढीसाठी पोषक वातावरण निर्मिती करण्यात सहाय्यक ठरली आहेत. याकरिता अगोदर नितिश कुमारांचे, आणि नंतर सर्वच समाजवादी राजकारणाचे संधीसाधू, भांडवलधार्जिणे राजकारण आणि सर्वधर्मसमभावी, उदारवादी राजकारणाच्या मर्यादा समजणे आवश्यक आहे.

### नितिशच्या कोलांटउड्या

नितिश कुमारांच्या राजकारणाचा संपूर्ण इतिहासच भाजपसोबत संधीसाधू युत्यांचा इतिहास आहे. समाजवादी आणि प्रादेशिक पक्षांच्या संदर्भात ही एक सामान्य बाब आहे, परंतु हा इतिहास समजण्याकरिता नितिश कुमार एक जास्त नमुनेदार उदाहरण असल्यामुळे त्यांचा इतिहास अगोदर थोडा तपशीलात पाहूयात.

पान 6 वर

## संघ-भाजपचे खरे चरित्र ओळखा!

## कामगारविरोधी, स्त्री-विरोधी, जातीयवादी, दहशतवादी, भ्रष्टाचारी, दुतोंड्या फॅसिस्टांचा पर्दाफाश करा!

## काल काँग्रेस, आज भाजप: भांडवलदार वर्गाचा चेहरा बदललाय, चरित्र नाही!

**✍अभिजित**

जनतेचा मोठा हिस्सा अत्यंत बेहाल असताना स्वातंत्र्याच्या 75 वर्षांचा 'अमृत' महोत्सव साजरा करण्याचा उन्माद निर्माण करणारे, गेल्या 8 वर्षांपासून सत्तेत असलेले मोदी सरकार, त्याची पितृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघाने पोसलेल्या विविध संघटना सतत देशभक्तीचे सर्टीफिकेट वाटताना दिसून येतात आणि सर्वाधिक नैतिकता, तत्त्वे यांचा बुरखा पांघरून असतात. परंतु "सबका साथ, सबका विकास" "बेटी बचाओ" सारखे नारे देणाऱ्या, सर्व हिंदूंच्या एकतेचा सतत घोष करणाऱ्या, दहशतवादाला सतत मुद्दा बनवणाऱ्या आणि सतत पूर्वीच्या सरकारांनी केलेल्या भ्रष्टाचाराबद्दल बोलणाऱ्या या दुतोंड्या फॅसिस्टांचे कामगार विरोधी, स्त्री-विरोधी, जातीयवादी, दहशतवादी, भ्रष्टाचारी चरित्र नागडे होऊन समोर उभे आहे. भाजपचे समर्थक असलेल्या भांडवलदारांच्या प्रसारमाध्यमांच्या अवाढव्य शक्तीला तोंड देत, आज जनतेच्या हिमतीवर चालणाऱ्या प्रसारमाध्यमांना उभे करून सत्ताधाऱ्यांचे हे चरित्र उघडे पाडणे आपले कर्तव्य बनले आहे.

### कामगार-विरोधी भाजप

आजवर लागू असलेले सर्व तकलादू कामगार कायदे मोडीत काढून मोदी सरकारने दीड वर्षांपूर्वी नवीन 4 कामगार कायदे बनवले आहेत, जे कंत्राटीकरण, कधीही कामावरून काढणे, मजुरीला अजून खाली घसरवणे, संघटित होण्यात अधिक अडथळे निर्माण करणारे, कायद्यापुढे दाद मागणे अधिक कठीण करणारे, मातृत्व रजा मिळवणे अवघड करणारे, कामगार सुरक्षेच्या तरतूदी ढिले करणारे कायदे, बालमजुरीला प्रोत्साहन देणारे आहेत. या कायद्यांची अंमलबजावणी जनक्षोभाच्या अंदाजातील कमतरतांमुळे आणि भांडवलदार वर्गातील मतभेदांचे निराकरण न झाल्यामुळे मोदी सरकारने अजून केलेली नसली, तरी ती येत्या काही काळात सुरु होणारच आहे.

आज कामगारांची सर्वात प्रमुख मागणी बनते ती कायमस्वरूपी रोजगाराची आणि सन्मानजनक किमान वेतनाची. या दोहोंनाही फाट्यावर मारत मोदी सरकारने सरकारी नोकऱ्यांमध्ये अभूतपूर्व कपात केलीच आहे, इथवर की आता सैनिक भरती सुद्धा कंत्राटी पद्धतीने आणि कमी संख्येने केली जाणार आहे. देशामध्ये बेरोजगारीचा दर गेला बराच काळ सतत 6 ते 8टक्क्यांपर्यंत आहे. बेरोजगारीची स्थिती इतकी अभूतपूर्व आहे की गेल्या 8 वर्षांमध्ये 22 कोटी लोकांनी सरकारी नोकरीकरिता अर्ज केले, ज्यापैकी फक्त 7.22 लाख लोकांना रोजगार मिळाला, म्हणजे फक्त 0.32 टक्के लोकांना! ही झाली सुशिक्षित बेरोजगारांची स्थिती.

पान 14 वर

# मोदीने ओतले महागाईच्या आगीत तेल! आता अन्नधान्यावर सुद्धा जी.एस.टी.!

पान 9 वरून

अशा सर्व गोष्टींचा करप्रणालीत समावेश करत आहे ज्या पूर्वी नव्हत्या. जनतेचं शोषण कायम आहे फक्त शोषणाची नावं बदलली जात आहेत.

एकीकडे नाममात्र मजुरीद्वारे पिळवणूक आणि दुसरीकडे महागाईचा मार! अशाप्रकारच्या लुटीमुळे जागतिक भूक निर्देशांक 2021 नुसार 2017 मध्ये 116 देशांच्या रांगेमध्ये 94 व्या स्थानी असणारा भारत या वेळी 101 व्या स्थानावर घसरला आहे. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ हे शेजारी देशही ह्याबाबतीत भारतापेक्षा बऱ्या स्थितीत आहेत. एकीकडे भारताला जगभरातील सर्वाधिक उपाशी असलेल्यांचा देश म्हटलं गेलं तर दुसरीकडे अन्न धान्य आणि खाद्यपदार्थांवर कर लावून जनतेच्या ताटातील उरली सुरली कोरडी चटणी, भाकरी देखील मोदी सरकारने हिसकावून घेतली आहे आणि जनतेला उपाशी मरण्यासाठी सोडून दिले आहे.

### जनतेचा पैसा, भांडवलदारांच्या घशात

देशात सामान्य कष्टकरी जनतेच्या तोंडातील घास हिसकावून तो भांडवलदारांच्या तिजोऱ्या भरण्याकडे वळवला जातो. म्हणूनच गौतम अडानी जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक श्रीमंत भांडवलदार बनतो ज्याने सरकारच्या कृपेने बँकांकडून घेतलेल्या कर्जातूनच उद्योगाचा डोलारा उभारला आहे! सरकारने दिलेले हे कर्ज म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून भारतातील सामान्य, कष्टकरी जनतेने उठता - बसता सरकारी तिजोरीत जमा केलेला अप्रत्यक्ष कर आहे! याचकरिता अप्रत्यक्ष कराचा बोजा सतत सामान्य जनतेवर वाढवून भांडवली सरकारं त्यांच्या मालकांच्या तिजोऱ्या भरण्यात नेहमी पुढे असतात.

भाजपा, काँग्रेस, शिवसेना, आम आदमी पार्टी, इत्यादी सर्वच भांडवली निवडणूकबाज पक्ष जनतेला लुटून आलेली रक्कम, करांमध्ये दिली जाणारी सूट, कर्ज ह्या स्वरूपांत भांडवलदार, बिल्डर, ठेकेदारांच्या घशात ओततात. ह्या कराच्या पैशांतून गरीब, कष्टकरी जनतेला मोफत आणि दर्जेदार शिक्षण, आरोग्य व्यवस्था, दळणवळणाच्या सुविधा, रोजगाराच्या संधी, पिण्याचे पाणी, रस्ते, इत्यादी मूलभूत सुविधा न देता जनतेला सर्व हक्क आणि अधिकारांपासून वंचित ठेवतात.

अन्न ही माणसाची अत्यंत मूलभूत गरज आहे. अत्यंत कष्टाने अन्नधान्य पिकवणारे शेतमजूर, अन्नधान्याच्या गोण्या स्वतःच्या पाठीवर वाहणारे कामगार, शेतात अन्न पिकल्यापासून ते आपल्या ताटात ते अन्न वाढले जाई पर्यंत असंख्य कामगार-कष्टकऱ्यांचे श्रम त्यात लागलेले असते. त्याच कष्टकऱ्यांना आज दोन वेळची पोटाची खळगी भरणे अशक्य झाले आहे. सरकारचे अन्न धान्यासारख्या मूलभूत मानवी गरजेवर कर आकारणे म्हणजे गरीब, कष्टकरी जनतेकडून त्यांचा जगण्याचा अधिकार हिसकावून घेणे आहे. नफाकेंद्री भांडवलशाही व्यवस्थेच्या मजबूत खांबाचे काम करणाऱ्या सर्वच भांडवली सरकारांचे, जनतेला लूटण्यात पहिल्या क्रमांकावर असलेल्या भाजपा सरकारचे चरित्र आपल्याला ओळखून, त्यांना सर्वांसमोर उघडे करण्याचे काम आपल्याला हाती घ्यावेच लागेल!

## कामगार बिगुलच्या दरवाढीबद्दल

**साथींनो, कामगार बिगुलची किंमत जून 2022 च्या अंकापासून रु. 10 करण्यात येत आहे.**

भांडवली वर्तमानपत्रे भांडवलदारांनी दिलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जाहिरातींच्या माध्यमातून आपल्या अंकाची किंमत कमी ठेवतात आणि बदल्यात भांडवलदार वर्गाचे गोडवे गातात. कामगार वर्गाचे वर्तमानपत्र मुख्यत्वे फक्त कामगार वर्गाने दिलेल्या निधीतूनच चालू शकते. कामगार बिगुल करिता लेखन करणारे सर्व लेखक, पत्रकार आणि याच्या छपाईपासून ते वितरणापर्यंत कामात सामील होणारे विविध कामगारवर्गीय कार्यकर्ते हे सर्व काम विनामोबदलाच करत आलेत, आणि कामगार वर्गीय राजकारणाच्या प्रचाराचे काम असेच झालेही पाहिजे. परंतु छपाई आणि वितरणासारखे खर्च मात्र करावेच लागतात. गेली 7 वर्षे अंकाची किंमत रु. 5 होती. गेल्या जवळपास दोन वर्षांपासून अंक छपाईची किंमत रु. 5 च्या वर गेली होती आणि फक्त कामगारवर्गाने दिलेल्या अतिरिक्त सहयोगाच्या जोरावरच कामगार बिगुलचे अंक छापले जात होते. परंतु गेल्या वर्षभरात इतर सर्व महागाईसोबतच कागद, छपाई आणि वितरणाच्या खर्चाने सुद्धा सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत आणि अंकाची किंमत नाईलाजाने रु. 10 करावी लागत आहे. कामगार बिगुलच्या नियमित वाचकांना आणि सहयोगीदारांना आवाहन आहे की जर जनतेचा पर्यायी मीडीया उभ्या करण्याच्या, कामगार वर्गाच्या क्रांतिकारी वर्तमानपत्राच्या गरजेला आपण समजत असाल तर कामगार बिगुलला जास्तीत जास्त आर्थिक सहयोग नक्की करावा. भांडवलदारांनी दिलेल्या निधीवर नव्हे, तर जनतेच्याच जोरावर आजपर्यंत कामगार बिगुल प्रसिद्ध होत आहे, आणि आम्हाला विश्वास आहे की आपल्या साथीने यापुढेही होत राहील.

### बिगुल व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअ‍ॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल जॉईन करावा :**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा : 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

साथींनो

‘कामगार बिगुल’ आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

•रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर : 74992 64646

• पुणे : 8669735643

## ‘कामगार बिगुल’चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. ‘कामगार बिगुल’ व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. ‘कामगार बिगुल’ भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. ‘कामगार बिगुल’ स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. ‘कामगार बिगुल’ कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकवून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. ‘कामगार बिगुल’ सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. ‘कामगार बिगुल’ हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# स्वातंत्र्यदिनी भाजप सरकारकडून बलात्कारी-खुन्यांची सुटका!

## बलात्काऱ्यांचे सत्कार: हेच आहे संघाचे हिंदुराष्ट्र

✍ राहुल

गुजरात दंगलींमध्ये गर्भवती असलेल्या बिल्किस बानो या महिलेवर बलात्कार करणाऱ्या आणि तिच्या कुटुंबातील 7 जणांची हत्या करणाऱ्या 11 गुन्हेगारांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या सर्व बलात्काऱ्यांना-खुन्यांना गुजरातमधील भाजप सरकारने त्यांची शिक्षा पूर्ण होण्या अगोदरच गोध्रा तुरुंगातून मुक्त केले आहे. 15 ऑगस्ट 2022 रोजी या सर्वांची सुटका करण्यात आली. भाजप सरकारने नेमलेल्या एका समितीने एकमताने हा निर्णय घेतला. गुजरातच्या गृह मंत्रालयाचे मुख्य सचिव प्रेम कुमार यांनी सांगितले की "वय, गुन्ह्याचे स्वरूप आणि तुरुंगातील त्यांचे वर्तन" लक्षात घेता ही सुटका केली गेली आहे. सुटका झाल्यानंतर या गुन्हेगारांचा हार-तुरे देऊन सत्कार करण्यात आला आणि मिठाई वाटली गेली! हे सत्कार करणारे आणि मिठाई वाटणारे कोण आहेत? "बेटी बचाव" चा नारा देणाऱ्या मोदी सरकारचे स्त्री-विरोधी, अपराधी,गुन्हेगारी चरित्र या निर्णयाने पुन्हा एकदा समोर आले आहे.

गुजरातमध्ये 2002 साली करवल्या गेलेल्या सुनियोजित दंगलीमध्ये हजारो मुस्लिमांची हिंदुत्ववादी धर्मांधांनी हत्या केली. या दंगलींमध्ये फक्त मूक दर्शक बनून नव्हे तर सक्रियपणे पोलिस दलाला सुद्धा कामाला लावून तत्कालिन मोदी सरकारने रसद पुरवली. अनेक गावांमध्ये मुस्लिमांची घरे जाळली गेली. अशाच एका घटनेमध्ये बिल्किस बानोच्या गावामध्ये सुद्धा मुस्लिमांवर हल्ले झाले. बिल्किस, तिची 3 वर्षांची मुलगी, आणि तिच्या घरातील 15 लोक जीव मुठीत धरून गाव सोडून पळाले. 3 मार्च 2002 रोजी छप्परवाड या गावामध्ये त्यांच्यावर 20-30 जणांनी हल्ला केला. बिल्किस, त्यांची आई, आणि इतर तीन महिलांवर निर्घृण बलात्कार केला गेला. हल्ल्यामध्ये फक्त बिल्किस, तिची 3 वर्षांची मुलगी आणि एक अजून व्यक्ती बचावले. एका आदिवासी महिलेकडून कपडे घेऊन बिल्किस लिमखेडा पोलिस चौकीपर्यंत पोहोचली आणि तिथेही तिची तक्रार अत्यंत कुचकामी पद्धतीने नोंदवली गेली. अत्यंत झुंझार संघर्ष आणि चिवट प्रयत्नांती तिच्या तक्रारीची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने आणि सर्वोच्च न्यायालयाने घेतली आणि सी.बी.आय. कडे चौकशी दिली. सी.बी.आय. ने निष्कर्ष काढला की चौकशी दाबली गेली होती, इथपर्यंत की मृतदेहांची ओळख पटू नये म्हणून शवविच्छेदनानंतर त्यांची मुंडकी सुद्धा काढून टाकली गेली होती. गुजरातमध्ये या प्रकरणाची निष्पक्ष सुनावणी सुद्धा होऊ शकत नाही हे दिसल्यावर ही केस मुंबईमध्ये कोर्टाकडे नेली गेली. 6 पोलिस अधिकारी, 1डॉक्टर, यांच्यासह 19 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. 6 वर्षांनंतर 2008 मध्ये 11 जणांना आयुष्यभरासाठी जन्मठेपेची शिक्षा सुनावली गेली. यामध्ये हेड कॉंस्टेबलला सुद्धा पुरावे बिघडवण्याच्या आरोपाखाली शिक्षा झाली. बलात्कार, खून, आणि इतर गुन्हे साबित झाले. 7 जणांना शिक्षा झाली नाही. जसवंतभाई नाई, गोविंदभाई नाइ, नरेश कुमार मोर्ढिया (आता मृत), यांनी बिल्किसवर बलात्कार केला, शैलेश भाई भट याने तिच्या मुलीचे डोके जमिनीवर आपटून खून केला असे आरोप सिद्ध झाले. राधेश्याम शाह, बिपिन चंद्र जोशी, केसरभाई वोहानिया, प्रदीप वोहानिया, बकभाई वोहानिया, राजुभाई सोनी, नितेश भट, रमेश चंदना, आणि पोलिस कॉंस्टेबल सोमाभाई गोरी यांनाही शिक्षा झाली. 2017 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने सुद्धा शिक्षा कायम ठेवली. 2019 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने बिल्किसला 50 लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी असा निर्णय दिला.

### न्यायालयाने भाजप सरकारला दिला आधार

या गुन्हेगारांना शिक्षा मुंबईतील कोर्टाने आणि मुंबई उच्च न्यायालयाने दिली होती. अशामध्ये 14 वर्षे पूर्ण झाल्यावर गुन्हेगारांपैकी एक राधेश्याम शाह याने गुजरात उच्च न्यायालयात उरलेली शिक्षा माफ करण्याची दाद मागितली. गुजरात उच्च न्यायालयाने शेरा दिला की महाराष्ट्र सरकार यावर निर्णय घेऊ शकते, ना की गुजरात सरकार. यावर शाह यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असता सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला यावर निर्णय घेण्यास सांगितले. यानुसार गुजरातमधील भाजप सरकारने सुजल मयत्रा या अधिकाऱ्याच्या नेतृत्वात समिती बनवली, जिने शिक्षा माफ करण्याचा निर्णय घेतला.

गुजरातमध्ये 1992 मध्ये शिक्षा माफीचे एक धोरण अस्तित्वात होते. त्यानंतर 2014 साली दुसरे धोरण बनवण्यात आले, ज्यानुसार बलात्काराच्या गुन्ह्याबद्दल कडक पवित्रा घेतला गेला. परंतु या गुन्हेगारांना शिक्षा 2008 मध्ये झाली आहे अशी नोंद घेत सर्वोच्च न्यायालयानेच शिक्षा माफी 1992 च्या धोरणांतर्गत ठरवावी असे सांगितले.

माफी द्यावी की नाही हा सरकारचा मनोगत निर्णय असतो, ना की कायद्यानुसार घेतलेला वस्तुगत निर्णय. त्यामुळे हे स्पष्ट आहे की न्यायालयाने उपलब्ध करवलेल्या कुबड्यांच्या आधारे भाजप सरकारने बलात्काऱ्यांची सुटका केली आहे.

गुन्हेगारांना सोडण्याच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत, परंतु अजून निर्णय आलेला नाही. "गेल्या 20 वर्षांचा आघात पुन्हा माझ्यावर कोसळला आहे" असे बिल्किस बानोने म्हटले आहे आणि "तिला निर्भयपणे व शांततेने जगता यावे याचा अधिकार मिळेल" अशी आशा व्यक्त केली आहे.

### बिल्किसच्या बलात्काऱ्यांवर गुजरात सरकारची, भाजपची सतत मेहेरबानी

बिल्किस बानोच्या बलात्काऱ्यांवर या अगोदरही गुजरात सरकारने सतत मेहेरबानी केली आहे आणि त्यांना सतत 'पॅरोल'वर सोडले आहे. राधेश्याम शाह याचा पॅरोलचा अर्ज गुजरात उच्च न्यायालयाने एप्रिल मध्ये या आधारे फेटाळला की त्याने अगोदरच जानेवारी ते मार्च या 90 दिवसांपैकी 60 दिवस पॅरोलवर तुरुंगाबाहेर काढले आहेत. अशाचप्रकारे दुसरा गुन्हेगार केशर वोहानिया याला ऑगस्ट 2018 ते सप्टेंबर 2018 या काळात 50 दिवस, आणि फेब्रुवारी-2019 ते मार्च-2019 या काळात 40 दिवस पॅरोलवर सोडले गेले होते. 2017 ते 2020 या काळात यापैकी अनेक गुन्हेगारांना पॅरोल दिला गेला आणि बाहेर पडल्यावर त्यांनी साक्षीदारांना धमकावण्याचे कामही केले. या काळात गुन्हेगारांनी राजकीय कार्यक्रमांना हजेरी लावणे, आपले व्यवसाय चालवणे, बंगले बांधणे आणि साक्षीदारांना धमकावणे ही कामे केल्याची तक्रारही फेब्रुवारी 2021 मध्ये गुजरातच्या गृहमंत्र्यांना देण्यात आली होती. उदाहरणार्थ शैलेश भट याने पॅरोलवर असताना भाजपच्या नेत्याच्या कार्यक्रमात हजेरी लावली होती. या गुन्हेगारांना देण्यात आलेल्या पॅरोलची माहिती देण्यासही जेल प्रशासनाने नकार दिला आहे.



गावातील लोकांनी बलात्काऱ्याच्या स्वागताकरिता डीजे लावला आणि फटाके फोडले. परिणामी या 11 गुन्हेगारांना सोडल्यानंतर बिल्किस बानोच्या रंधिकापूर या गावातील अनेक मुस्लिम आपले गाव सोडून गेले आहेत आणि देवगढ बारिया गावात जाऊन राहिले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की हे 11 गुन्हेगार तुरुंगात जातील तेव्हाच ते आपल्या गावी परत जातील. 55 लोकांनी या आशयाचे पत्र जिल्हाधिकाऱ्याला दिले आहे.

### संघ-भाजपचे ब्राह्मणवादी चरित्र

गुन्हेगारांना सोडण्याचा निर्णय घेणाऱ्या समितीचे सदस्य असलेल्या भाजपच्या गोध्रा येथील आमदार सी.के.राउलजी यांनी म्हटले आहे की जेल मध्ये असणारे गुन्हेगार असतीलच असे नाही, आणि त्यांपैकी काही जण ब्राह्मण आहेत, चांगले संस्कार असणारे आहेत आणि बहुतेक त्यांच्या कुटुंबांच्या गतकाळातील कृत्यांमुळे खोट्या गुन्ह्यात फसवले गेले होते!

यातून दिसून येते की भारतीय जनता पक्ष कशाप्रकारे बलात्कारी आणि खुन्यांच्या मागे उभा आहे! या पक्षाचे निवडून गेलेले आमदारच बलात्काऱ्यांच्या समर्थनात सरळ उभे आहेत! गुन्हेगार ब्राह्मण आहेत आणि ब्राह्मण गुन्हेगार असूच शकत नाहीत तर चांगल्या संस्कारांचेच असतात. यातून भाजपचे जातीयवादी चरित्र दिसून येते, जे जगजाहीर होतेच, पण ते आता अधिक नागडेपणाने समोरही येत आहे!

यात काही आश्चर्य नाही. हिंदुत्ववाद्यांचे एक विचारवंत असलेले माफीवीर (ज्यांनी इंग्रजांची माफी मागून स्वत:ची तुरुंगातून सुटका करून घेतली) सावरकर यांनी बलात्काराला एक राजकीय शस्त्र म्हणून वापरण्याचे आणि हिंदु विजेत्यांनी मुस्लिम महिलांवर बलात्कार करण्याचे घृणास्पद समर्थन त्यांच्या "भारताच्या इतिहासातील सहा सुवर्णअध्याय" या पुस्तकात केले आहे. छत्रपती शिवाजींनी कल्याणच्या मुस्लिम सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने परत पाठवून तिच्यावर बलात्कार न केल्याबद्दल तक्रार सुद्धा याच पुस्तकात सावरकर करतात. अशा गुन्हेगारी, महिलाविरोधी, ब्राह्मणवादी विचारांवर पोसलेल्या संघी-भाजपाईंकडून अजून काय अपेक्षा केली जाऊ शकते.

म्हणूनच उत्तरप्रदेशातील उन्नाऊ मध्ये 2017 मधील बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये शिक्षा झालेले भाजपचे आमदार कुलदीप सिंह सेंगर यांच्या समर्थनात हिंदुत्ववाद्यांनी मोर्चे काढले होते. 2018 मध्ये जम्मूमधील कठुआ येथे एका अल्पवयीन मुलीवर बलात्काराचा आरोप असलेले (ज्यांच्यावर गुन्हा साबित झाला) एका मंदिराचा पुजारी आणि इतर सहा हिंदू पुरुषांच्या समर्थनात आंदोलने केली गेली, ज्यात भाजपचे दोन मंत्री सुद्धा सामील होते. 2020 मध्ये उत्तरप्रदेशातील हाथरस येथे एका दलित महिलेवर झालेल्या बलात्कारानंतर भाजपचे माजी आमदार राजवीर सिंह पहलवान यांनी आरोपींच्या समर्थनात आंदोलन केले होते. याचवेळी भाजपचे आमदार सुरेंद्र नाथ सिंह यांनी "बलात्कार टाळायचा असेल तर महिलांवर चांगले संस्कार करावे लागतील" असे वक्तव्य केले होते आणि भाजप नेते रणजित श्रीवास्तव याने आरोपी निर्दोष आहेत असे म्हटले होते. एकीकडे प्रधानमंत्री मोदी लाल किल्ल्यावरून "महिला शक्ती", "महिला सबलीकरण" अशी भांडवली-ब्राह्मणी चौकटीतील दिखावी भाषणे ठोकत असताना, दुसरीकडे भाजपची सर्व सेना बलात्काऱ्यांना वाचवण्यासाठी जीवाचे रान करत असते. ज्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाचा भाजपने देशभरात प्रचार चालवला होता, त्याच अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनी भाजपने बलात्कारी-खुन्यांना सुद्धा स्वातंत्र्य दिले! बिल्किस बानो प्रकरणामध्ये मोदीने एक चकार शब्दही बोललेला नाही यातूनच मोदी सरकारचा सुद्धा या सर्वांना असलेला पाठिंबा दिसून येतो.

### हे सर्व "दया"भावनेने केले गेले का?

एकीकडे सामंती मूल्य-मान्यतांनी पछाडलेल्या भारतात शिक्षेसंदर्भात आजही छोट्या गुन्ह्यासाठीही मोठी शिक्षा द्यावी अशा मागण्या उचलल्या जातात, सूडाच्या आणि पितृसत्तेच्या मान्यतांपोटी बलात्काऱ्यांना फाशी द्या अशाही मागण्या उचलल्या जातात, परंतु बिल्किस बानो सारख्या प्रकरणात मात्र देश शांत असतो! फॅसिस्ट संघ परिवाराने जनतेमध्ये पसरवलेल्या विखारी प्रचाराचाच परिणाम आहे की बिल्किस बानो सारख्या महिलांना सर्वप्रथम मुस्लिम म्हणून पाहिले जाते, ना की एक व्यक्ती म्हणून, एक स्त्री म्हणून.

गुन्हेगारांना दया दाखवत त्यांच्या चांगल्या वागणुकीबद्दल त्यांची शिक्षा कमी करावी असे नियम खूप काळापासून अस्तित्वात आहेत. परंतु या बाबतीत भाजप सरकारने "दया" भावनेने आरोपींना सोडले आहे का? तर अजिबात नाही. केलेली सुटका ही राजकीय हेतूनेच केलेली आहे आणि आपल्या दंगलखोर, गुंड पथकांपर्यंत "योग्य" संदेश देण्याकरिता केली गेलेली आहे.

भारतातील तुरुंगांमध्ये असलेल्यांपैकी (जवळपास 4.88 लाख लोक) 76 टक्के लोक (जवळपास 3.71 लाख लोक) हे 'आरोपी' आहेत आणि न्यायालयांमध्ये खटले वेळेवर चालवले जात नाहीत त्यामुळे या सर्वांना तुरुंगात खितपत पडावे लागलेले आहे. यापैकी 68 टक्के लोक हे अशिक्षित किंवा शाळा-सोडलेले आहेत आणि 93 टक्के लोक हे मुस्लिम, दलित, ओबीसी वा आदिवासी आहेत. थोडक्यात समाजातील कामगार-कष्टकरी-कामकरी समुदायातून येणारे लोकच प्रचंड बहुसंख्येने तुरुंगात खितपत पडलेले आहेत. एकूण तुरुंगवासीयांपैकी यु.ए.पी.ए. सारख्या अतिशय लोकशाहीविरोधी आणि दमनकरी कायद्यांखाली अटक केलेल्या अनेक आरोपींवर तर गुन्हेही दाखल केले जात नाहीत आणि सरकारच्या मनमर्जीने त्यांना तुरुंगात सडवले जाते. या अंडरट्रायल आरोपींच्या नावाने अधूनमधून गळे काढण्याचे काम न्यायपालिका आणि विविध सरकार करत असतात परंतु कृती मात्र शून्य! नुकताच फादर स्टॅन स्वामी यांचा अशाचप्रकारे खोट्या खटल्यामध्ये अंडरट्रायल कैदी असताना मृत्यू झाला आणि 84व्या वर्षी पार्किन्सन सारखा आजार असताना सुद्धा त्यांना सतत बेल नाकारला गेला!

अशामध्ये खून-बलात्कार केलेल्या, अनेकदा पॅरोलवर, फर्लोवर तुरुंगाबाहेर सोडलेल्या, शिक्षा भोगत असताना जे भाजपच्या राजकीय कार्यक्रमांमध्ये सामील होत होते आणि साक्षीदारांना धमकावत होते अशा गुन्हेगारांना, ते ब्राह्मण आहेत म्हणून उच्चसंस्कारी आहेत असे सांगत जेव्हा भाजप सरकार मोकळे सोडते तेव्हा ती "दया" नसून गुन्हेगारांना दिलेले बळ आहे आणि समाजात दहशत पसरवण्याच्या संघी-भाजपाई रणनीतीचा भाग आहे!

# ‘हर घर तिरंगा’चे संघ-भाजपचे ढोंग ओळखा!

## जाणून घ्या संघाचा स्वातंत्र्य चळवळीशी गद्दारीचा इतिहास!

✎ अश्विनी

नुकताच स्वातंत्र्याचा “अमृत महोत्सव” येऊन गेला. या संदर्भात “हर घर तिरंगा”चा नारा देत घराघरापर्यंत देशभक्तीचे आवतान घेऊन येणाऱ्या मोदी सरकारचा पक्ष, म्हणजे भाजप, ज्या पार्श्वभूमीतून येतो, त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास तर आज प्रत्येकाने जाणणे आवश्यक आहे. कारण देशभक्तीचे प्रमाणपत्र देणारे हे स्वघोषित ठेकेदार स्वतः देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात आणि त्यानंतरही किती “हाडाचे देशभक्त” होते, तिरंग्याचे “प्रेमी” होते, आणि इंग्रजांचे “विरोधक” होते, याचा इतिहास प्रत्येक भारतीयापर्यंत नक्की पोहोचला पाहिजे.

1925 च्या विजयादशमीला नागपूर मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना प्रथम सरसंघचालक केशव बळीराम हेडगेवार ह्यांनी केली. 1920-21 चे असहकार आंदोलन ज्यावेळी चालू होते, भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचं स्वप्न ज्यावेळी तरुणांच्या नसानसात भिनले होते, त्यावेळी संघाने ह्या स्वातंत्र्य लढ्यात पुढाकार तर घेतला नाहीच, इतरांना लढ्यात सहभागी होण्याबाबत कुठल्याही प्रकारचे प्रोत्साहन देखील दिले नाही. इंग्रजांच्या दमनाने पेटून उठून त्याविरोधात संघर्ष पुकारत असताना भगतसिंह, सुखदेव, राजगुरू अतिशय कोवळ्या वयात फासावर चढले, त्यावेळेस संघाच्या कार्यकर्त्यांना ब्रिटिशांविरुद्ध लढायला प्रोत्साहन न देता, आपल्याच देशवासीयांविरुद्ध लढण्याचे म्हणजे मुस्लिम, ख्रिश्चन, कम्युनिस्टांना संपवण्यासाठी तलवारीचे प्रशिक्षण ह्या हाफ-चड्डी धारकांना दिले जात होते. ज्यावेळेस भगतसिंह आणि त्यांच्या साथीदारांनी फाशी न देता गोळी मारावी ही मागणी केली त्यावेळेस तथाकथित महान हिंदू राष्ट्राचे जनक सावरकर अंदमानातील तुरुंगातून इंग्रजांना माफीनाम्यावर माफीनामे पाठवण्यात व्यस्त होते आणि तुरुंगातून सुटल्यावर आयुष्यभर इंग्रजांचे पेंशनधारक बनून राहिले.

9 मार्च 1960 रोजी इंदोर, मध्यप्रदेश येथे संघाच्या कार्यकर्त्यांसमोर गोळवलकर म्हणाले “...1930-31 ला मोठे स्वतंत्रता आंदोलन झाले. त्यावेळेस काही युवक डॉक्टरांकडे (हेडगेवार) ही मागणी घेऊन गेले की यावेळी स्वातंत्र्य मिळेल आणि संघाने मागे राहता कामा नये. ह्याच शिष्टमंडळातील एक मनुष्य डॉक्टर हेडगेवारांना म्हणाला की ‘मी तुरुंगात जायला तयार आहे.’ हेडगेवारांचा त्यावरील अभिप्राय होता की “नक्की जा, पण तुमच्या अनुपस्थितीत तुमच्या घरच्यांकडे कोण बघेल?” त्या माणसाने उत्तर दिले की “पुढील दोन वर्षात संपूर्ण घर चालण्यासहित जामिनासाठी लागणारे पैशांचीही तयारी मी आधीच करून ठेवली आहे.” त्यावर हेडगेवार म्हणाले की “तुम्ही तयारी केली आहे तर पुढची दोन वर्ष संघाच्या कामासाठीच द्या.” (श्री गुरूजी समग्र दर्शन’, खंड-4, भारतीय विचार साधना, नागपुर, 1981).

1942 ला जेव्हा भारत छोडो आंदोलन उभे राहिले, तेव्हा गोळवलकर हे सरसंघचालक होते. ब्रिटिशांकडून भारतीयांवर होणाऱ्या दमन, अत्याचारांचे उच्चांक गाठणारी ही वेळ होती. देशातला सामान्य कष्टकरी भूक, महागाई, बेरोजगारीच्या आगीत होरपळत होता. “खूप सहन केली गुलामी, आता बास” ह्या भावनेने ओतप्रोत होऊन प्रत्येक जण ही गुलामी संपवायला रस्त्यावर उतरला होता. त्यावेळेस संघाने काही न करण्याचे ठरवले. संघाच्या सन 1925 मध्ये विजयादशमीच्या दिवसाच्या स्थापनेपासून, ते 1947 मध्ये भारत स्वतंत्र होईपर्यंत संघाने स्वातंत्र्य लढ्यापासून जाणीवपूर्वक अंतर ठेवले. पहिले संस्थापक डॉ हेडगेवार, नंतर पूजनीय गुरुजी म्हणवले जाणारे गोळवलकर आणि हिंदू राष्ट्राचे पुरस्कर्ते ‘स्वातंत्र्यवीर’ सावरकर सर्वांनीच कुठल्याही स्वातंत्र्यलढ्यात ना योगदान दिले ना जनतेला स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. संघासाठी देशभक्ती म्हणजे ब्रिटिश भक्ती होती. देश स्वतंत्र करण्यासाठी ब्रिटिशांना घालवण्याची गरज नाही तर आपल्याच देशातील हिंदू सोडून इतर सर्वांना म्हणजे मुस्लिम, ख्रिश्चन सर्व अल्पसंख्यांकांना घालवण्याची गरज आहे, हा संघाचा विचार होता. गोळवलकरांच्या नजरेत ब्रिटिश हुकूमत ही विजेत्यांच्या स्वरूपात होती आणि ह्या दृष्टीने विजेत्यांशी संघर्ष न करता, अथवा कुठलीही द्वेषभावना न ठेवता त्यांच्याशी आपलेपणाने वागले पाहिजे ही भावना ते संघात रूजवत होते. 1942 च्या स्वातंत्र्यलढ्यासहित प्रत्येक संघर्षात सामील न होण्याचे गोळवलकरांनी दिलेले कारण होते ‘संघर्षाचे परिणाम वाईट होतात.’ वरील कारणानुसार मग भारतीयांनी इंग्रजांशी संघर्ष सोडून प्रेमाने वागायला हवे होते? की होणाऱ्या जुलुमांबाबत मूग गिळून गप्प बसायला हवे होते? वरील सर्व उदाहरणे संघाने सुरुवातीपासूनच स्वातंत्र्यलढ्यासोबत केलेली गद्दारीच दर्शवतात.

### संघाचे ढोंगी तिरंगा प्रेम

स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त अमृत महोत्सव साजरा करण्याचे, हर घर तिरंगा फडकविण्याचे आवाहन ज्येष्ठ संघ प्रचारक प्रधानमंत्री मोदी कडून करण्यात आले. संघाच्या शाखांमधून घराघरात तिरंगा पोचविण्याचे काम केले गेले. परंतु हर घर तिरंगा म्हणत असताना किती जणांकडे हक्काचे चांगले घर आहे याच्याशी सरकारला काहीही देणे-घेणे नव्हते. 2011 च्या आकडेवारीनुसार भारतात ज्यांच्या डोक्यावर छतच नाही, जे बेघर आहेत अशा लोकांची संख्या एकूण 17 लाख, 73 हजार, 40 होती. ही संख्या इतकी कमी दिसण्याचे कारण हे आहे की यामध्ये भाड्याने राहणारे, झोपडपट्टीत खुराड्यांसारख्या घरात राहण्यास ज्यांना भाग पाडले आहे, जे दहा बाय दहाच्या घरात 7-8 जण राहतात अशांना बेघर मानले गेलेलेच नाही! असे असतानाही पुढील 10 वर्षात “बेघरांच्या” संख्या वाढीचा वेग प्रचंड राहिलाय. त्यामुळे कोट्यवधी जनतेच्या डोक्यावर छत नसतानादेखील हर घर तिरंगा मोहीम राबवली गेली. अशामध्ये हे तिरंगा प्रेम सुरुवातीपासूनच आहे की अचानकच उतू चालले हेदेखील पडताळण्याची आवश्यकता बनते.

स्वातंत्र्य लढ्यातील काळातच, 1930 साली 26 जानेवारीच्या दिवशी सर्व भारतभर तिरंगा फडकवण्याचा निर्णय घेतला असता तेव्हाचे सरसंघचालक डॉक्टर हेडगेवार ह्यांनी आदेश पत्रक जारी केले की देशभरातील आर.एस.एस.च्या सर्व शाखांमध्ये भगवा पुजला जावा. आर.एस.एस. चे इंग्रजी मुखपत्र ‘ऑर्गनायझर’च्या 14 ऑगस्ट 1947 च्या अंकात लिहिले होते, “जे लोक नशिबाच्या जोरावर सत्तेपर्यंत पोचले आहेत, त्यांनी भलेही आमच्या हातात तिरंगा सोपवला असेल, परंतु हिंदुंद्वारे ना कधी या तिरंग्याचा सन्मान केला जाईल, ना ह्याला आपले मानले जाईल. 3 हा आकडा स्वतःहूनच अशुभ आहे आणि असा 3 रंग असलेला झेंडा अतिशय वाईट मनोवैज्ञानिक प्रभाव पाडेल आणि ते देशासाठीही नुकसान पोचवणारे ठरेल.”

गोळवलकरांनी आपल्या लेखात म्हटले की “कोण म्हणू शकते की हा एक निरोगी आणि शुद्ध राष्ट्रीय दृष्टीकोन आहे? ही फक्त एक राजकीय तडजोड होती, तात्कालिक राजकीय कामचलावू उपाय होता. तो एखाद्या राष्ट्रीय दृष्टिकोनातून किंवा राष्ट्रीय इतिहास व परंपरेवर आधारित एखाद्या सत्याने प्रेरित नव्हता. तोच झेंडा आज थोड्या बदलांसहित सरकारी ध्वज म्हणून स्विकारला गेला आहे. आपले एक प्राचीन व महान राष्ट्र आहे, आणि त्याला गौरवशाली इतिहास लाभला आहे, तेव्हा आपला राष्ट्रीय ध्वज नव्हता का? हजारो वर्षात आपले कोणतेच राष्ट्रीय चिन्ह नव्हते का? नक्कीच होते! तर मग आपल्या डोक्यामध्ये हे शून्यतापूर्ण रिकामेपण का?” (एम.एस. गोळवलकर, विचार नवनीत, पान. 237).

हे प्रश्न विचारताना गोळवलकरांच्या मनात होता तो महाराष्ट्रातील पेशवाई ब्राम्हणांचा इतिहास, ज्यांचा स्वतःचा भगवा झेंडा होता, आणि तोच भगवा स्वतंत्र हिंदू राष्ट्राचा झेंडा त्यांना बनवायचा होता. गोळवलकर गुरुजींच्या मते “आपल्या महान संस्कृतीचा परिपूर्ण परिचय देणारा, प्रतिकात्मक आपला भगवा झेंडा आहे, जो आम्हाला ईश्वरासमान आहे, त्यामुळेच अशा वंदनीय ध्वजाला आम्ही आपल्या गुरुस्थानी ठेवणे योग्य समजले आहे. हा आमचा दृढ विश्वास आहे की शेवटी ह्याच ध्वजापुढे संपूर्ण राष्ट्र नतमस्तक होईल.” (गोळवलकर, ‘श्री गुरूजी समग्र दर्शन’, भारतीय विचार साधना, नागपुर, खंड-1, पान 98)

संघाचे हे दुतोंडी धोरण आहे. सत्तेवर बसून कळीचे, जमिनीवरचे खरे प्रश्न सोडून म्हणजे बेरोजगारी, महागाई, शिक्षण व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, महिला अत्याचार हे प्रश्न सोडून जात धर्माच्या नावाखाली सतत दंगली भडकावून, विविध मुद्दे पेटवून, कामगार कष्टकरी जनतेत फूट पाडून स्वतःची राजकीय पोळी भाजून घेणे हे काम तर साध्य होतेच, तर दुसऱ्या बाजूला तिरंगा, वंदे मातरम, राष्ट्रगीत, पंतप्रधान एवढ्यांचा मान ठेवलात तर तुम्ही देशभक्त, अन्यथा देशद्रोही असे धोरण स्वीकारत देशभक्तीचे प्रमाणपत्र वाटत फिरणे हे आर.एस.एस. ला खूप चांगल्या प्रकारे जमते. प्रधानमंत्री मोदी आंतरराष्ट्रीय योग-दिनी इंडिया गेट वर तिरंगा चुरगळून त्याने नाक आणि घाम पुसतात, आणि त्यावर तिरंग्याला घेऊन अंधभक्ती पसरवणारी भांडवली प्रसारमाध्यमे चकार शब्दही काढत नाहीत परंतु हेच एखाद्या गैर-संघी व्यक्तीकडून घडले असते तर त्या व्यक्तीला देशद्रोहाचे प्रमाणपत्र देऊन ही प्रसारमाध्यमे केव्हाच मोकळी झाली असती.

प्रश्न नक्कीच उद्भवतो की भगव्या झेंड्यावर प्रेम करणाऱ्या संघींना, भाजपाईंना अचानक तिरंग्याबद्दल भरते कसे आले? देशातील अनेक उदारवादी तर यामुळेच हर्षोल्लित झाले आहेत की भाजपला, संघाला तिरंगा स्विकारावा लागला आणि ते याला देशातील उदारवादी भांडवली लोकशाहीचा विजयच मानत आहेत व म्हणत आहेत की मोदी सरकारला “झुकावे लागले”. अशा उदारवादी विचारांपासून कामगार वर्गाने फार सावध राहिले पाहिजे आणि फॅसिस्टांच्या अशा पावलांना नीट ओळखले पाहिजे. तिरंग्याचा केलेला पुरस्कार ही मोदी सरकारची आणि संघ-परिवाराची शरणागती नाही तर त्यांच्या फॅसिस्ट अजेंड्याचाच एक भाग आहे.

ना संघाने भगव्याचा पुरस्कार सोडला आहे, ना मोदी सरकारने संघाला तिरंगा स्विकारून भगवा सोडण्यास सांगितले आहे. “तिरंगा” देशातील भांडवली लोकशाही व्यवस्थेचे प्रतिक आहे, आणि 21 व्या शतकातील भारतीय फॅसिझमचा आणि तिरंग्याचा काहीच मूलभूत अंतर्विरोध नाही; जी राज्यघटना त्या तिरंग्याला मान्यता देते तिच्याशी सुद्धा फॅसिस्ट अजेंड्याचा मूलभूत अंतर्विरोध नाही हे ध्यानात घेतले पाहिजे. संघ परिवाराने नेहमीच आपल्या रणनितीमध्ये बदल करत राज्यसत्तेच्या बदलत्या वर्गीय चरित्रानुसार स्वत:ची ध्येयधोरणे बदलली आहेत आणि सत्ताधारी-शोषणकारी वर्गाचे प्रतिनिधित्व केले आहे. उदारवाद्यांनी पसरवलेल्या भ्रमाच्या विपरित देशाच्या राज्यघटनेच्या चौकटीत राहूनच आज फॅसिझम काम करत आहे, आणि सर्व प्रकारच्या जातीयवादी-धर्मवादी अजेंड्याला राबवत आहे, मग तो धर्मांतरबंदी कायदा असो, राममंदिर बांधणे असो, लोकशाही अधिकारांचे दमन असो, दमनकारी कायदे बनवणे असो, कामगार कायदे बदलणे असो, जनांदोलनांचे दमन असो, जीएसटी-नोटबंदी असो, एन.आर. सी.-सी.ए.ए. असो, वा गोवंशहत्याबंदी कायदा असो! यापैकी सर्व, आणि अशा इतर असंख्य, कृत्यांना भाजपने राज्यघटनेच्या चौकटीत लागू करवले आहे. आज तिरंग्याला सुद्धा भाजप देशातील तथाकथित धर्मनिरपेक्षतेचे वा उदारवादी लोकशाहीचे प्रतिक म्हणून नाही तर भाजपच्या एकाधिकारशाही फॅसिस्ट अजेंड्याचे प्रतिक म्हणून देशातील जनतेच्या गळी उतरवत आहे आणि त्यासाठीच तिरंग्याची सक्ती केली जात आहे. तोच तिरंगा ज्याने काँग्रेसकरिता थोड्या उदारवादी भांडवली लोकशाहीचे प्रतीक म्हणून काम केले, तोच आता राज्यघटनेच्या चौकटीतच भाजपच्या फॅसिस्ट अजेंड्याचे सुद्धा प्रतिक बनला आहे!

भांडवली लोकशाहीमध्ये राज्य करणारे सरकार कुठलेही असले तरी सत्तेत येऊन कामगार कष्टकरी वर्गाच्या श्रमाची लूट करून, भांडवलदार मालक वर्गाच्या प्रतिनिधींचे काम करून त्यांच्या गडगंज नफ्याचे वाटेकरी होणे, एवढेच उद्दिष्ट प्रत्येक सत्ताधाऱ्यांचे असते. अशी भांडवली व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी दुतोंडी फॅसिस्टांना विविध मुखवट्यांची गरज पडतेच. आज तो मुखवटा तिरंगा आहे आणि उद्या भगवाही असू शकतो. परंतु याने कामगार वर्गाच्या जीवनात काय फरक पडतो? जिथे दिवसाला वीस रुपये कमावणे सुद्धा अनेकदा अशक्य आहे, त्या देशात वीस रुपयांचा झेंडा विकत घेण्याची सक्ती हेच दाखवते की स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतर देशाचा अमृतकाळ नव्हे तर देशातील भांडवली व्यवस्थेचा कामगारांसाठीचा ‘मृत’काळ चालूच आहे!

# वृत्तपत्रे आणि कामगारवर्ग

**✎एंटोनियो ग्राम्सी**

*(आजही कामगारांमध्ये भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांचा मोठा प्रभाव आहे. रोज रु. 5 ते 10 देऊन अशी वृत्तपत्रे विकत घेणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे. अशा कामगारांचा मोठा हिस्सा हे समजत नाही की ही वृत्तपत्रे आज मुख्यत्वे मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्या, बिल्डर, उद्योगपती, व्यापारी अशा भांडवलदारांनी दिलेल्या जाहिरातींच्या पैशावर वा त्यांनी केलेल्या गुंतवणुकीवर चालतात आणि म्हणूनच ती कामगारवर्गाच्या बाजूचे विचार वा सत्य मांडत तर नाहीतच शिवाय रोज प्रस्थापित भांडवली व्यवस्था कशी चांगली याबद्दलचा विचार कणाकणाने झिरपवण्याचे काम करतात. भांडवली वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल्स आज अशी झालेली नाहीत, तर नेहमीच अशी होती. म्हणूनच याच परिस्थितीवर जवळपास 100 वर्षे अगोदर एंटोनियो ग्राम्सी या इटालियन कम्युनिस्ट लेखक, कलाकाराने लिहिलेला हा लेख प्रस्तुत करत आहोत.- संपादक मंडळ)*

हे सदस्यता मोहिमेचे दिवस आहेत. भांडवली वृत्तपत्रांचे संपादक आणि प्रशासक त्यांच्या मालाकडे ग्राहकांना (म्हणजे वाचकांना) आकर्षित करण्यासाठी दुकानाचा मुख्यभाग सुशोभित करतात, त्यांच्या दुकानाच्या साइनबोर्डवर थोडे वार्निश लावून चमकवतात आणि त्यांना आवाहन करतात. त्यांच्या वस्तू म्हणजे चार-सहा पानांची वृत्तपत्रे असतात जी रोज सकाळी किंवा संध्याकाळी बाहेर पडतात आणि वृत्तपत्रांचे निर्माते आणि व्यापाऱ्यांसाठी सोयीस्कर अशा तऱ्हेने वर्तमान राजकारणातील वस्तुस्थिती जाणण्याची व समजून घेण्याची सामग्री वाचकांच्या डोक्यात भरण्याचे काम ते करतात.

आम्हाला विशेषत: कामगारांसोबत, या वरवर पाहता साध्या वाटणाऱ्या कृतीचे महत्त्व आणि गांभीर्य यावर चर्चा करायची आहे, जे तुम्ही कुठल्या वृत्तपत्राचे सदस्यत्व घेता यात निहीत आहे. प्रलोभने आणि धोक्यांनी भरलेली ही निवड आहे, आणि खरेतर ती विविध निकष वापरून, कठोर आणि परिपक्व विचारमंथनानंतर



जाणीवपूर्वक केली पाहिजे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कामगाराने भांडवली वृत्तपत्राशी असलेली कोणतीही एकता ठामपणे नाकारली पाहिजे आणि त्याने सतत, सतत, सतत लक्षात ठेवले पाहिजे की भांडवली वृत्तपत्र (त्याचा रंग कोणताही असो) हे आपल्या विचारांच्या आणि (वर्ग)हितांच्या विरुद्ध प्रेरित असलेले (भांडवलदार वर्गाचे) संघर्षाचे साधन आहे. त्यात प्रकाशित होणारी प्रत्येक गोष्ट एकाच विचाराने प्रभावित आहे: सत्ताधारी-प्रबळ वर्गाची सेवा करणे आणि हाच विचार आवश्यकता भासताच खालील तथ्यात परिवर्तित होतो: कामगार वर्गाचा विरोध करणे. आणि खरंच, भांडवली वृत्तपत्राच्या पहिल्या ओळीपासून ते शेवटच्या ओळीपर्यंत आपल्याला याचा अनुभव येतो आणि ते सहज दिसू शकते.

पण सुंदर, म्हणजेच खरेतर विद्रुप, गोष्ट अशी आहे की भांडवलदार वर्गाच्या बाजूने केलेल्या या निर्दयी कामासाठी भांडवलदारांकडून पैसे घेण्याऐवजी, भांडवलदार वृत्तपत्रे देखील त्याच कामगार वर्गाकडून पैसे गोळा करतात ज्यांना त्यांनी नेहमीच विरोध केला आहे. आणि कामगार वर्ग पैसे देतो; अगदी शिस्तीने, उदारपणे.

लाखो कामगार त्यांचे पैसे भांडवली वृत्तपत्रांना नियमित आणि दररोज देतात, आणि त्याद्वारे त्यांची शक्ती वाढवण्यास मदत करतात. का? जर तुम्ही ट्राममध्ये किंवा रस्त्यावर भांडवली वृत्तपत्र घेऊन जात असलेल्या पहिल्या कामगाराला हा प्रश्न विचारला असता, तर तुम्हाला उत्तर मिळाले असते: 'काय चालले आहे हे मला माहित असणे आवश्यक आहे.' परंतु हे त्याच्या डोक्यात कधीच जात नाही की बातम्या आणि त्या बनवणारी सामग्री अशा खुबीने प्रस्तुत केल्या जातात की त्याच्या विचारांना एका विशिष्ट दिशेला वळवतात व त्याच्या चेतनेला त्या दिशेने प्रभावित करतात. आणि तरीही त्याला हे माहित आहे की हे वृत्तपत्र संधीसाधू आहे, दुसरे वृत्तपत्र श्रीमंतांसाठी आहे, तिसरे, चौथे, पाचवे वृत्तपत्र दुसऱ्या राजकीय पक्षांशी संबंधित आहेत ज्यांचे हित त्याच्या हितसंबंधांच्या पूर्णपणे विरुद्ध आहे.

आणि अशा प्रकारे तोच कामगार दररोज वैयक्तिकरित्या बघतो की भांडवली वृत्तपत्रे अगदी साधी तथ्ये देखील अशा प्रकारे सांगतात जी भांडवलदार वर्गाच्या बाजूने आणि कामगार वर्गाच्या आणि त्यांच्या राजकारणाच्या विरोधात असतात. काय कुठे संप चालू झालाय का? जिथपर्यंत भांडवली वृत्तपत्रांचा संबंध आहे, संपामध्ये कामगार नेहमीच चुकीचे असतात. कुठे आंदोलन होत आहे का? आंदोलक नेहमीच चुकीचे असतात, कारण ते कामगार आहेत ज्यांचे डोके नेहमी गरम असते, ते हिंसक असतात, ते दंगेखोर असतात. सरकारने एखादा कायदा मंजूर केला आहे का? तो नेहमीच चांगला, उपयुक्त आणि न्याय्य असतो, जरी तो वास्तवात तसा नसेल तरीही. आणि जर निवडणूक, राजकीय किंवा प्रशासकीय संघर्ष असेल तर? सर्वोत्तम कार्यक्रम आणि उमेदवार नेहमीच भांडवली पक्षांचे असतात.

आणि त्या सर्व तथ्यांबद्दल आम्ही अजून बोललोच नाहीत ज्यावर भांडवली वृत्तपत्रे एकतर गप्प बसतात, किंवा कामगारांची दिशाभूल करण्यासाठी, त्यांना अज्ञानात ठेवण्यासाठी तथ्यांची थट्टा उडवतात किंवा त्यांना खोटे ठरवतात. असे असूनही, कामगारांची भांडवली वृत्तपत्रांप्रती सदोष मूकसंमती अमर्याद आहे. आपण याविरोधात उभे राहून कामगारांना वास्तवाची जाणीव करून दिली पाहिजे. आपल्याला त्यांना पुन्हा पुन्हा सांगावे लागेल की अशा वृत्तपत्र विक्रेत्याकडे पैसे भिरकावणे म्हणजे भांडवली वृत्तपत्रांना असे तोफगोळे देणे होय, ज्याचा उपयोग तो योग्य वेळी कामगार वर्गाच्याच विरोधात करेल.

जर कामगारांना या मूलभूत सत्यांची जाणीव करून दिली गेली असती तर ते भांडवली वृत्तपत्रांवर बहिष्कार टाकायला शिकले असते, अगदी त्याच एकजुटीने आणि शिस्तीने जसे भांडवलदार कामगारांच्या वृत्तपत्रांवर, समाजवादी वृत्तपत्रांवर बहिष्कार टाकतात. भांडवली प्रसारमाध्यमे जी तुमची विरोधक आहेत, त्यांना आर्थिक पाठबळ देऊ नका. सर्व भांडवली वृत्तपत्रांच्या सदस्यत्व मोहिमेच्या या काळात आपले घोषवाक्य असले पाहिजे: बहिष्कार करा, बहिष्कार करा, बहिष्कार करा!

*मूळ लेख : "अवांती!", पिडमाँट आवृत्ती मध्ये डिसेंबर 22, 1916 रोजी इटलीमध्ये प्रकाशित*

(अनुवाद: जयवर्धन )

# अय्यंकालींचा जातीअंताचा वारसा पुढे न्या!

**पान 16 वरून**

पहिले, जनतेची शक्ती आणि पुढाकारावर भरवसा, अर्ज-विनंत्यांपेक्षा जनतेच्या मूलगामी संघर्षावर भरोसा. पण दलित मुक्ती संघर्षाचा मोठा भाग सुधारवाद, व्यवहारवाद आणि अस्मितावादाच्या दलदलीत अडकला आहे. दलितांमध्येसुद्धा असा एक मध्यमवर्ग तयार झाला आहे ज्याला कामगार कष्टकरी दलित जनतेशी कसलेही देणे घेणे राहिले नाही आहे. अशा मध्यमवर्गाला आज जात संपवायची नाही तर टिकवायची आहे कारण याच जातीच्या जोरावर चालणाऱ्या अस्मितावादी राजकारणामुळे त्यांना सत्तेत स्थान मिळत आहे. रामविलास पासवान, मायावती, रामदास आठवले यांसारखे नेते याच व्यवहारवादाची परिणीती आहेत जे आज सत्तेत राहण्यासाठी ब्राह्मणवादी तसेच फॅसिस्ट सत्तेसोबत युती करण्यास मागे पुढे बघत नाहीत. ह्याच शक्ती दलितांच्या जातीय अस्मिता कुरवाळत राहतात आणि जनतेला व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या संघर्षांपासून दूर नेण्याचे काम करतात.

दुसरे हे की जातीविरोधी संघर्षाचा अविभाज्य हिस्सा आहे राज्यसत्तेशी संघर्ष, तिचे वर्गचरित्र ओळखून तिच्या आर्थिक संरचनेशी संघर्ष. अय्यंकालींनी फक्त शिक्षणाचा मुद्दा उचलला नाही तर त्याकरिता कामगारांचा संप घडवला आणि सामंत व ब्रिटीश यांच्या सत्तेला आव्हान देत ते उभे राहिले. आज जेव्हा देशात भांडवली उत्पादन संबंध स्थापित झाले आहेत, आणि भांडवली राज्यसत्ता जातीव्यवस्थेला कामगार-कष्टकऱ्यांमध्ये फूट पाडण्यासाठी वापरत आहे, अस्मितावादी राजकारणाला, सत्तेच्या संरचनेमध्ये छोटा-मोठा वाटा मिळवण्याच्या महत्वकांक्षांना खतपाणी घालत आहे, अशावेळी अय्यंकालींची शिकवण ध्यानात ठेवून राज्यसत्तेशी संघर्षाची रणनिती जातीविरोधी आंदोलनाला अवलंबावी लागेल.

तिसरी गोष्ट ही की जातिअंताच्या आंदोलनाला वर्ग संघर्षाची जोड द्यावी लागेल. अय्यंकालींनी शेतमजुरांचा संप घडवून आणला तेव्हा हीच गोष्ट केली होती. दलित मुक्तीच्या संघर्षामध्ये दलितांसोबत इतर जातींचे कामगार कष्टकरी यांची वर्गीय एकजूट करावी लागेल. त्याशिवाय जातिअंताच्या लढ्याला पुढे नेता येणे शक्य नाही. जाती संपवण्याच्या संघर्षात आपण आपल्या जातींना चिकटून राहिलो तर ही लढाई पूर्णत्वाला नेणे शक्य नाही. आज सर्व कामगार कष्टकऱ्यांना समजून घ्यावे लागेल की त्यांचा शत्रू इतर जातीतला कामगार नसून त्यांच्याच जातीतला श्रीमंत भांडवलदार वर्ग आहे, ज्याने सर्व साधनसंपत्तीवर कब्जा करून सर्वच जातीतल्या कामगारांचे शोषण चालवले आहे.

यामुळेच आज अय्यंकालींच्या क्रांतिकारी वारशासोबत स्वतः ला परिचित करून घेणे महत्वाचे बनले आहे. अय्यंकाली सत्तेसोबत संघर्ष करणारे नेते होते त्यामुळेच त्यांच्या या चरित्रापासून जनतेला अनभिज्ञ ठेवण्याचे काम राज्यसत्ता करत राहील. त्यामुळेच क्रांतिकारी आणि प्रगतीशील शक्तींची ही जबाबदारी बनते की त्यांनी अय्यंकालींना, त्यांच्या कार्याला जनतेमध्ये घेऊन जावे.

# तिसऱ्या आघाडीचे, समाजवाद्यांचे, भांडवली राजकारणाचे, संधीसाधू वास्तव ओळखा!

**पान 7 वरून**

परिणाम असलेल्या "घोटाळ्यां"मुळे देशातील जनतेच्या निर्माण झालेल्या असंतोषाला, कामगारवर्गाच्या क्रांतिकारी राजकीय शक्तींच्या अनुपस्थितीत फॅसिस्ट राजकारणाने आपल्या मागे वळवण्यात यश मिळवले. मुस्लिमांच्या रुपात खोटा शत्रू उभा करून, उदारवादी धोरणांमुळे जास्त असुरक्षित झालेल्या निम्न-भांडवलदार वर्गाच्या प्रतिक्रियेला, इतकेच नाही तर कामगार वर्गाच्या लंपट हिश्श्याला सुद्धा आपल्यामागे एका सामाजिक आंदोलनाच्या रूपाने आणण्यात फॅसिस्टांना यश मिळाले. या यशाची खात्री देणारी, जनतेला कंगाल करणारी धोरणे राबवण्याचे काम कॉंग्रेस, समाजवादी आणि प्रादेशिक पक्षांनीच केले, ज्यांच्यामध्ये आज उदारवादी पुन्हा आशा शोधत आहेत.

फॅसिझम भांडवलदार वर्गाच्या हातात ज्याची साखळी असलेला तो हिंस्र कुत्रा आहे; ज्याचा वापर कामकरी जनतेच्या दडपशाही साठी भांडवलदार वर्ग करत असतो. त्यामुळे फॅसिझमला आव्हान सुद्धा तीच शक्ती देऊ शकते जी निर्णायकपणे भांडवलदार वर्गाच्या सत्तेला आव्हान म्हणून उभी राहील. योग्य मार्क्सवादी-लेनिनवादी समजदारीवर उभा असलेला एक क्रांतिकारी कम्युनिस्ट पक्षच हे काम करू शकतो आणि अशा पक्षाची निर्मिती हाच कामगारवर्गासमोर आज मुख्य कार्यभार आहे.

# तिसऱ्या आघाडीचे, समाजवाद्यांचे, भांडवली राजकारणाचे, संधीसाधू वास्तव ओळखा!

पान 1 वरून

नितिश कुमारांच्या समता पक्षाने 1996 मध्ये भाजपशी तेव्हा युती केली होती जेव्हा राममंदिर आंदोलनावरून भाजपच्या जातीयवादावर टीका होत होती. स्वत:ला "समाजवादी" आणि "संघविरोधक" म्हणवणारे नितिश कुमार भाजपच्या अटल बिहारी वाजपेयींच्या सन 2001-2004 या काळात केंद्रिय मंत्रीमंडळात कृषी आणि रेल्वे मंत्री होते. यानंतर बिहारमध्ये भाजप सोबत युती करून त्यांनी राज्यात सरकार बनवले आणि 2013 पर्यंत भाजप सोबत युतीमध्ये राहीले आणि सलग दोन वेळा मुख्यमंत्री सुद्धा बनले.

इतकेच नाही, तर 2002 मध्ये गुजरात मध्ये घडवल्या गेलेल्या पूर्वनियोजित दंगलींनंतर जेव्हा देशभरात नरेंद्र मोदींवर टीका होत होती, तेव्हाही नितिश कुमारांनी डिसेंबर 2003 मध्ये कच्छ येथे एका रेल्वे प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी मोदींची स्तुती करत म्हटले होते की मोदीमध्ये राष्ट्रीय नेता बनण्याची क्षमता आहे आणि ते एक विकासमुख राजकारणी आहेत, आणि "नरेंद्रभाऊ जास्त दिवस गुजरातमध्ये अडकून राहणार नाहीत व देशाला त्यांची सेवा मिळेल... गुजरातमधील विकासाची हवी तशी प्रसिद्धी बाहेर केली जात नाही....जे 2002 मध्ये झाले, तो डाग नक्कीच होता, पण फक्त तेच लक्षात ठेवायचे आणि बाकी सगळे विसरायचे हे काही ठीक नाही." याचा अर्थ हा की तेव्हाही नितिश कुमार गुजरात मॉडेलच्या भूलथापांचा स्वत:च प्रचार करून भाजपला खुश करू पहात होते जेव्हा जगभरात दंगलींबद्दल गुजरात सरकारची नालस्ती होत होती.

संघाचे सरसंघचालक मोहन भागवत आणि पूर्वीचे सरसंघचालक सुदर्शन यांच्यासोबत मंचावर बसण्यातही नितिश कुमारांना कधीच काही अडचण आली नाही. 2013 मध्ये जेव्हा काँग्रेसचे सुशिल कुमार शिंदे यांनी संघपरिवाराच्या 'हिंदु दहशतवादा' विरोधात वक्तव्य दिले होते, तेव्हा हेच नितिश कुमार संघाच्या रक्षणार्थ धावले होते आणि शिंदेंच्या वक्तव्याला बेजबाबदार व अपरिपक्व म्हटले होते.

याच नितिश कुमारांना 2013 मध्ये नरेंद्र मोदी प्रधानमंत्री पदाचे उमेदवार घोषित झाल्यावर आठवले की भाजप तर जातीयवादी आहे! या मुद्यावर मोदींना "धर्मवादी (कम्युनल)" नेता म्हणत त्यांनी युती तोडली आणि राष्ट्रीय जनता दल व काँग्रेस सोबत 'महागठबंधन' बनवले. 2014 मध्ये लोकसभा निवडणुकीत या युतीला मोठा पराभव बघावा लागला आणि नितिश कुमारांनी "नैतिक" जबाबदारी घेत मुख्यमंत्रीपद सोडले आणि त्यांचे सहकारी जितन राम मांझी यांना मुख्यमंत्री केले. परंतु जितन राम यांच्या वाढत्या राजकीय महत्वकांक्षेला आणि प्रभावाला पाहता पुन्हा नितिश कुमारांनी पक्षांतर्गत राजकारणात कुरघोडी करत मुख्यमंत्रीपद मिळवले. यानंतर मात्र 2015 च्या विधानसभा निवडणुकांमध्ये महागठबंधनला बहुमत मिळाले आणि नितिश पुन्हा मुख्यमंत्री झाले. 2016 मध्ये याच नितिश कुमारांनी "संघ-मुक्त भारता"चे आवाहन केले होते आणि संघाला गायींकरिता शाखा उघडण्यास सांगितले होते. भाजप समाजामध्ये बेबनाव निर्माण करत आहे असेही त्यांनी म्हटले. पण 2017 मध्ये लालूप्रसाद यादवांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यावर पुन्हा एकदा आपल्या सहकाऱ्यांना धोका देत नितिश कुमारांनी महागठबंधन तोडले, भाजपचा जातीयवाद विसरून पुन्हा त्याच्याशी युती केली व सरकार बनवले. यावेळी सुद्धा भाजपसोबत युती करून सरकार बनवताना त्यांना कोणतेही तत्त्व आडवे आले नाही!

भाजप सोबत युती केल्यानंतरही त्याबद्दल नितिश कुमारांचा संशय मात्र संपलेला नव्हता. 2019 मध्ये संघाच्या लोकांवर पाळत ठेवण्याचा गुप्तहेर खात्याला दिलेला आदेश वादाचा मुद्दा बनला. हेच नितिश 2019 मध्ये संघाची तारीफ करताना म्हटले की ते संघाच्या विचारधारेशी सहमत नाहीत, परंतु संघाचे सातत्य, कटिबद्धता, त्याची पाळेमूळे आणि सततचा विस्तार यामुळे त्यांना संघाबद्दल आदर वाटतो! संघाच्या विचाराला देशात मान्यता मिळवून देणाऱ्या जयप्रकाश नारायण यांचीही आठवण नितिश कुमारांनी काढली आणि संघ जे काम करतो त्याचा फक्त आठपैकी एक भाग दिसून येतो असे जयप्रकाशांनी बोलल्याचीही आठवण करून दिली.

2020 मध्ये भाजप-जद(यु) युतीला कसेतरी बहुमत मिळाले. हीच युती पुन्हा तोडून आता नितिश कुमार पुन्हा राजद सोबत महागठबंधनमध्ये गेले आहेत. भाजपशी युती तोडताना नितिश कुमारांनी म्हटले आहे की 2017 मध्ये भाजपशी त्यांनी युती करणे मूर्खपणाचे होते, आणि यापुढे भाजपशी कोणतीही "तडजोड केली जाणार नाही". एका बाजूला नितिश कुमारांनी स्वत:ला मूर्ख म्हणवले आहे, दुसरीकडे हे मान्य केले आहे की या अगोदर भाजपशी तडजोड केली होती. भाजपशी युती का केली याबद्दल नितिश कुमारांचे म्हणणे आहे की "...मी नाराज होतो, भाजपवाल्यांनी युतीचा खूप प्रयत्न केला, आणि शेवटी मी तयार झालो.", त्यांनी असेही म्हटले की "अटलबिहारींसोबत असताना आम्हाला सन्मान मिळत होता... आम्हाला नंतर समजले की ते आमचा पक्ष फोडू पहात आहेत." थोडक्यात संघ परिवाराचे हिंदुत्वाचे राजकारण, फॅसिझमचे तत्त्वज्ञान, या सर्वापेक्षा जास्त नितिशकरिता "नाराजी"चे महत्त्व तेव्हाही जास्त होते. त्यामुळेच भविष्यात भाजपशी युती न करण्याबाबत त्यांनी केलेल्या वक्तव्यात विश्वास ठेवण्याजोगे काही नाही.

नितिश कुमारांनी नुकतीच तोडलेली युती सुद्धा भाजप फॅसिस्ट आहे म्हणून तोडलेली नाही, तर भाजप आपल्या "सहकारी" पक्षाला धोका देत आहे, या कारणाने तोडली आहे. बिहारमध्ये भाजप आणि जदयु मध्ये चालू असलेली सत्तेतील वाट्यासाठीची साठमारी हे त्याचे एक कारण आहे. नितिश कुमार जरी मुख्यमंत्री असले तरी भाजपचे 77 आमदार आणि जदयुचे संख्या घटून उरलेले 45 आमदार असल्यामुळे भाजपला लुटीचा जास्त वाटा हवा होता आणि त्यातून संघर्ष निर्माण होत होता. या अगोदर खरेतर राजद सोबत सरकार बनवण्यात तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री बनवावे लागेल या मुद्यावरूनच नितिश कुमारांचे घोडे अडले होते. याशिवाय निवडणुकीमध्ये भाजपने जदयूला टांग मारण्यासाठी दलित अस्मितेचे संधीसाधू राजकारण करणाऱ्या राम विलास पासवान यांचा मुलगा चिराग पासवानला पैसे पुरवून जदयूची मते खाण्यासाठी उभे करवले होते. असे असतानाही "अपमान" गिळून नितिश कुमारांनी भाजपशी युती चालूच ठेवली होती. सरकार आल्यानंतरही नितिशच्या पक्षाला कुरतडण्याचे काम भाजपने चालूच ठेवले आणि आर.सी.पी. सिंह या जदयुच्या मोठ्या नेत्याला केंद्रात मंत्रीपद देऊ केले, ज्यामुळेही नितिशच्या मनात अस्तित्वाचे संकट उभे राहिलेच होते. या सर्वांच्या परिणामी जदयु ने भाजपशी संपर्कात आहेत असा संशय असलेल्या चार नेत्यांना 14 जून रोजी निलंबित केले होते.

## नितिश कुमारांचे नवीन संधीसाधू साथीदार

नितिश कुमारांनी आता देशस्तरीय नेते बनण्यासाठी भेटींचा सपाटा लावला आहे. राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव, कर्नाटकातील जनता दल सेक्युलरचे नेते एच.डी. कुमारस्वामी, राष्ट्रवादीचे शरद पवार, तृणमूलच्या ममता बॅनर्जी अशा सर्वांच्या भेटीगाठींचे सत्र त्यांनी आरंभले आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा तिसरी आघाडी बनवण्याच्या चर्चा चालू झाल्या आहेत. या संदर्भात हे विसरता कामा नये की आज नितिश कुमारांना भेटणाऱ्या अनेक नेत्यांनी त्यांना "संघी" जाहीर केले होते.

आज नितिश कुमारांसोबत बोलणी करणाऱ्या राहुल गांधींनी 25 मार्च 2021 रोजी नितिश कुमार पूर्णपणे भाजप-संघाच्या रंगात रंगले आहेत अशी टीका केली होती. राजदचे तेजस्वी यादव यांनी सुद्धा नितिश कुमारांना संघाचे मुख्यमंत्री म्हटले होते आणि बिहारच्या मतदारांच्या पाठीत सुरा खुपसल्याची टीका करत म्हटले होते की आम्ही जनतेपर्यंत जाऊ आणि नितिश कुमारांचे ढोंग उघडे पाडू. जनतेसमोर उघडे पाडणे दूरच तेजस्वी यादव आज स्वत: त्यांच्यासोबत सत्तेमध्ये उपमुख्यमंत्रीपद घेऊन साथीदार बनले आहेत!

सर्व प्रकारचे भांडवली राजकारण, आणि त्यामुळेच समाजवादी राजकारण सुद्धा जे मूळातच भांडवलदार वर्गाचेच राजकारण आहे, ते अशाप्रकारे संधीसाधूच असू शकते. समाजवादी नेत्यांचा, पक्षांचा अशा संधीसाधू राजकारणाचा एक प्रदीर्घ इतिहास आहे.

## फॅसिझमच्या राजकारणाला पुढे आणण्यात समाजवाद्यांचे योगदान

हा झाला नितिश कुमारांच्या कोलांटउड्यांचा संक्षिप्त इतिहास. परंतु हा इतिहास फक्त त्यांचे संधीसाधू चरित्र दर्शवतो, जी भांडवली राजकारणात काही विशेष बाब राहिलेली नाही. संधीसाधूपणा हा नेहमीच समाजवादी राजकारणाची ओळख राहीली आहे, आणि नितिश कुमार तीच परंपरा पुढे चालवत आहेत.

1962 मध्ये राम मनोहर लोहिया या दिग्गज समाजवादी नेत्याने गैर-काँग्रेसवादाच्या नावाखाली "भारतीय जनसंघ" पक्षासोबत युती केली, तोच जनसंघ ज्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भाजप अगोदर आपली राजकीय आघाडी म्हणून पुढे केले होते. 1963 साली लोहियांनी कानपुर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यशाळेलाच हजेरी लावली होती आणि उत्तर दिले होते की "मी सन्याशांना गृहस्थ बनवायला गेलो होतो." लोहिया आणि समाजवादी त्यांच्या भांडवली विचारधारेच्या प्रभावामुळे हे समजू शकत नव्हते की संघाकरिता सन्यस्त वृत्ती एक निवडीचे राजकीय हत्यार आहे ना की तत्त्वाचा मुद्दा, आणि राजकारणी सन्यस्त आहे की नाही यापेक्षाही महत्त्वाचे आहे की त्याचे वर्गचरित्र काय आहे!

भाजप आणि संघपरिवाराला नैतिक मान्यता देण्यामध्ये सर्वात मोठी भुमिका त्या जयप्रकाश नारायण यांनी निभावली, जे सर्व समाजवाद्यांना "वंदनीय" आहेत. जयप्रकाश नारायणांनी ना फक्त संघाला स्वत:च्या संपुर्ण क्रांती आंदोलनात सोबत घेतले आणि जनता पार्टी सरकारमध्ये दुहेरी पक्ष सदस्यतेसहीत सामील केले, तर इथपर्यंत म्हटले की संघ फॅसिस्ट आहे, धर्मवादी आहे असे म्हणणे निराधार आहे, इतकेच नाही तर जर संघ फॅसिस्ट असेल तर मी सुद्धा फॅसिस्ट आहे. यामुळेच 1977 मध्ये जेव्हा जनता पार्टीचे सरकार बनले, तेव्हा त्यात भारतीय जनसंघ सुद्धा सामील होता.

यात आश्चर्याची गोष्ट नाही की जनसंघानंतर स्थापन झालेल्या भाजपने सुद्धा सुरुवातीच्या काळात स्वत:च्या विचारधारेचे नाव "गांधीवादी समाजवाद" ठेवले होते, ज्याचा दिखावा 1984 मधील निवडणुकीतील तुलनेने वाईट कामगिरीनंतर मागे सोडला गेला.

समाजवाद्यांचे तिसरे मोठे नेते जॉर्ज फर्नांडीस यांनी तर हिंदुत्ववाद्यांना साथ देण्यात वैयक्तिक स्तरावर काहीच कमतरता सोडली नाही. 90 च्या दशकात जेव्हा बाबरी-मशिद व राममंदिराच्या मुद्यावर भाजपवर चौफेर टीका होत होती, तेव्हा फर्नांडिस आणि नितिश कुमार यांच्या समता पक्षाने भाजपशी युती केली. जॉर्ज फर्नांडीस नंतर वाजपेयींच्या मंत्रीमंडळातही सामील झाले आणि भाजपचे विश्वासू बनले.

हीच समाजवादी "परंपरा" पुढे चालवत जनता दलाच्या विविध शकलांमधून निर्माण झालेल्या आणि समाजवादी परंपरेतून आलेल्या विविध राजकीय पक्षांनी सुद्धा वेळोवेळी भाजप-संघासोबत युती केली आहे, त्यांच्या विचारधारेचे समर्थन केले आहे!

मुलायम सिंह आणि अखिलेश यादवांच्या समाजवादी पक्षाने सुद्धा यात कसर सोडलेली नाही. मुलायम सिंह यादवांनी संघाचे नेते श्यामा प्रसाद मुखर्जी, आणि जनसंघाची अनेकदा स्तुती केली आहे. भाजपचे नेते कल्याण सिंह ज्यांच्या अखत्यारित बाबरी मशिद पाडली गेली, ते स्वत: 2003 मध्ये समाजवादी पक्षासोबत युती सरकारमध्ये सामील होते. 2009 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपसोबत नाराजी चालू असताना कल्याण सिंह यांनी समाजवादी पक्षाचा प्रचारही केला आणि बाबरी मशिद पाडल्याचा आरोप असलेल्या या नेत्याला सोबत घेताना समाजवादी पक्षाला कोणतेही "तत्त्व" आडवे आले नाही. नंतर कल्याणसिंह पुन्हा भाजपत गेले आणि राज्यपालही बनले.

शरद यादव आणि रामविलास पासवान या दोन समाजवादी नेत्यांनी भाजप-संघाला कवटाळण्यात हयगय कधीच केली नाही. हे दोन्ही नेते व्ही.पी. सिंहांच्या काळात संघाला जातीयवादी म्हणत होते, परंतु शरद यादव जदयु अध्यक्ष असतानाच भाजपसोबत युती सरकार चालू होते. राम विलास पासवानांनी 2014 मध्ये भाजपशी युती केली होती आणि त्यांचा वारसा त्यांचा मुलगा चिराग पासवान

पान 7 वर

# तिसऱ्या आघाडीचे, समाजवाद्यांचे, भांडवली राजकारणाचे, संधीसाधू वास्तव ओळखा!

पान 6 वरून

समर्थपणे पुढे चालवत आहे.

## प्रादेशिक पक्ष, समाजवादी यांच्या कोलांटउड्यांमागील वर्गीय राजकारण

नितिश कुमारांचा जदयू पक्ष असो, वा राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, शिवसेना, जद-सेक्युलर, अकाली दल, अण्णाद्रमुक सारखे इतर प्रादेशिक पक्ष, या सर्व पक्षांचा कमी-जास्त भाजपला साथ देण्याचा इतिहास आहे. वरवर संघपरिवाराला, हिंदुत्वाला विरोध करणारे हे पक्ष सत्तेत असताना नेहमीच भाजपशी जुळवून घेण्याचेच राजकारण करत आले आहेत. उदाहरणार्थ, 1998 मध्ये पहिल्यांदा वाजपेयी सरकारला समर्थन दिल्यानंतर अनेकदा अण्णाद्रमुकने भाजपशी युती केली; राष्ट्रवादी काँग्रेसने 2014 च्या निवडणुकीनंतर भाजपने स्थापन केलेले सरकार टिकावे याकरिता विधानसभेत मतदानात अनुपस्थिती नोंदवली होती; कर्नाटकातील जद-सेक्युलरचे अनेक आमदार सतत भाजपशी युतीबद्दल बोलत आले आहेत, इत्यादी. यावर ढोंगी-उदारवादी नक्कीच हा तर्क देतील की राज्य सरकार चालवायचे असेल तर केंद्राशी जुळवून घ्यावे लागते. परंतु प्रश्न तर हा नक्कीच विचारला गेला पाहिजे की राज्य सरकार सुद्धा कोणत्या वर्गासाठी चालवायचे आहे. समाजवाद्यांच्या, प्रादेशिक पक्षांच्या दिखावी तर्कामागचे वर्गीय राजकारण समजणे गरजेचे आहे.

भारतातील भांडवलदार वर्ग हा एक "बहुराष्ट्रीय" भांडवलदार वर्ग आहे, आणि देशातील राष्ट्रीय बाजारपेठेमध्ये आणि श्रमशक्तीच्या लुटीमध्ये वाटण्यांकरिता, नफ्याच्या दराच्या सरासरीच्या स्पर्धेच्या रूपाने संघटित असा तो वर्ग आहे. या वर्गामध्ये विविध अंतर्गत अंतर्विरोध काम करतात.

प्रादेशिक पक्ष हे प्रामुख्याने प्रादेशिक भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. उदाहरणार्थ, प्रादेशिक बांधकाम व्यावसायिक, वाहतूक क्षेत्रातील भांडवलदार, धनिक शेतकरी, इत्यादी. राष्ट्रवादी पासून ते जदयू पर्यंत अशा सर्व प्रादेशिक पक्षांच्या निधीचा एक लक्षणीय वाटा प्रादेशिक भांडवलदारांकडून येतो. प्रत्येकच राज्यातील प्रादेशिक भांडवलदार वर्ग निश्चितपणे त्या राज्यात शक्य तितके राजकीय नियंत्रण मिळवण्याचा, त्या राज्यात कामगार-कष्टकऱ्यांनी निर्माण केलेल्या वरकडाचा जास्तीत जास्त वाटा हडपण्याचा आणि त्याकरिता राज्य सरकारांमध्ये आपले प्रतिनिधी पाठवण्याचा प्रयत्न करतोच. परंतु भारताच्या ऐतिहासिकरित्या एक देश म्हणून, एक संघराज्य म्हणून, एक राष्ट्रीय बाजारपेठ म्हणून झालेल्या विकासामुळे देशातील सर्वच राज्यातील भांडवलदारांना देशस्तरावर निर्माण झालेली बाजारपेठही खुणावते आणि म्हणूनच देशस्तरावर भांडवलदार वर्गाशी आणि केंद्रिय सत्तेशी तडजोडी करणे ही प्रादेशिक भांडवलदारांची आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांची गरज बनते. देशाच्या स्तरावर शक्तिशाली केंद्र सरकारच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेचे निर्णायक संचालन, आणि आर्थिक नेतृत्व देण्याचे काम बडा भांडवलदार वर्ग (टाटा, बिर्ला, अंबानी, अडानी, मित्तल, महिंद्रा, किर्लोस्कर, शॉ, सारख्या उद्योगपतींचा) करतो. एकंदरीत वरकडाच्या वाट्याच्या स्पर्धेतून बड्या भांडवलदार वर्गाचा व प्रादेशिक भांडवलदार वर्गाचा अंतर्विरोधही उभा राहतो, परंतु देशव्यापी बाजारात सहभागाकरिता बरेचदा प्रादेशिक भांडवलदारांना तडजोडीही कराव्या लागतात. याच तडजोडी केंद्र आणि राज्य सरकारांमधील संघर्षात्मक-सहयोगाच्या माध्यमातून अभिव्यक्त होत राहतात.

आज जेव्हा देशातील भांडवलाचा सर्वात मोठा नियंत्रक असलेला बडा भांडवलदार वर्ग निर्णायकपणे भाजपच्या पाठीमागे उभा आहे, अशावेळी सर्व प्रादेशिक पक्षांना, त्यांच्या पाठिराख्या भांडवलदार वर्गाला, भांडवली राजकारण करत असताना भाजपशी, संघाशी हातमिळवणी केल्याशिवाय पर्याय नाही. सत्तेकरिता या सर्व पक्षांच्या एकमेकांशी होणाऱ्या युत्या आणि नंतर आपसात होणारे संघर्ष हे अजून काही नाही तर भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांचे आपसातील वरकडाच्या वाटणीसाठी होणाऱ्या संघर्षांचे प्रतिबिंब आहेत. फॅसिझमच्या विचारधारेशी, संघाशी, भाजपशी यांची जवळीक, युत्या किंवा तडजोडी हे अजून काही नाही तर त्यांच्या भांडवली चरित्राची फलनिष्पत्ती आहे.

या पक्षांनी वेळोवेळी भाजपशी केलेल्या युत्या आणि तोडलेल्या युत्या या दोन्हींमागे एकच कारक आहे, आणि ते म्हणजे भांडवली सत्तेतील वाट्याची समीकरणे. विधानसभेत निवडून येणाऱ्या जागा हा या वाटण्यांकरिता "सर्वमान्य" निकष आहे, आणि सर्वसाधारणपणे जास्त जागा म्हणजे जास्त मंत्रीपदे आणि लुटीचा मोठा वाटा हे गणित सर्व पक्षांमध्ये मान्य आहे. त्यामुळेच जेव्हा भाजपविरोधात असंतोष वाढतोय, किंवा भाजपच तुमच्या पक्षाला मागे खेचतोय असे वाटू लागते, तेव्हा हे पक्ष भाजप विरोधात युती बनवण्याकडे जातात, आणि इतर वेळी याच जागा वाढवायला भाजपशीही युती करतात.

हे विसरता कामा नये की भांडवलदार वर्ग, मग तो बिर्ला-अंबानी सारखा मोठा भांडवलदार असो, राज्य स्तरावरील बिल्डर-ट्रान्सपोर्टर असो, वा छोटे वर्कशॉप चालवणारा छोटा उद्योजक असो, हे सर्व कामगार वर्गाच्या श्रमशक्तीच्या लुटीवरच गब्बर होत राहतात. त्यामुळे भांडवलदार वर्गाचा कोणता हिस्सा सत्तेत आहे याने कामगार वर्गाच्या जीवनात कोणताच गुणात्मक फरक पडत नाही.

## "भारत जोडो" यात्रा : कामगार वर्गाला भ्रमित करून भांडवलदारांच्या दावणीला जोडणारी यात्रा

आजकाल संघविरोधाचे अग्रणी नेते बनू पाहणाऱ्या राहुल गांधींनी मरणकळा आलेल्या काँग्रेस पक्षात नवचैतन्य फुंकण्यासाठी "भारत जोडो" यात्रा सुरू केली आहे. प्रश्न आहे की काँग्रेस पक्ष, जो नेहरूंच्याच काळापासूनच नव्हे तर त्याच्या निर्मितीपासूनच देशातील भांडवलदार वर्गाचा विश्वासू पक्ष राहीला आहे, ज्याने नेहरूंच्या फसव्या "समाजवादा"च्या नावाखाली देशातील उद्योगपतींच्या विकासाला धार्जिणी धोरणे राबवली आणि ज्याने 1991 मध्ये देशात औपचारिकरित्या खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरणाची (खाउजा) भांडवलदारांसाठी लुटीची खुली परवानगी देणारी नव-उदारवादी धोरणे लागू केली आणि 20 वर्षांहून जास्त काळ यशस्वीपणे राबवली, तो काँग्रेस पक्ष आज भारतात कोणाला कोणाशी जोडू पहात आहे?

काँग्रेस पक्षाकडे याचे उत्तर आहे की तो देशाला "जात-धर्मा"च्या पलीकडे जोडू पहात आहे आणि भाजपच्या जातीयवादी-धर्मवादी राजकारणाला एक जास्त सर्वसमावेशक पर्याय देऊ पहात आहे. काँग्रेसचा इतिहास आणि वर्गचरित्र याची ग्वाही आहे की देशातील जातीयवादी-धर्मवादी राजकारणासाठी परिस्थिती निर्माण करण्यात, त्याला खतपाणी घालण्यात आणि त्याच्याशी तडजोडी करण्यात काँग्रेस पक्षाचे सर्वात मोठे योगदान आहे. भांडवलदार वर्गाच्या सेवेकरिता लोकांमधील वर्गीय अंतर्विरोध लपवत त्यांना जात-धर्माच्या नावाने "एक" करण्याचा एक मार्ग आहे भाजपसारखा धार्मिक धृवीकरणाचा, तर दुसरा आहे काँग्रेससारखा सर्वधर्मसमभावाचा.

धर्मनिरपेक्षतेच्या ऐवजी काँग्रेसने सतत सर्वधर्मसमभावाचा विचार पुढे केला, आणि सर्वधर्मसमभावाच्या नावाने कधी मुस्लिम तर कधी हिंदू तर कधी इतर धर्मांच्या मतपेढीच्या तुष्टीकरणाचे राजकारणच केले. धर्म आणि राजकारण यांची पूर्ण फारकत करणारी धर्मनिरपेक्षता हा काँग्रेसचा विचार कधीच नव्हता, तर राजकारणाच्या सोयीने धर्मांना "समभावाने" वागवणारा विचार, म्हणजेच राजकारणात धर्माचा प्रवेश आणि वापर योग्य मानणारा विचारच काँग्रेसची विचारधारा होती आणि आहे. सर्व धर्मांना समान वागवता येणे हा एक भ्रम आहे. यामुळेच गैर-हिंदू अशा कोणत्याही धर्माच्या बाजूने घेतलेला निर्णय हा हिंदू-विरोधी म्हणून दाखवण्याची संधी स्वाभाविकपणे हिंदुत्ववादी पक्षांसाठी उपलब्ध करून दिली गेली आणि हिंदू मतांच्या धृवीकरणाच्या राजकारणाला पाठबळ दिले गेले. धर्माच्या आधारावर मतांच्या धृवीकरणाचे काम करण्याचा प्रयत्न काँग्रेसने सुद्धा तुलनेने अयशस्वीपणे स्वत:ही केला, उदाहरणार्थ राम मंदिराचे दरवाजे उघडणे वा शहाबानो खटल्यातील निकालाला उलटवणे. अशाप्रकारचा कोणतेही धार्मिक अस्मितेच्या आधारावर घेतलेला निर्णय त्याच्या प्रतिक्रियेची जमिन तयार करतोच. त्यामुळे एकीकडे शहाबानो खटल्यामध्ये काँग्रेसने मुस्लिम मतांची नाराजी टाळण्यासाठी महिला स्वातंत्र्याच्या विरोधात कायदा केला, तर त्याच्या प्रतिक्रियेमध्ये दुसरीकडे राम मंदिराचे दरवाजे पुजेकरिता उघडण्याची परवानगी दिली. हे सर्वधर्मसमभावाचे धोरणच आहे ज्यापायी काँग्रेस कधीही हिंदुत्ववाद्यांना निर्णायक पर्याय बनू शकली नाही. गांधींच्या खुनानंतर संघावर असलेली बंदी काँग्रेसनेच उठवली. संघ परिवाराच्या सर्व संघटनांना, त्या सतत जातीयवादी गरळ ओकत असतानाही खुली सूट देण्याचे कामही काँग्रेसनेच केले, शिवसेनेसारख्या फॅसिस्ट पक्षाला तर काँग्रेसनेच कामगार चळवळीला संपवण्याकरिता उभी केली, राम मंदिर आंदोलन चालू असताना काँग्रेसने भाजप समोर ना कोणते विचारधारात्मक आव्हान उभे केले ना अडवाणींचा रामरथ रोखला.

काँग्रेसच्या सर्वधर्मसमभावाच्या राजकारणाचे मूळही काँग्रेसच्या वर्गचरित्रात आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात आहे. देशातील भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काँग्रेसपुढे स्वातंत्र्यलढ्यात देशातील मोठ्या लोकसमुदायाचा पाठिंबा मिळवण्यासाठी हिंदू-मुस्लिम समुदायातील व्यापक कामकरी जनतेचा पाठिंबा मिळवणे गरजेचे होते. परंतु या समुदायांमधील धर्मवादी विचारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या हिंदू महासभा वा मुस्लिम लिगसारख्या संघटनांना ज्या जमिनदार वर्गाचा पाठिंबा होता, त्या जमिनदार वर्गासोबत देशी भांडवलदार वर्गाचा संबंध शत्रूत्वाचा नाही तर तडजोडीचाच होता, कारण की जमिनदारी विरोधात क्रांतिकारी संघर्ष उभा करण्यात भांडवलदार वर्गाला जनतेच्या क्रांतिकारी पुढाकाराची आणि उठावाची नेहमीच भिती होती. यामुळेच काँग्रेसने स्वातंत्र्यानंतरही जमिनदारी विरोधात क्रांतिकारी संघर्ष उभा करणे दूरच, उलट अशा क्रांतिकारी संघर्षांचे (उदा: तेलंगणा) दमनच केले. काँग्रेसचे म्हणजेच तत्कालीन भांडवलदार वर्गाचे हे तडजोडीचे वर्गचरित्रच होते जे त्याला धर्मवादी विचारांच्या विरोधात धर्मनिरपेक्षतेचे नाही तर सर्वधर्मसमभावाचे राजकारण करण्यास भाग पाडत होते. याच भांडवलदार वर्गाचे लांगुलचालन करण्याच्या धोरणाची परिणती आहे की आज जेव्हा देशांतर्गत जमिनदार वर्ग संपला आहे, आणि भांडवलाचे नग्न राज्य चालू आहे, आर्थिक संकट सतत तीव्र होत आहे, अशावेळी कामगार वर्गाच्या असंतोषाला नियंत्रित ठेवण्यासाठी, त्याला भरकटवण्यासाठी भांडवलदार वर्गाच्या एका प्रमुख हिश्श्याला धर्मवादी, हिंदुत्ववादी विचार जास्त आकर्षित करत आहे आणि तो "विश्वासू" काँग्रेसला सोडून फॅसिस्ट भाजपकडे वळला आहे.

भाजप जरी भांडवलदार वर्गाचा लाडका पक्ष बनलेला असला, तरी भांडवली लोकशाहीच्या चौकटीत आपल्याच दुसऱ्या पर्यायी पक्षाचे अस्तित्व जनतेमध्ये सतत गैर-वर्गीय मुद्द्यांवर ध्रुवीकरण करत राहण्यासाठी, विरोधकांमध्ये खोटी आशा टिकवण्यासाठी गरजेचे आहे. त्यामुळे काँग्रेसने चालू केलेली "भारत जोडो" यात्रा ही सर्व जातधर्मातील सर्व लोकांना एकमेकांशी जोडण्यासाठी नाही, बेरोजगारी-गरिबी दूर करून शोषण संपवून देश जोडण्यासाठी नाही, तर फॅसिझमची भिती दाखवत कामगार-कष्टकऱ्यांच्या हितांना त्यांचे शोषण करणाऱ्या त्यांच्याच जात-धर्मातील भांडवलदार वर्गाच्या हितासोबत जोडलेले ठेवण्यासाठी, फॅसिझमचा आधारस्तंभ असलेल्या भांडवलदार वर्गाचा दुसरा पर्याय टिकवण्यासाठी आहे.

## समाजवादी, उदारवादी राजकारणच फॅसिझमची जमिन तयार करते!

प्रादेशिक पक्ष, समाजवाद्यांचे पक्ष वा काँग्रेस, या सर्वांमध्ये समान आहे ती नवउदारवादी खाउजा धोरणे. सर्व सरकारी मालमत्तेचे खाजगीकरण करून आणि भांडवलदारांच्या घशात घालून, भांडवलदारांना श्रमाच्या लुटीची मुक्त परवानगी देणारी धोरणे राबवून, जागतिक भांडवलदार वर्गाशी युती करून देशातील बहुसंख्यांक कामगार-कष्टकरी वर्गाच्या माथी अभूतपूर्व बेरोजगारी, गरिबी, महागाई, दैन्यावस्था लादण्याचे काम खाउजा धोरणांनी केले. सन 2005 पासून काँग्रेसच्या नेतृत्वातील युपीए सरकारने चालवलेल्या या अफाट ओरबाडणीमुळे, या धोरणांचा तार्कीक

पान 5 वर

# कामगार वर्गाचा पक्ष कसा असावा (तिसरे पुष्प)

## कामगारांचा आर्थिक संघर्ष आणि राजकीय प्रचाराचा प्रश्न

✍सनी

देशातील क्रांतिकारकांसमोर कामगार आंदोलनात असलेले अर्थवादी विचलन हे एक मोठे आव्हान आहे. केंद्रिय ट्रेड युनियन्सच्या दुरुस्तीवादी दगाबाजी तर आहेतच, सोबतच अनेक तथाकथित "क्रांतिकारी" सुद्धा अर्थवादाच्या पुरात वाहून गेले आहेत. कामगारवाद, अराजकतावादी संघाधिपत्यवाद आणि दुसरीकडे डाव्या अतिरेकपंथाचा गैर-क्रांतिकारी प्रवाह कामगारांमध्ये क्रांतिकारी राजकारण स्थापित होऊ देत नाहीत. या लेखमालेच्या मागच्या भागात आम्ही कामगार वर्गाच्या पक्षाच्या राजकीय प्रचारावर महत्त्वाचे वक्तव्य केले होते. परंतु याचा अर्थ हा होत नाही की कामगार वर्गाचा पक्ष आर्थिक मागण्या करत नाही. कामगार वर्गाचा पक्ष कामगारांच्या आर्थिक संघर्षांमध्ये सुद्धा सहभागी होतो कारण हा आर्थिक संघर्ष श्रम आणि भांडवलामधील अंतर्विरोधाचीच अभिव्यक्ती असतो आणि त्याला नेतृत्व देऊनच कम्युनिस्ट क्रांतिकारी शक्ती या अंतर्विरोधाला राजकीय अभिव्यक्ती देऊ शकतात, म्हणजेच त्याला भांडवलदार वर्ग आणि सर्वहारा वर्गामधील राजकीय अंतर्विरोधाचे स्वरूप देऊ शकतात. दुसऱ्या शब्दांमध्ये, फक्त याच माध्यमातून समाजवादाचे आदर्श आणि तत्त्वे, म्हणजेच समाजवादी राजकीय चेतना कामगार आंदोलनामध्ये आणली जाऊ शकते. कम्युनिस्ट या अर्थवादी तर्काला विरोध करतात की आर्थिक संघर्षाच्या प्रक्रियेत कामगार स्वत:हून, स्वत:स्फूर्तपणे, राजकीय चेतना प्राप्त करतात. लेखमालेच्या या पुष्पामध्ये आम्ही आर्थिक संघर्षांवर पक्षाचा रोख, ट्रेड युनियन राजकारण आणि कम्युनिस्ट राजकारणातला फरक तसेच अतिडावे विचलन आणि ट्रेडयुनियनवादी राजकारणाच्या संदर्भात थोडक्यात आमचे मत मांडत आहोत.

कम्युनिस्ट पक्ष आपल्या प्रचारात कामगारांना फक्त आर्थिक संघर्षांपुरतेच मर्यादित ठेवत नाही, तर तो कामगारांना एका राजकीय वर्गाच्या रूपाने जागृत, एकत्रित, संघटित करून त्यांना त्यांच्या ऐतिहासिक लक्षाशी परिचित करवतो. लेनिन म्हणतात की : "कामगारांमध्ये राजकीय वर्ग-चेतना बाहेरूनच आणली जाऊ शकते, म्हणजे फक्त आर्थिक संघर्षांच्या बाहेरून, कामगार आणि मालकांच्या संबंधांच्या क्षेत्राबाहेरून. ती ज्या एकमात्र क्षेत्रातून येऊ शकते, ते राज्यसत्तेचे तसेच सरकार सोबत सर्व वर्गांच्या व स्तरांच्या संबंधांचे क्षेत्र आहे, ते सर्व वर्गांच्या आपसातील संबंधांचे क्षेत्र आहे."

"... सामान्य कामगारांकडून त्यांच्या आंदोलनाच्या प्रक्रियेत विकसित स्वतंत्र विचारधारेचा प्रश्न निर्माण होत नाही, म्हणून फक्त हेच मार्ग शिल्लक राहतात: एक तर भांडवली विचारधारेला निवडावे किंवा समाजवादी विचारधारेला. मधला कोणताच मार्ग नसतो. (कारण मानवजातीने कोणतीच "तिसरी" विचारधारा निर्माण केलेली नाही, आणि याशिवाय जो समाज वर्गविरोधांमुळे विभाजित आहे, त्यामध्ये कोणतीही गैर-वर्गीय किंवा वर्गेतर विचारधारा असूही शकत नाही). त्यामुळे समाजवादी विचारधारेच्या महत्त्वाला कोणत्याही प्रकारे कमी करून जोखणे, तिला थोडेही नाक मुरडणे याचा अर्थ आहे भांडवली विचारधारेला मजबूत करणे."

लेनिनद्वारे प्रस्तुत या उक्तीचा विरोध करत रशियन अर्थवादी वर्तमानपत्र `रोबोचेये द्येलो' त्यांच्या स्वत:स्फूर्ततावादी विचलनामुळे सांगत असे की कामगार वर्ग वेतन-भत्त्यांसाठी लढताना राजकीय चेतना स्वत:हूनच निर्माण करतो. कम्युनिस्ट राजकारणाला ट्रेडयुनियनवादी राजकारणात संकुचित करताना अर्थवादी या स्वत:स्फूर्ततेच्या सिद्धांताला "टप्प्यांचा सिद्धात" आणि "प्रक्रियेच्या रूपात कार्यनिती" च्या रूपाने व्याख्यायित करतात. "टप्प्यांच्या सिद्धांता"नुसार कम्युनिस्टांनी कामगारांच्या वर्गचेतनेच्या स्तरानुसारच लढले पाहिजे आणि त्यांच्यामध्ये राजकीय प्रचार करू नये. "प्रक्रियेच्या रूपात कार्यनिती"नुसार जनतेमध्ये काम करण्यासाठी अगोदर एखादी योजना बनवणेच चुकीचे आहे, आणि अशी रणनिती आंदोलनादरम्यानच विकसित होत असते. अर्थवादाचे हे "टप्पांचा सिद्धांत" व "प्रक्रियेच्या रूपात कार्यनिती"चे सिद्धांत मार्क्सवाद-विरोधी आहेत. हे सिद्धांत कम्युनिस्ट पक्षाला कामगार वर्गाच्या अग्रदलाऐवजी शेपूट बनवण्याचेच प्रस्ताव आहेत. कम्युनिस्ट पक्ष स्वत:च कामगार वर्गाच्या सर्वात उन्नत तत्वांची फळी आहे, आणि तिचे कामच आहे कामगार वर्गातील व्यापक जनसमुदायांना एका योग्य विचारधारेच्या आणि राजकारणाच्या माध्यमातून नेतृत्व देणे. स्वत:स्फूर्ततावादाचा प्रस्ताव पुढे आणणारा व्यक्ती इच्छा असो वा नसो, जाणीवपूर्वक वा अजाणतेपणी, कम्युनिस्ट राजकारणाला कमजोर करतो आणि कामगार वर्गावर भांडवलदार वर्गाच्या विचारधारेला प्रभावी होण्याची संधी देतो. अर्थवादी विचलनाचा हल्ला मार्क्सवाद-लेनिनवादावर असतो. इतिहासात अर्थवादाच्या प्रत्येक प्रकाराचा विचारधारात्मक निशाणा मार्क्सवादावरच होता. लेनिनच्या काळात 'टीकेच्या स्वातंत्र्या'च्या आडून मार्क्सवादावर हल्ले केले गेले. आजसुद्धा मार्क्सवादामध्ये 'सुधार' आणि '21 व्या शतकातील समाजवादा'च्या सर्व संकल्पनांचा निशाणा अनेकदा लेनिनवादी पार्टी, राज्यसत्ता तसेच क्रांतीची तत्त्वे आणि कामगारवर्गाच्या अधिनायकत्वाचा सिद्धांतच असतात. लेनिनने या प्रवृत्तींवर टीकेसोबतच त्यांच्या राजकीय आणि सांघटनिक अभिव्यक्तीवरही प्रहार केला. राजकीयरित्या त्या ट्रेडयुनियनवादी राजकारणाच्या रूपाने अभिव्यक्त होतात. त्या कामगार आंदोलन आणि समाजवादामध्ये एक दरी निर्माण करतात. जेव्हाकी "सामाजिक लोकशाही" (याला 'कम्युनिझम' असे वाचा – लेखक) कामगार आंदोलन आणि समाजवादाचा मेळ आहे. त्याचे काम कामगार आंदोलनाची प्रत्येक वेगवेगळ्या अवस्थेत निष्क्रियपणे सेवा करणे नाही, तर संपूर्ण आंदोलनाच्या हितांचे प्रतिनिधित्व करणे, या आंदोलनाला त्याचे अंतिम लक्ष्य तसेच त्याचे राजकीय कार्यभार सांगणे, तसेच त्याचे राजकीय आणि विचारधारात्मक स्वातंत्र्य वाचवणे हे आहे. सामाजिक लोकशाही (कम्युनिझम) पासून तुटून कामगार आंदोलन नगण्य बनते आणि अनिवार्यपणे भांडवली बनते. परंतु आर्थिक (याला अर्थवादी असे वाचा - लेखक) संघर्ष करून कामगार आपले राजकीय स्वातंत्र्य हरवतात...आपले मूख्य आणि मूळ काम कामगार वर्गाचा राजकीय विकास आणि राजकीय संघटनेच्या कार्यामध्ये मदत करणे आहे. जे लोक या कामाला मागे ढकलतात, सर्व विशेष कामांना आणि संघर्षांच्या विशिष्ट पद्धतींना या मुख्य कामाच्या अधीन आणण्यास नकार देतात, ते चुकीच्या मार्गावर चालले आहेत, आणि आंदोलनाचे मोठे नुकसान करत आहेत." (लेनिन)

दुसरी गोष्ट, याचा अर्थ असा नाही की कम्युनिस्ट कामगारांच्या जीवनातील दैनंदिन ठोस प्रश्नांना उचलत नाहीत. नक्कीच कम्युनिस्ट पक्ष हे करेल. कम्युनिस्ट कामगारांच्या जीवनाच्या ठोस प्रश्नांना उचलतात कारण फक्त याच माध्यमातून ते कामगार वर्गाला राजकीयदृष्ट्या जागृत करू शकतात, दैनंदिन जीवनातील प्रश्नांवर संघटित होण्याच्या माध्यमातून या प्रश्नांचे भांडवली व्यवस्थेशी असलेले नाते ते कामगारांसमोर उघड करू शकतात, त्यांना हे समजावू शकतात की त्यांच्या जीवनाचे आणि कामाच्या जागी असलेले प्रश्न काही अकस्मात निर्माण झालेले नाहीत, तर भांडवली व्यवस्थेने जन्माला घातलेले प्रश्न आहेत, त्यांचा शत्रू एक मालक नाही तर मालकांचा संपूर्ण वर्ग आणि त्याची राज्यसत्ता आहे. आणि याच माध्यमातून ते कामगार वर्गाला एका राजकीय वर्गाच्या रूपाने म्हणजेच सर्वहारा वर्गाच्या रूपात संघटित करू शकतात आणि त्याच्या राजकीय चेतनेला सर्वात उच्च म्हणजेच पक्षाच्या राजकीय स्तरावर विकसित करू शकतात. म्हणूनच लेनिन सांगतात: "कम्युनिस्टांनी कामगारांच्या सर्व सुरुवातीच्या संघर्षांमध्ये आणि आंदोलनांमध्ये भाग घेतला पाहिजे, तसेच कामाचे तास, कामाची परिस्थिती, मजुरी इत्यादींवरून तसेच भांडवलदारांमध्ये होणाऱ्या सर्व संघर्षांमध्ये कामगारांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे. कम्युनिस्टांनी कामगार वर्गाच्या जीवनातील ठोस प्रश्नांवरही लक्ष दिले पाहिजे. या प्रश्नांची योग्य समजदारी प्राप्त करून देण्यासाठी कामगारांची मदत केली पाहिजे. त्यांनी कामगारांचे लक्ष सर्वात स्पष्ट अन्यायांकडे वेधले पाहिजे आणि त्यांच्या मागण्यांना व्यावहारिकरित्या तसेच अचूकपणे सूत्रबद्ध करण्यात मदत केली पाहिजे. याप्रकारे ते कामगार वर्गामध्ये एकजूटीची चेतना आणि देशातील सर्व कामगारांमध्ये एका एकीकृत कामगार वर्गाच्या रूपाने, जो कामगार वर्गाच्या जागतिक सेनेचा एक हिस्सा आहे, सामुदायिक हितांची चेतना जागृत करू शकतील. फक्त अशाप्रकारच्या सुरुवातीच्या दैनंदिन कर्तव्यांना पूर्ण करून तसेच कामगार वर्गाच्या सर्व संघर्षांमध्ये भाग घेऊनच कम्युनिस्ट एका खऱ्या कम्युनिस्ट पक्षाच्या रूपात विकसित होऊ शकतात. फक्त या प्रकारच्या पद्धतींना अवलंबूनच ते घासून गुळगुळीत झालेल्या, तथाकथित शुद्ध समाजवादी प्रचार करणाऱ्या, फक्त नवीन सदस्य भर्ती करणाऱ्या आणि सुधारणा तसेच सर्व असंसदीय शक्यता व अशक्यतांचा वापर करण्याच्या बाता करणाऱ्या प्रचारकांपासून स्वत:ला वेगळे करू शकतील. शोषकांविरोधात चालणाऱ्या शोषितांच्या दैनंदिन संघर्षांमध्ये आणि वादविवादांमध्ये पार्टी सदस्यांचा आत्मत्यागी आणि उत्साही सहभाग ना केवळ कामगारवर्गाच्या अधिनायकत्वाच्या विजयासाठी, तर त्यापेक्षाही अधिक या अधिनायकत्त्वाला कायम ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. भांडवलशाहीच्या हल्ल्यांविरोधात छोटे-छोटे संघर्ष करण्याच्या प्रक्रियेतच कामगार वर्गाचे सुव्यवस्थित नेतृत्व करू शकण्याची क्षमता प्राप्त करत कामगारवर्गीय जनसमुदायांचे अग्रदल ते बनू शकतील."

एकंदरीत हे की कम्युनिस्ट आंदोलन सुधारणांसाठीच्या लढाईला "समाजवादासाठीच्या क्रांतिकारी संघर्षाच्या अधीन अशाप्रकारे ठेवते, जसे की एखादा भाग त्याच्या पूर्णतेच्या अधीन असतो." हीच ती समजदारी आहे जी एकीकडे आपल्याला अर्थवादी विचलनापासून रोखते तर दुसरीकडे "डाव्या" विचलनापासूनही वाचवते, जो वास्तव परिस्थितीबद्दल वस्तुगत समजदारी न बाळगता शेखचिल्लीप्रमाणे त्याच्या खूप पुढे उड्या मारत चालतो. या दोन्ही टोकांचा जन्म स्वत:स्फूर्ततावादापुढे नतमस्तक झाल्यामुळे होतो. "अर्थवादी आणि अतिरेकपंथी स्वत:स्फूर्ततावादाच्या वेगवेगळ्या टोकांसमोर नतमस्तक होतात. अर्थवादी `शुद्ध आणि सामान्य कामगार आंदोलना'पुढे नतमस्तक होतात, तर अतिरेकपंथी त्या बुद्धिजिवींच्या आक्रमक रोषापुढे नतमस्तक होतात जे क्रांतिकारी आंदोलन आणि कामगार वर्गाच्या आंदोलनाला एकजूट करण्याच्या क्षमतेत वा परिस्थितीत नसतात." (लेनिन)

अतिडावे राजकारण आर्थिक मागण्यांना घेऊन लढण्याला आणि ट्रेडयुनियन बनवून संघर्ष करण्यालाच दुरुस्तीवाद घोषित करण्यापर्यंत पोहोचते. आपण या चुकीच्या समजदारीचा सुद्धा बुरखा फाडला पाहिजे. लेनिनने या विचलनावर टीका करत म्हटले की "कामगारांनी कामाच्या स्थितींमध्ये जुजबी सुधारणांना घेऊन चालवलेल्या आंदोलनांप्रति तिरस्काराचा रोष स्विकारणे किंवा कम्युनिस्ट कार्यक्रम आणि अंतिम लक्ष्यप्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतिकारी संघर्षाच्या आवश्यकतेच्या नावाने त्याप्रती निष्क्रियतेचा रोख स्विकारणे ही कम्युनिस्टांसाठी मोठी चूक ठरेल. कामगार आपल्या ज्या मागण्यांना घेऊन भांडवलदारांशी लढण्यासाठी तयार आणि सहमत असतील, मग त्या कितीही छोट्या किंवा क्षुल्लक असोत, कम्युनिस्टांनी संघर्षात सामील न होण्यासाठी त्या मागण्या छोट्या असल्याचा बहाणा करता कामा नये. आपल्या आंदोलनात्मक कारवायांविरोधात अशाप्रकारच्या आरोपांना यत्किंचितही वाव नसावा की आपण कामगारांना मूर्खतापूर्ण संपासाठी किंवा इतर बावळट कारवायांकरिता भडकावतो आणि भरीस पाडतो. संघर्षरत जनतेमध्ये कम्युनिस्टांनी ही प्रतिष्ठा मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे की ते हिंमतवान आणि संघर्षांमध्ये प्रभावी भूमिका निभावणारे लोक आहेत."

लेनिनच्या शिकवणीच्या आणि रशियन क्रांतीच्या उजेडात आपण भारताच्या क्रांतिकारी आंदोलनात अर्थवादी व अराजकतावादी

पान 11 वर

# आपल्या वाट्याचे आकाश परत मिळवण्यासाठी आपण काय केले पाहिजे ?

## सावित्री-फातिमा अभ्यास गटाच्या कार्यांचा एक अहवाल

✎ ललिता

देशातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी शाळा उघडली तेव्हा त्यांनी एक बीज रोवले. हे बीज एक झाड बनले आणि या झाडाने आपली मुळे दूरवर पसरवली, मुली आणि स्त्रियांना, विशेषत: ऐतिहासिकदृष्ट्या दडपलेल्या जातींतील मुली आणि स्त्रियांना शिक्षण घेण्याचे मार्ग खुले केले. हे झाड, जवळपास दोनशे वर्षांनंतरही फळ देत आहे आणि देशभरात ज्ञानाची बीजे रोवत गेले आहे. जातीवादी समाजाच्या रोषाचा सामना करणाऱ्या दलित, विधवांसाठी या दोघींनी शाळेचे दरवाजे उघडले आणि मुलींना व कामगारांना शिक्षण घेण्यासाठी रात्रीच्या शाळा आणि ग्रंथालये उघडली. फातिमा शेख यांच्यासमवेत सावित्रीबाईंनी एक क्रांती घडवून आणली जिने त्यांनंतर अनेक स्त्रियांना त्यांच्या घरातील अंधारातून बाहेर काढण्यासाठी, प्रगतीच्या प्रकाशात आणण्यासाठी, एक चांगले जग निर्माण करण्यासाठी त्यांच्या स्वप्नांना बळ दिले. फातिमाने सावित्रीबाईंना तिची शाळा चालवण्यासाठी घर वापरण्याचे निमंत्रण दिले आणि ब्राह्मणवादी समाजात समानता आणि न्यायाचा संदेश देणारे बंधन तयार केले. परंतु आज या झाडाच्या वाढीला वाळवीसारखे पोखरण्याचे काम भांडवली-बाजाराची व्यवस्था करत आहे आणि कामगार-कष्टकरी वर्गातून येणाऱ्या स्त्री-पुरुषांकरिता शिक्षणाचे दरवाजे अधिकाधिक बंद करत आहे.

सावित्री-फातिमाचे स्वप्न जपत, सावित्री-फातिमा यांच्या क्रांतिकारी मैत्रीच्या वारशाचे स्वतःला मशाल वाहक मानणारी 'स्त्री मुक्ती लीग' भांडवली चौकटीला आह्वान देत स्त्री-मुक्तीच्या स्वप्नाकडे वाटचाल करत आहे. आपल्यावर राज्य करणाऱ्या भांडवली आणि जातीयवादी फॅसिस्टांना आव्हान देणारी मैत्री वाढवण्याचा स्त्री मुक्ती लीगचा संकल्प दररोज अधिकाधिक वाढत आहे. स्त्री मुक्ती लीग अंधश्रद्धा, अज्ञानाच्या भरतीच्या विरोधात पोहत आहे आणि सत्य, न्याय, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि लैंगिक-समानतेसाठी लढत आहे.

आपल्यासमोर अनेक आव्हाने आहेत. महिलांना त्यांची ओळख, त्यांची स्वप्ने, त्यांचे व्यक्तिमत्व हिरावले जाण्यापासून ते शिक्षण मिळवण्यापर्यंत पावलोपावली अनेक अडथळे आहेत. पितृसत्ताक कुटुंबे मुलींना





शिक्षणासाठी प्रोत्साहन देत नाहीत. याच पितृसत्तेच्या विचारांना बळी पडलेल्या स्त्रिया स्वतःच्या स्वप्नांना पायदळी तुडवतात जेणेकरून भांडवली-ब्राह्मणी आणि पुरुषसत्ताक व्यवस्था त्यांच्यावर अत्याचार करत राहील. घरातील काळजीवाहकाच्या पारंपारिक भूमिकेबरोबरच, भांडवली व्यवस्थेत आज स्त्रिला इतरांच्या घरात घरगुती कामगार म्हणून किंवा व्यवसायासाठी कंत्राटी पद्धतीने दररोज 12 तासांपेक्षा जास्त काम करण्यास भाग पाडले जाते. मालकांच्या आणि इतरांच्या हातून फसवणूक होण्याची शक्यता देखील खूप असते कारण ती आकडे वाचू शकत नाही आणि गणितही करू शकत नाही.

कामगार-कष्टकरी वर्गातून येणाऱ्या अशाच सर्व महिला साथींसाठी स्त्री मुक्ती लीगने सावित्री फातिमा अभ्यास गट सुरू केले आहेत, जेणेकरुन महिलांना या शोषणकारी व्यवस्थेवर प्रहार करण्याचे शिक्षण मिळावे आणि त्याकरिता आशेचे बीज रोवले जावे. अभ्यास-गटातर्फे आठवड्यातून 2-3 दिवस मुंबईतील मानखुर्द-गोवंडी-शिवाजीनगर भागात रफिक नगर, गौतम नगर आणि साठे नगर येथे वर्ग चालवले जातात. तिन्ही अभ्यास केंद्रांमध्ये, दर आठवड्याला सुमारे 15-20 महिला उत्साहाने वर्गांना उपस्थित राहतात.

ही केंद्रे कोणत्याही सदस्याच्या घरात तात्पुरती जागा मिळवून चालवली जातात. यातून महिलांमध्ये या वर्गांबद्दल हक्काची भावना निर्माण होते आणि अभ्यासासाठी त्यांच्या वेळापत्रकातून त्या वेळ काढू शकतात. एकत्र येऊन सर्वजणी पुस्तक वाचतात, लिहितात आणि अनेक भाषांमधील वर्णमाला शिकण्यासाठी एकत्र अभ्यास करतात. महिलांना वर्गात जे शिकवले जाते त्यापेक्षा अधिक शिकण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या शिक्षणाला इतर उपक्रमांनी पूरक करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

वर्ग आणि जातीच्या आधारावर शोषणमुक्त जगाची, प्रगती, आशा, समानतेची गाणी सर्व महिला मिळून गातात आणि जग बदलण्याचा निर्धार व्यक्त करतात. हे वर्ग महिलांना इंग्रजी, हिंदी, मराठी आणि गणित शिकण्यासाठीच फक्त प्रोत्साहित करत नाहीत तर गोवंडी आणि मानखुर्दमधील महिलांवर परिणाम करणाऱ्या दैनंदिन समस्यांवरही चर्चा करतात. सर्व मिळून हवामान बदलावर चर्चा करतात आणि आसपास असलेल्या विषारी खराब हवेशी या प्रश्नाला जोडून पाहतात. दिल्लीजवळील खोरीगावातील लोकांची घरे पाडण्यापासून ते अंगणवाडी कामगारांच्या आंदोलनापर्यंत, या वर्गांमध्ये शिकणाऱ्या महिला त्यांची मते आणि त्यांची एकता व्यक्त करतात. वैज्ञानिक जाणीवेची गरज आणि समाजाने निर्माण केलेल्या भेदभावकारी लिंगभेदाविषयी सुद्धा सर्व मिळून चर्चा करतात.

मूलभूत जीवन कौशल्ये शिकण्यावर आम्ही जितका जोर देतो, तितकाच महिला, कामगार आणि या समाजाचे कष्टकरी सदस्य म्हणून आपल्यावर परिणाम करणाऱ्या असंख्य समस्यांबद्दलची जाणीव सुद्धा आम्ही स्वतःमध्ये निर्माण करू इच्छितो. अय्यंकाली, दुर्गा भाभी, प्रितिलता वड्डेदार यांसारख्या क्रांतिकारकांच्या संघर्षांची आठवण त्यांच्या जन्मदिनी घडवलेल्या चर्चांमधून केली जाते. महिलांना राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवर पुस्तके, वर्तमानपत्रे, कविता उपलब्ध करून देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे जेणेकरुन त्यांचे अ-राजकीयीकरण करण्यासाठी निरंतर काम करणाऱ्या पितृसत्ताक शक्तीविरोधात लढता येईल. अभ्यासगटाद्वारे असे दिसून आले आहे की ज्या स्त्रिया जास्त वेळ काम करतात आणि शेवटी घरातील कामांसाठी घरी येतात त्या सुद्धा वेळ काढतात आणि स्वेच्छेने शिकण्यासाठी येतात.

जोपर्यंत शिक्षण ही केवळ पैसेवाल्यांसाठी असलेली वस्तू राहील, जोपर्यंत रोजगाराचा अधिकार प्रत्येक स्त्री-पुरुषापर्यंत पोहोचणार नाही, जोपर्यंत आपल्या जीवनाचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणारा समाज निर्माण होत नाही, भांडवलाच्या कचाट्यातून जोपर्यंत शिक्षण मुक्त होत नाही, शिक्षणाला अधिकार मानणारा समाज जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत कामगार-कष्टकरी स्त्रिया कधीही स्वत:ला मुक्त करू शकणार नाहीत. सावित्री फातिमा अभ्यास गट याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

(लेखिका स्त्री मुक्ती लीगच्या कार्यकर्त्या आहेत.)

# मोदीने ओतले महागाईच्या आगीत तेल! आता अन्नधान्यावर सुद्धा जी.एस.टी.!

- पूजा

जिथे एकीकडे देशातील कष्टकरी जनता महागाईने बेजार आहे, दैनंदिन जीवनातील गरज सुद्धा भागवणे कठीण जात आहे, गॅस -सिलेंडर, खाद्यतेल, पेट्रोल, इत्यादींच्या किंमती आधीच आकाशाला भिडल्या आहेत तिथे मोदी सरकारने जनतेची पिळवणूक करण्यासाठी महागाईच्या आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. 18 जुलै, 2022 पासून अन्न पदार्थांवर 5 टक्के जीएसटी आकारण्यात येणार आहे. 18 जुलैपूर्वी विशिष्ट वेष्टनात किंवा कंटेनरमध्ये असलेल्या आणि नोंदणीकृत ब्रॅण्ड असलेल्या खाद्यपदार्थांवरच जीएसटी लागत असे. सोमवारपासून पॅकबंद करून त्यावर लेबल लावून दिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांवर 5 टक्के जीएसटी लागू झाला. पूर्वी तांदूळ, डाळी, गहू व गव्हाचे पीठ जर ब्रॅण्डेड असेल तर त्यावर 5 टक्के जीएसटी लागू होत असे. आता तांदूळ, डाळी, तृणधान्ये, गहू व गव्हाचे पीठ पॅक करून, लेबल लावून विक्री करताना 5 टक्के जीएसटी लागू झाला आहे. दही, लस्सी यांसारखे पदार्थ 25 लिटरपेक्षा कमी वजनामध्ये पॅक करून विक्री केल्यास 5 टक्के जीएसटी लागू असेल. 25 किलो पेक्षा कमी कोणत्याही खाद्यपदार्थांच्या, ज्यावर कुठल्याही संस्थेचं लेबल लावलं आहे, किंमतीत वाढ होईल. गव्हाचे पीठ, तांदूळ, डाळी, तेल, दही, इत्यादी अत्यंत मूलभूत अन्नपदार्थांचे महाग होणे म्हणजे गरीब जनतेला उपाशी मारण्याची संपूर्ण सोय मोदी सरकारने केली आहे.

### मोदी सरकारच्या भूलथापा!

2017 मध्ये जेव्हा मोदी सरकारने जीएसटी हा कर 'महागाई कमी करेल' असा भल्या मोठ्या प्रमाणावर गाजावाजा करत निर्णय घेतला तेव्हा संपूर्ण देशासमोर हे आश्वासन दिलं की अन्नपदार्थांवर जीएसटी आकारला जाणार नाही. पण खोटी आश्वासने देणे हे तर मोदी सरकारचे धर्मकर्तव्य आहे! म्हणून 2 करोड रोजगार, प्रत्येकाच्या खात्यात 15 लाख रुपये आणि इतर अनेक आश्वासनांप्रमाणे मोदी सरकारने या आश्वासनाला देखील हरताळ फासत, स्वतःची भांडवलदार वर्गाप्रती असलेली निष्ठा दाखवून दिली आहे. महागाई संपवण्याची आश्वासनं देत सत्तेत आलेल्या मोदी सरकारच्या काळात न भूतो, न भविष्य अशी महागाई आज देशातील कष्टकरी जनतेला छळत आहे. पण यावर चकार शब्दही न बोलता मोदी सरकार सतत जनतेला जाती - धर्माच्या भांडणात गुंतवून ठेवण्यासाठी लव जिहाद सारखे मुद्दे घेऊन येत आहे. जेणेकरून जनतेने सरकारला ' रोजी रोटीचे' प्रश्न विचारू नयेत, आपल्या हक्क - अधिकारांसाठी बंड करू नये.

### जीएसटी: सर्व बोजा गरिब, कामगार-कष्टकऱ्यांवरच!

जीएसटी म्हणजेच वस्तू आणि सेवा कर हा एक अप्रत्यक्ष कर आहे जो कुठलीही वस्तू किंवा सेवा खरेदी केल्यानंतर आपण सरकारला देत असतो. 0 टक्के, 5 टक्के, 12 टक्के,18 टक्के, 28 टक्के ह्या 5 टप्प्यांवर वेगवेगळ्या वस्तू आणि सेवांवर हा कर आकारला जातो. 2017 मध्ये पूर्वी लागू असलेली व्हॅट, ऑक्ट्रॉय, अबकारी कर, विक्रीकर यांची करप्रणाली मोडीत काढण्याचा दावा करत मोदी सरकारने फार बदल न करता जनतेला तशीच पिळणारी करप्रणाली नवीन नाव देऊन अस्तित्वात आणली. ज्या अंतर्गत मोदी सरकार हळू हळू

पान 2 वर

# 11 ऑगस्ट, क्रांतिकारी खुदिराम बोस यांच्या शहादत दिना निमित्त


✒ प्रवीण एकडे

11 ऑगस्ट म्हणजे खुदिराम बोस यांचा शहादत दिवस. वयाच्या अवघ्या 18 व्या वर्षी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या या क्रांतिकारकाला इंग्रजांनी फासावर लटकवले. कोण होते खुदिराम बोस आणि काय आहे त्यांचा वारसा?

खुदिराम बोस यांचा जन्म बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील हबिबपुर या गावी झाला. 3 डिसेंबर 1889 रोजी जन्मलेले खुदिराम बोस लहान असतानाच त्यांच्या आई-वडिलांचे निधन झाले. त्यांच्या मोठ्या बहिणीने त्यांचा पुढे सांभाळ केला. खुदिराम बोस लहान असतानाचा काळ तो होता जेव्हा ब्रिटिश साम्राज्यवादाचे दमन प्रचंड वाढले होते. शालेय जीवनापासूनच खुदिराम बोस यांनी राजकीय गतिविधींमध्ये सहभाग घेण्यास सुरुवात केली होती. नववीत असतानाच शाळा सोडून देऊन ते स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झाले. 1904 मध्ये त्यांच्या बहिणीला काही न सांगता खुदिराम बोस घर सोडून निघून गेले. काही दिवसांनी त्यांची मोठी बहीण अनुरूपा देवी यांना एक पत्र मिळाले ज्यात खुदिराम बोस यांनी लिहिले होते की त्यांना आता सामान्य गृहस्थाचे जीवन जगणे शक्य नाही आणि त्यांना शिक्षण पुढे सुरू ठेवण्याची सुद्धा इच्छा नाही. संन्यास घेणार असल्याचे त्यांनी त्या पत्रामध्ये लिहिले होते. खुदिराम बोस अत्यंत संवेदनशील होते. मिदनापूर मध्ये जेव्हा कॉलेरा ची साथ पसरली तेव्हा ते लोकांची सेवा करण्यासाठी सर्वात पुढे होते.

सत्येन बसू यांच्या नेतृत्वाखाली खुदिराम यांनी आपल्या क्रांतिकारी जीवनाची सुरुवात केली. ते एका गुप्त क्रांतिकारी संघटनेचे सदस्य बनले. बंगालमध्ये शारीरिक व्यायामासाठीचे अनेक गट सुद्धा निर्माण झालेले होते. ब्रिटिश साम्राज्यवादाचा मुकाबला करण्यासाठी तरुणांना सज्ज करणे हा मुख्य उद्देश या गटांचा होता. मातृसदन नावाच्या एक गटामध्ये खुदिराम बोस सहभागी झाले. पुढे ते या गटाचे एक प्रमुख व्यक्ति देखील बनले. 1905 मध्ये बंगालमधील राजकीय वातावरण अशांत बनले होते. जनतेच्या असंतोषाचे रूपांतर जर संघटित संघर्षामध्ये झाले तर भारतातील ब्रिटिश साम्राज्यवादाचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते याची जाणीव ब्रिटिश राज्यसत्तेला झाली होती. म्हणूनच इंग्रजांनी फोडा आणि झोडा च्या नितीवर काम करत धार्मिक आधारावर बंगालची फाळणी करण्याचा प्रस्ताव आणला. ही फाळणी करण्यामागचा मुख्य उद्देश होता धार्मिक आधारावर जनतेमध्ये फुट पाडणे. या फाळणीच्या प्रस्तावाविरोधात बंगालच्या जनतेकडून कडाडून विरोध केला गेला. वायसराय कर्जनने मात्र या विरोधाला न जुमानता बंगालची धार्मिक आधारावर फाळणी करण्याचा निर्णय पक्का केला. या फाळणी विरोधात जनतेचा तीव्र प्रतिसाद उमटला. 1905 च्या बंगालच्या फाळणी नंतर सुरू झालेल्या स्वदेशी आणि बहिष्कार चळवळीमध्ये खुदिराम बोस यांनी सक्रिय सहभाग घेतला. इंग्रजांनी बनवलेल्या वस्तूंची विक्री बंद करण्यापासून ते विदेशी कपड्यांची होळी करण्यामध्ये ते सहभागी होते. ते जोशाने या आंदोलनामध्ये साम्राज्यवादविरोधी घोषणा द्यायचे.

पुढे 28 फेब्रुवारी 1906 मध्ये त्यांना सोनार बांगला नावाच्या ब्रिटिश साम्राज्यवादविरोधी



वर्तमानपत्राचे वितरण करत असताना पोलिसांनी पकडले. पोलिसांच्या तावडीतून सुटण्यात मात्र खुदिराम यशस्वी झाले. 16 मे 1906 रोजी त्यांना ब्रिटिश साम्राज्यवादविरोधी आंदोलनांमध्ये सहभागी झाले म्हणून अटक करण्यात आली, मात्र त्यांचे वय बघता त्यांना इशारा देऊन सोडण्यात आले. या घटनेनंतर ते गुप्त संघटनेच्या क्रांतिकारी कार्यासाठी आर्थिक संसाधने गोळा करण्याच्या कामात लागले. हाटगछिया मध्ये खजिना लुटला गेला त्यात खुदिराम बोस सहभागी होते.

कोलकत्यामधील किंग्सफर्ड या क्रूर ब्रिटिश दंडाधिकारी(magistrate) विरोधात जनतेमध्ये प्रचंड रोष होता. क्रांतिकारकांचे मानणे होते की किंग्सफर्ड क्रांतिकारकांविरोधात क्रूरपणे कारवाया करतो. बंगालच्या फाळणी विरोधात चाललेल्या आंदोलनामध्ये सहभागी असलेल्या असंख्य युवकांना किंग्सफर्डने क्रूर शिक्षा दिल्या होत्या. बिपिन चंद्र पाल यांच्यावर चाललेल्या राजद्रोहाच्या खटल्या वेळी न्यायालयाच्या बाहेर विरोध प्रदर्शने सुरु होती. या प्रदर्शनामध्ये सहभागी एका 14 वर्षाच्या तरुणाला किंग्सफर्डने 14 चाबुकाच्या मारांची शिक्षा दिली होती. अशा या क्रूर ब्रिटिश अधिकाऱ्याला बढती देत सत्र न्यायाधीशाच्या रूपात मुजफ्फरपूरला पाठवण्यात आले. बंगालमधील क्रांतिकारकांनी या अधिकाऱ्याची हत्या करण्याचा निर्णय घेतला. युगांतर या संघटनेचे नेते विरेंद्र घोष यांनी घोषणा केली की किंग्सफर्डला बिहारमधील मुजफ्फरपूरमध्ये ठार केले जाईल. या कामासाठी खुदिराम बोस आणि प्रफुल्ल चंद यांची निवड केली गेली. खुदिराम बोस आणि प्रफुल्ल चंद मुजफ्फरपूरला पोहचले. तिथे पोहचल्यानंतर त्यांनी किंगसफर्डवर पाळत ठेवायला सुरुवात केली. मुजफ्फरपूरमध्ये एक प्रसिद्ध क्लब होता जिथे इंग्रज अधिकारी आपल्या कुटुंबियांसह जायचे. 30 एप्रिल 1908 रोजी किंग्सफर्ड आपल्या पत्नीसह क्लब मध्ये पोहचला. रात्री 8.30 च्या सुमारास केनेडी या एका अन्य इंग्रज अधिकाऱ्याची पत्नी आणि मुलगी क्लब मधून बाहेर निघून घरी जाण्याच्या दिशेने निघाले. केनेडीची पत्नी आणि मुलगी बसलेल्या गाडीला किंग्सफर्डची गाडी समजून त्या गाडीवर खुदिराम बोस आणि प्रफुल्ल चंद यांनी बॉम्ब फेकला. या बॉम्ब हल्ल्यामध्ये केनेडीची पत्नी आणि मुलगी यांचा मृत्यू झाला. या बॉम्ब हल्ल्यानंतर इंग्रजांनी खुदिराम बोस आणि प्रफुल्ल चंद यांच्या अटकेसाठी 500 रुपयांचे (त्या काळातील 500 रुपये आजच्या लाखो रुपयांसमान आहेत) बक्षिस जाहीर केले. 1 मे 1908 रोजी खुदिराम बोस यांना पोलिसांनी अटक केली तर प्रफुल्ल चंद यांनी स्वतःला गोळ्या झाडून शहादत पत्करली. वयाच्या अवघ्या 18व्या वर्षी 11 ऑगस्ट 1908 रोजी खुदिराम बोस यांना फासावर लटकवण्यात आले. खुदिराम बोस यांचे नाव त्या असंख्य क्रांतिकारकांमध्ये जोडल्या गेले ज्यांनी ब्रिटिश साम्राज्यवादाविरोधात लढताना आपल्या प्राणांचे बलिदान दिले.

खुदिराम बोस यांचा काळ हा स्वातंत्र्य चळवळीमध्ये एक नवीन राजकीय प्रवाह प्रखरतेने पुढे येण्याचा काळ होता. बंगालमधील असंख्य तरुणांनी काँग्रेसच्या दबाव-तडजोड-दबावच्या धोरणाच्या (जनांदोलन उभे करणे, परंतु त्याला क्रांतिकारी धार येऊ न देता ब्रिटीशांशी तडजोडीचे हत्यार म्हणून वापरणे आणि आंदोलन मागे घेणे) विरोधात वैयक्तिक त्याग आणि बलिदानाचा मार्ग स्वीकारला. त्यांची विचारधारात्मक कमजोरी होती, परंतु खुदिराम बोस आणि इतर क्रांतिकारकांनी जनतेमध्ये क्रांतीचे स्पिरीट निर्माण करण्याचे काम केले. बंगालमधील ही क्रांतिकारकांची पहिली पिढी होती. या क्रांतिकारकांची क्रांतीची प्रेरणा ही धर्मातून यायची, आणि इंग्रजांच्या विरोधात लढताना ते धार्मिक आणि भावनिक मुद्द्यांचा आधार घ्यायचे, कारण क्रांतिकारी आंदोलनाचा भौतिकवादी विकास अजून झालेला नव्हता. असे असले तरी ते कुठल्याही प्रकारे धर्मवादी म्हणजेच धर्माचा राजकारणासाठी आसरा घेणारे नव्हते. त्यांच्या कृतीतून त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचाच अवलंब केल्याचे आपल्याला दिसते. खुद्द खुदिराम बोस यांना त्यांनी बहिणीचे घर सोडल्यानंतर एक मुस्लिम वकील सैय्यद अब्दुल वाहिद यांच्या बहिणीच्या घरी आश्रय मिळाला होता.

क्रांतिकारी आंदोलनाच्या या चरणातील क्रांतिकारकांच्या काही विचारधात्मक कमजोरी होत्या. बंगाल मधील क्रांतिकारी स्वतः मुस्लिमविरोधी नव्हते परंतु त्यांच्या हिंदू पूर्वग्रहामुळे आणि मुस्लिमांच्या एका हिश्श्यामध्ये असलेल्या मूलतत्ववादी विचारांच्या प्रभावामुळे मुस्लिम जनता काही प्रमाणात त्यांच्यापासून दूर राहिली. व्यक्तिगत त्याग आणि बलिदानावर जास्त विश्वास असल्याने या क्रांतिकारकांनी सक्रियपणे जनतेमध्ये राजकीय प्रचारकार्य करण्याचे प्रयत्नही कधी केले नाही. भगतसिंह आणि त्यांच्या साथीदारांनी खुदिराम बोस सारख्या असंख्य क्रांतिकारकांच्या बलिदानातून प्रेरणा घेत परंतु त्यांच्या विचारधारात्मक कमजोरी ओळखून त्या दूर करण्याचा प्रयत्न केला. भांडवलशाही मुर्दाबाद, साम्राज्यवाद मुर्दाबाद, इंकलाब जिंदाबाद सारख्या घोषणांनी आधीच्या धर्मावर आधारित घोषणांची जागा घेतली. ते आता वैज्ञानिक समाजवादाविषयी बोलायला लागले. ते असा समाज निर्माण होण्याबद्दल बोलत होते जिथे एका मनुष्याद्वारे होणारे दुसऱ्या मनुष्याचे शोषण अशक्यप्राय होऊन जाईल. 1917 मध्ये रशियात झालेल्या समाजवादी क्रांतीचा भगतसिंह आणि त्यांच्या साथीदारांच्या वैचारिक जडणघडणीवर मोठा प्रभाव होता. या क्रांतीने संपूर्ण साम्राज्यवादी व्यवस्थेला मोठा झटका दिला. या समाजवादी क्रांतीद्वारे रशियात मनुष्याद्वारे होणारे मनुष्याचे आणि राष्ट्राद्वारे होणारे राष्ट्राचे शोषण यावर आधारित व्यवस्थेला समाप्त करून टाकले. भगतसिंह यांनी म्हंटले होते की त्यांना गोरे इंग्रज जाऊन भुऱ्या इंग्रजांची सत्ता नको आहे म्हणजेच त्यांना लॉर्ड इरविन च्या जागी पुरुषोत्तम दास ठाकूरदास चे शोषण नको आहे.

आज यापण बघतो की खुदिराम बोस आणि त्यांचे न्याय्य वारस असलेल्या भगतसिंहादी क्रांतिकारकांना जो समाज बनणे अपेक्षित होते तो बनला नाही आहे. आज देशात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षासारख्या फॅसिस्ट शक्ती मजबूत झाल्या आहेत. दलितांवरील जातीय अत्याचार वाढले आहेत, अल्पसंख्याकांवरील धर्मवादी हल्ले वाढले आहेत, स्त्रियांवरील लैंगिक शोषणाच्या घटना वाढल्या आहेत, कामगार कायदे बदलून कामगार वर्गाचे जीवन नरकासमान बनवण्यात येत आहे. एकीकडे बेरोजगारीत अभूतपूर्व अशी वाढ होत असताना रेल्वे, बँकांसारखे सरकारी विभाग भांडवलदारांना विकून ज्या थोड्या बहुत सरकारी नोकऱ्या होत्या त्याही समाप्त केल्या जात आहे. आरोग्य, शिक्षण सारख्या मूलभूत गोष्टींना सुद्धा भांडवलदारांच्या सेवेत सामील केले जात आहे. आज या फॅसिस्ट शक्ति खुदिराम बोस, भगतसिंह सारख्या असंख्य क्रांतिकारकांच्या वारशाला हडपण्याचे काम करत आहेत. पाठ्यपुस्तकांमधुन क्रांतिकारकांचा इतिहास लपवला जात आहे किंवा विकृत केला जात आहे तर दुसरीकडे सावरकर सारख्या इंग्रजांची माफी मागणाऱ्या माफीविराची क्रांतिकारी असल्याची खोटी प्रतिमा निर्माण केली जाते आहे.

आज निराशेच्या या काळात खुदिराम बोस सारख्या क्रांतीकारकांना आठवणे गरजेचे आहे. खुदिराम बोस सारख्या क्रांतिकारकांनी जी क्रांतीची चेतना जागवली होती ती आज पुन्हा जिवंत करणे गरजेचे आहे. प्रतिक्रियेच्या आणि निराशेच्या या समयी पुन्हा एकदा सर्व प्रकारच्या अन्यायाविरोधात लढण्यासाठी सर्व शक्तिनिशी मैदानात उतरणे आवश्यक आहे. वयाच्या अवघ्या 18 व्या वर्षीच खुदिराम बोस यांनी बलिदानाची सर्वोच्च पायरी गाठली होती. त्यांचा क्रांतिकारी वारसा आज जनतेसमोर घेऊन जाणे आपले परम कर्तव्य आहे.

# कामगार वर्गाचा पक्ष कसा असावा (तिसरे पुष्प)

पान 8 वरून

संघाधिपत्यवादी प्रवृत्तींचा उदय आणि विकास समजू शकतो. 'मजदूर बिगुल' या हिंदी वर्तमानपत्राच्या पानांवरच एका कामगार वर्तमानपत्राच्या चरित्रावर झालेल्या वादविवादात ('सर्वहारा वर्ग का हिरावल दस्ता बनने की बजाय उसका पिछवाड़ा निहारने की ज़िद', 'मजदूर बिगुल', ऑगस्ट 1999) आम्ही भारतात सुधारणावादी संधीसाधूपणाच्या दुसऱ्या टोकावर अतिरेकपंथ आणि संघाधिपत्यवाद निर्माण होण्याकडे लक्ष्य वेधले होते. ट्रेड्युनियन्सबाबत पक्षाच्या रोखाबद्दल वोइनोव (ए.वी. लुनाचार्स्की) च्या पुस्तकाच्या भुमिकेत लेनिनने लिहिले होते, "पश्चिम युरोपातील बहुसंख्य देशांमध्ये क्रांतिकारी संघाधिपत्यवाद हा सुधारणावाद, संधीसाधूपणा आणि संसदीय बटुकता यांचा एक प्रत्यक्ष आणि अपरिहार्य परिणाम होता. आपल्या देशामध्ये सुद्धा 'संसदीय कारवाई'च्या सुरुवातीच्या पावलांनी संधीसाधूपणाला पसरण्याला मोठा वाव दिला आणि मेंशेविकांना कॅडेटांचे चापलूस बनवले. उदाहरणार्थ, प्लेखानोव त्यांच्या दैनंदिन राजकीय कामांमध्ये खरेतर प्रोकोपोविच आणि कुस्कोवा सारख्या लोकांसोबत मिसळून गेले. 1900 मध्ये त्यांनी रशियन कामगारवर्गाचा फक्त 'पार्श्वभाग' निरखत असण्याबद्दल बर्नस्टीनवर टीका केली होती ('राबोचेये देलो'च्या संपादक मंडळासाठी वाडेमकुम, जिन्हीवा, 1900). पण 1906-07 मध्ये मतपत्रिकांनी आधीच प्लेखानोवला या सज्जनांच्या कवेत ढकलले जे आता रशियन उदारवादाचा 'पार्श्वभाग' निरखत आहेत. रशियाच्या जमिनीवरील या 'प्रतिष्ठित' सामाजिक लोकशाहीवाद्यांच्या लाजीरवाण्या वर्तनाविरोधात प्रतिक्रियेच्या स्वरूपात संघाधिपत्यवाद उत्पन्न झाल्याशिवाय राहू शकत नाही."

आपल्या देशातसुद्धा तेलंगणा संघर्षाच्या पराभवानंतर दुरुस्तीवादी राजकारण प्रभावी राहिले, ज्याच्या अति-प्रतिक्रियेच्या रूपातच चारू मुजूमदारांचे "डाव्या" अतिरेकपंथाचे विचलन निर्माण झाले. दुरुस्तीवादाची एक प्रतिक्रिया जर "डाव्या" अतिरेकपंथाच्या धारेच्या रूपात असेल तर दुसरी प्रतिक्रिया अराजकतावादी संघाधिपत्यवादाच्या रूपात समोर येते. हा लांगूलचालनवादच आहे जो क्रांतिकारकांना जनतेचे शेपूट (लांगूल) पकडून लटकण्याचा सल्ला देतो. आपण लांगूलचालनवाद आणि दुरुस्तीवाद, या दोघांचाही विरोध केला पाहिजे.

(मूळ लेख प्रकाशित: मज़दूर बिगुल, जुलै 2022)

(अनुवाद: राहुल)

# हरिओम राजोरिया यांची बेरोजगारी वर कवितामाला: बेकार पोर

1.
बेकार पोर
आईला घाबरत नाही
बापाला घाबरत नाही
आणि ना मरणाला
बेकारीच्या दिवसांमध्ये
सगळी भितीच मेली त्याची

2.
सिगरेटच्या भावापासून
दोस्तांच्या चेहऱ्यापर्यंत
बरंच काही बदलून गेलं

भिंतीवरून उतरलेल्या
जुन्या कॅलेंडरच्या तारखा गेल्या
पेपरच्या रद्दीसोबत

थुंकण्याशिवाय
शिल्लकच काय आहे
बेकार पोराकडे
जेव्हाकी दिवस
खूप छोटे झालेत
आणि थंड हवा
टोचतेय गालांना.

3.
बाजाराचा कोलाहल
धूळीने भरलेल्या गल्ल्यांची ओसाड शांतता
आणि आपल्या पाठीवर टिकलेल्या
गावाच्या नजरेतून वाचत
उशिरा रात्री पोहोचतो तो घरी

झोपेत बडबडणारा बाप
माहित नाही कसा ऐकतो
दारावर पडलेली थाप
बापाच्या दिनचर्येत
सामील झालीये दाराची ही हालचाल

मुंडी खाली घालून त्याचं
समोरून निघून जाणं
काही शब्दांच्या फेरफारानं
जगंच बिघडणं
आणि अरे माझ्या देवा म्हणत
पुन्हा झोपी जाणं

उखडलेल्या नखासारखी असते
बेकार पोराची रात्र.

4.
कुठून होते
स्वप्नांची सुरुवात?

स्वप्न हळू-हळू येतात
आणि मोठमोठ्या पुस्तकांपर्यंत पोहोचून
आकार घेऊ लागतात

कधी असं होतं
की बेकार पोरगा
त्याच्या बटव्यात लपवतो
शेजारच्या मुलीचं चित्र
आणि रात्री छतावर उभा होऊन
टक लावून पहातो चमकणाऱ्या इमारती

बेकार पोराची दुनिया
लिलावात विकत घेतलेल्या
कपड्यासारखी असते
जे झिजून जातं
पहिल्या धुलाईतच

5.
तागाचे कापड नसतात दिवस
की थोडी कात्री लागली आणि
चर्रsss करून कापलं जाईल

दिवसांची लढाई
साधी नसते
वेळ घालवायला
दिवस घालवावा लागतो
जिथे शत्रू असतो निराकार
आणि पहिली युद्ध-आघाडी
घरातच असते

सकाळच्या चहापासून
भाजीची ताटली फुटेपर्यंत
चालू राहतात झडपा
तरीही दिवस खपत नाही
खपतो तो बेकार पोरगा

6.
एकोणतीस वर्षांच्या वयात
आपल्या अस्तित्वाचा अर्थ
शोधतोय बेकार पोरगा

बेकार पोरासाठी
अंधाऱ्या गुहेपेक्षा
कमी नाहीत एकोणतीस वर्षं

वयाच्या या उतारावर उतरताना
एक क्षण असाही येतो
जेव्हा बेकार पोरगा
"पोरगा" म्हटलं म्हणून
उदास होतो

खूप कठिण असतं
वयाच्या शिड्या चढणं
जेव्हा प्रत्येक पायरीवर
असंच वाटतं
की आता करूच समुद्र पार.

7.
हिशोब द्या राव
कोणी खाल्ली
तुमची एकोणतीस वर्षं ?

चिमड्यांनी टोचे मारले
की एखाद्या घारीने मारली झेप
तिळा-तिळाचा नाही
पण ढोबंळ मानानं तरी
असंल ना हिशोब तुमच्याकडे

जुगार तर नाही खेळला
उधार ठेवलेत का
एखाद्या सावकाराकडे
की कोणी अल्लड मुलगी
खोसून घेऊन गेली वेणीत?

काय चूक झाली
जरा विचार करा
अशीच हिरावू शकत नाहीत
कोणी आपली एकोणतीस वर्षं

8.
हुंगून फेकून द्या फूल
चिरडून टाका फुलाला
विखरून टाका पाकळ्या
वाहवून टाका नदीच्या प्रवाहात
काही बोलत नाहीत फुलं

एकोणतीस वर्षाच्या वयात
एक दिवस अचानक
डहाळीवरून तुटलेलं फूल बनतो
बेकार पोरगा.

(अनुवाद: निश्चय)

## मुंबईची हिरवीगार फुफ्फुसे 'आरे जंगल' उद्ध्वस्त करून, भांडवलदारांना सोपवण्याची तयारी !!

# आरे मेट्रो प्रकल्प: भाजपचा आणखी एक घोटाळा!

✎ अविनाश

मुंबईमध्ये 'आरे जंगल' वाचवण्याकरिता चालू असलेल्या दुसऱ्या आंदोलनामुळे हा मुद्दा पुन्हा एकदा प्रसारमाध्यमांमध्ये नुकताच झळकला. या आंदोलनामध्ये प्रभावी असलेल्या उदारवादी विचारांच्या प्रभावामुळे हे आंदोलन निष्प्रभावी बनले आहे, परंतु या निमित्ताने मुंबईची फुफ्फुसे असलेले आरेचे जंगल उध्वस्त करून ती जागा बिल्डर-उद्योगपतींच्या घशात घालण्याचे फडणवीस-शिंदे सरकारचे इरादे पुन्हा एकदा उघडे पडले आहेत. राज्यात सत्तापरिवर्तन झाल्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या भाजप-शिंदे सरकारने मागील सरकारच्या निर्णयाला स्थगिती देत पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत 'मेट्रो कारशेड-३' प्रकल्पाला गती देण्याचे आणि आरे जंगलात कारशेड बांधण्याचे काम वेगाने चालू केले आहे.

### मुंबईतील प्रदूषणाची समस्या

मुंबईसहीत सर्व शहरांमध्ये हवा, पाणी, ध्वनी यांचे प्रदूषण ही गंभीर समस्या बनलेली आहे हे अधोरेखित करण्याची गरज आज राहिलेली नाही. या प्रदूषणाचा सर्वाधिक फटका जर कोणाला बसत आहे तर तो कामगार-कष्टकरी वर्गाला कारण की खात्या-पित्या उच्च-मध्यमवर्गाने, भांडवलदार वर्गाने स्वत:साठी एअर-कंडिशंड घरे, डोंगरमाथ्यांपासून ते समुद्रकिनाऱ्यांपर्यंत घरे, आणि जास्त पैसे खर्च करून स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा, स्वच्छ जमिनीची सोय करवली आहे. या सर्वांच्या "निरोगी" जीवनाची किंमत देत आहेत ते शहराच्या परिघावर आणि झोपडपट्ट्यांमध्ये अतिशय प्रदूषित वातावरणात राहणारी कामगार-कष्टकरी जनता. यामुळेच पर्यावरणाचा प्रश्न हा एक वर्गप्रश्न आहे आणि कामगार-कष्टकऱ्यांनी याबाबत जागरूक होणे गरजेचे आहे.

या प्रदूषणाचाच परिणाम आहे चीडचिड आणि श्वासोच्छ्वासात त्रास, खोकला, घशाची घरघर, दमा, ऍलर्जी आणि छातीत दुखणे यासारख्या समस्या. फुफ्फुसाचा कर्करोग, हृदयविकाराचा झटका, पक्षाघात आणि अकाली मृत्यूचा धोका देखील यामुळे वाढला आहे. हवेतील प्रदूषण दाखवणारा मुंबईतील वायु गुणवत्ता निर्देशांक (ए.क्यु.आय.) 309 होता, जो एक गंभीर इशारा आहे. अशा परिस्थितीत मुंबईतील हवेला काही प्रमाणात शुद्ध करणाऱ्या आरे जंगलातील झाडे तोडण्याचे काम आपल्या 'आज आणि उद्या'शी निगडित एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न बनतो.

### आरे जंगलात 'मेट्रो कारशेड-3' बांधकाम आणि पर्यावरणाचा नाश

गोरेगावजवळील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळील 'आरे जंगल' हे दुर्मिळ हिरव्यागार ठिकाणांपैकी एक आहे. आरे जंगलात वन्यजीव, कीटक, फुलपाखरे आणि पक्ष्यांच्या अनेक प्रजाती आहेत. त्यात झाडांच्या किमान 86 प्रजाती आणि पक्ष्यांच्या 22 प्रजाती आहेत. आरे जंगलातील समृद्ध जैवविविधता प्रेक्षणीय आहे. जिथे आंतरराष्ट्रीय युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर (IUCN) मध्ये समाविष्ट असलेल्या प्राण्यांच्या अशा 5 प्रजातींसह सुमारे 290 वन्यजीव प्रजाती आहेत. या आश्चर्यकारकपणे दुर्मिळ प्राण्यांमध्ये बिबट्या, ठिपकेदार मांजर, सांबर हरण, अलेक्झांड्रिन पॅराकीट आणि लाल-वाटलड लॅपविंग यांचा समावेश आहे. मुंबईतील हरित पट्टा गेल्या काही दशकांपासून दिवसेंदिवस कमी होत असून, त्यात 42.5 टक्क्यांनी घट झाली आहे. एका अंदाजानुसार 1988 मध्ये मुंबईतील 63,035 हेक्टर जमिनीपैकी 29,260 हेक्टर हा हरित पट्टा होता. 2018 पर्यंत, फक्त 16,814 हेक्टर शिल्लक होते. अशा परिस्थितीत रोजच पर्यावरणाचे गाणे गाणाऱ्या भाजपला मुंबईचे हे 'हिरवे फुफ्फुसे' नष्ट करण्याचा अधिकार कोणी दिला?

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने आरे मिल्क कॉलनीमध्ये कुलाबा-वांद्रे-सीपझेड मेट्रो प्रकल्पासाठी 33.5 किमी भूमिगत कारशेड बांधण्याची योजना आखली होती. त्यानुसार मुंबईतील गोरेगावच्या आरे जंगलात हे कारशेड बांधले जाणार आहे. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) वृक्ष प्राधिकरणाने मुंबईतील आरे कॉलनी परिसरात मेट्रो रेल्वे कारशेडसाठी 2,702 झाडे तोडण्यास मंजुरी दिली आहे.



महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाच्या या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांनी आरेला पूर मैदान आणि जंगल घोषित करण्याची मागणीही केली आहे. 4 ऑक्टोबर 2019 रोजी तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि भारती डंगल यांच्या नेतृत्वाखालील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नागरी संस्थेच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली. सुनावणीत आरे कॉलनीला जंगल म्हणून घोषित करण्यास नकार देत, 2702 झाडे तोडली जाऊ शकतात, असा निर्णय जाहीर करण्यात आला. शुक्रवारी हा निर्णय घेण्यात आला आणि पुढील काही दिवस सुट्ट्यांमुळे न्यायालय बंद राहणार असल्याचे निरीक्षण नोंदवल्यानंतर त्याच दिवशी रात्री 10 वाजता हा प्रकल्प राबविणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) ने 2000 झाडे तोडली. जनतेचा असंतोष पाहता सध्या थोड्या भागातील झाडे तोडली गेली आहेत, परंतु एकदा कार शेड उभे झाल्यानंतर भविष्यात ही जागा मेट्रोच्या गाड्यांकरिता अपुरी पडणार आहे हे माहित आहे, आणि तेव्हा अधिक झाडे तोडण्यासाठी बहाणा उपलब्ध असणार आहे. हे सुद्धा समोर आले आहे की आरे मधील 33 हेक्टर जंगलाला पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र म्हणून वगळण्याचे आदेश सुद्धा फडणवीस सरकारने दिले होते. यानंतर केंद्र सरकारने काढलेल्या 5 डिसेंबर 2016 च्या नोटिफिकेशन नुसार 165 हेक्टर जंगल पर्यावरणीय निकषांमधून वगळले गेले आहे.

हे विसरता कामा नये की नंतर आलेल्या उद्धव ठाकरे सरकारने कार शेडचा निर्णय रद्द केला असला तरी तेथे एक रॅम्प बांधण्याचे काम सुरूच होते. याचा अर्थ आहे की शिवसेना सरकारने आरेच्या जागेचा मेट्रोप्रकल्पामध्ये वापर रद्द केला नव्हता.

### आंतरराष्ट्रीय भांडवलदारांची "वॉर रूम" काय करत आहे?

फडणवीस सरकारने तयार केलेली "वॉर रूम" ही मॅकिन्से कन्सल्टिंग कंपनी आणि मुंबई फर्स्ट एनजीओ यांच्या भागीदारीत तयार केलेली यंत्रणा आहे. यांना देवेंद्र फडणवीस यांनी एकतर्फी प्रस्ताव मांडण्याचे अधिकार दिले आहेत. परिणामी फडणवीसांच्या स्वाक्षरीनंतर या वॉर रूम मीटिंगचे "मिनिटे" सरकारी आदेश मानले जातील आणि कोणत्याही मंत्री/नोकरशहाला त्यात हस्तक्षेप करता येणार नाही. "वॉर रूम" मध्ये "ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी" आणि फडणवीसांचे धोरणात्मक सल्लागार कौस्तुभ धवसे आहेत, ज्यांना देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील लोकांच्या जीवनावर एकतर्फी परिणाम करणारे प्रस्ताव सुचविण्याचे अधिकार दिले आहेत.

3 फेब्रुवारी 2017 रोजी मुख्यमंत्र्यांच्या "वॉर रूम" मध्ये झालेल्या गुप्त बैठकीला फक्त मुख्यमंत्री फडणवीस आणि काही प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. फडणवीस, एक "विशेष कर्तव्य अधिकारी" आणि काही इंटर्न यांनी आरे जंगलातील 1.69 चौरस किमी जमीन रिकामी करण्याचे आदेश दिले.

मॅकिन्से कन्सल्टिंग कंपनी साम्राज्यवादी देशांच्या भांडवलदार वर्गाची एजंट म्हणून काम करते. तिचे काम शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक वाहतुकीचे खाजगीकरण करणे, सार्वजनिक मालमत्ता खाजगी उद्योजक आणि बिल्डर लॉबींना विकणे, कामगार सुधारणांच्या नावाखाली सरकारी सार्वजनिक क्षेत्राचे झपाट्याने खाजगीकरण करण्यासाठी "विकास योजना" तयार करणे, पर्यावरणाच्या विनाशाकडे दुर्लक्ष करत योजना बनवणे, कर विकास प्रकल्प, काही श्रीमंतांवरील कराचा बोजा कमी करून जनतेवर कराचा बोजा वाढवण्याचे प्रस्ताव देणे, विकसित भांडवलशाही साम्राज्यवादी देशांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून देशाला लुटण्यासाठी देशातील पायाभूत सुविधांच्या योजना प्रस्तावित करणे, एकूणच परकीय भांडवली गुंतवणुकीसाठी भारताला एक आकर्षक बाजारपेठ म्हणून खुले करणे ही आहेत. मॅकिन्से कन्सल्टिंग कंपनी आणि बॉम्बे फर्स्ट यांनी 2003 मध्ये मुंबईला "जागतिक दर्जाचे" शहर बनवण्याच्या उद्देशाने शहरासाठी "व्हिजन मुंबई" विकास आराखडा तयार केला होता. या दस्तऐवजात मुंबईच्या समस्यांवर उपाय सुचवण्यात आले आणि खासगीकरणाकडे वाटचाल कशी करता येईल हे सुचविले. उदाहरणार्थ,

१) वाहतूक:- फ्रीवे, एक्स्प्रेस वेची संख्या तिप्पट करणे; पार्किंगच्या जागांची संख्या वाढवणे,

२) प्रशासन:- खर्च कमी करण्यासाठी सर्व सरकारी खात्यांचे कंत्राटीकरण करणे.

३) आरोग्यसेवा :- सर्व सरकारी रुग्णालयांचे खाजगीकरण, रुग्णांकडून फी आकारणे.

4) अर्थव्यवस्था:- सुपरमार्केट, हायपरमार्केट बांधण्यासाठी गिरणीची जमीन राखीव ठेवणे, बांधकाम आणि किरकोळ क्षेत्रांना चालना देण्यासाठी महामार्गावर मोठे आउटलेट मॉल बांधणे, कामगार संरक्षण काढून टाकणे.

5) शिक्षण :- 5-10 उच्च दर्जाच्या खाजगी शाळा बांधण्यासाठी भूसंपादन, सर्व सरकारी शाळांचे खाजगीकरण, फी वाढ.

स्पष्ट आहे की कामगार-कष्टकऱ्यांच्या हिताच्या विरोधात बिल्डर-उद्योगपतींची धन करणारी धोरणे सुचवणे हेच या मॅकेन्सी कंपनीचे काम आहे. आरेच्या बाबतीत कोणत्या हितसंबंधांचे रक्षण केले जात आहे?

### बिल्डर-उद्योगपतींसाठी आरे जंगल तोडले जात आहे.

आरे कॉलनी येथे मेट्रो कारशेडच्या बांधकामासाठी अधिग्रहित केलेली जमीन कारशेड व्यतिरिक्त अन्य व्यावसायिक कारणांसाठी वापरली जाईल, असे वॉर रूमच्या बैठकींच्या नोंदींमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यासाठी त्यांनी 'एरिया मेट्रो कारशेड आणि संबंधित उपक्रम' असा शब्दखेळ करून बिल्डर लॉबीचा मार्ग मोकळा करण्याची रणनीती आखली आहे. इतिवृत्तांमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "मेट्रो प्रकल्पांच्या दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यासाठी, जमिनीच्या वापरातील बदलात डेपो आणि संबंधित सुविधांचा व्यावसायिक विकास समाविष्ट असेल, म्हणजे या क्षेत्राला राखीव जंगल म्हणून घोषित न करणे, तर जागेचे रिअल इस्टेटमध्ये रूपांतर करणे आणि भविष्यातील विकासाची तयारी करणे". वॉर रूमच्या आदेशावरून आरेच्या भागातील 408 एकर जमीन 'डिनोटीफाय' केल्याच्या बातम्याही समोर आल्या आहेत. काही अंदाजानुसार, येथील जागेच्या वापरातून 60,000 ते 1 लाख कोटी रुपयांचे प्रकल्प उभे राहणार आहेत. थोडक्यात आरेच्या जागेवर भविष्यात बिल्डरांना इमारती बांधू देण्याचेच नियोजन आहे. अशाप्रकारे मुंबईतील श्रीमंतांना आलिशान अपार्टमेंट्ससह आकर्षक "हरित" निवासी क्षेत्रात घरे देण्यासाठी भाजप आरे जंगल तोडू पहात आहे. भाजपच्या असंख्य घोटाळ्यांमध्ये भर टाकणारा हा अजून एक घोटाळा आहे!

# शहीद चंद्रशेखर आझाद आणि शहीद शिवराम राजगुरू यांच्या जन्मदिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

✎ बिगुल पत्रकार

संसार के सारे मेहनत-कश खेतों से मिलों से निकलेंगे
बे-घर बे-दर बे-बस इंसाँ तारीक बिलों से निकलेंगे
दुनिया अम्न और ख़ुश-हाली के फूलों से सजाई जाएगी
वो सुब्ह हमीं से आएगी

- साहिर लुधियानवी

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एक प्रवाह क्रांतिकारकांचा सुद्धा होता ज्याने इंग्रजांना सळो की पळो करून सोडले होते. त्यांनी भारतात कामगार वर्गाच्या नेतृत्वातील क्रांती घडवून आणण्यासाठी आपले प्राण पणाला लावले. कामकरी जनतेचे राज्य आले पाहिजे हेच त्यांचे लक्ष्य होते. त्यांचे तत्व आणि विचार फक्त इंग्रजांसाठीच नाही तर भारतातल्या भांडवलदारवर्गासाठी आणि त्या वर्गाची पार्टी असलेल्या काँग्रेससाठी सुद्धा घातक होते. कारण स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व भगतसिंह, सुखदेव, राजगुरु, चंद्रशेखर आझाद, अश्फाकुल्लह खान, रामप्रसाद बिस्मिल सारख्या हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशनच्या (एच. एस.आर.ए.) क्रांतिकारकांच्या प्रवाहाकडे गेले असते तर जनता देशात फक्त स्वातंत्र्य मिळवून न थांबता समाजवादाच्या दिशेकडे गेली असती. त्यांचे स्वप्न एक असा स्वतंत्र देश घडवण्याचे होते जेथे उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, जाती-धर्मावर आधारित भेदभाव, मालक-मजूर अशा कोणत्याही प्रकारची विषमता नसेल. त्यांचे विचार देशातल्या भांडवली सत्तेच्या विरोधात कष्टकरी जनतेला संघटित करणारे असल्यामुळे सत्ताधारी वर्गाने त्यांच्या क्रांतिकारक वारशाला धूळ आणि राखेखाली दाबून टाकले आहे. उलट, क्रांतिकारकांच्या प्रतिमेचा वापर आपल्या राजकीय फायद्यासाठी सत्ताधारी वर्ग करत आहे. आज जेव्हा गरिब-शेतकरी आणि कामगारांचे शोषण दिवसेंदिवस वाढत आहे, जेव्हा जनतेला राब-राब राबुन सुद्धा मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, जेव्हा कष्टकरी वर्गाला गरिबीच्या गर्तेत ढकलून मालक वर्ग दिवसेंदिवस गब्बर होत चालला आहे, जेव्हा जनतेच्या चेतनेची मशाल मालवण्यासाठी जात-धर्माचे विष जनतेला पाजले जात आहे, तेव्हा या क्रांतिकारकांच्या विचारांची प्रासंगिकता सर्वाधिक आहे. त्यांचे विचार जनतेमध्ये पुन्हा नव्याने घेऊन जाण्याची गरज बनली आहे.

आज देशात काही जनपक्षधर संघटना आहेत ज्यांनी क्रांतिकारकांचा वैचारिक वारसा पुढे चालवला आहे. नुकतेच, 'हिन्दुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन एसोसिएशन' चे कमांडर-इन-चीफ शहीद चंद्रशेखर आजाद यांचा 23 जुलै रोजी आणि नौजवान भारत सभेच्या संस्थापकांपैकी एक शहीद शिवराम राजगुरु यांचा 24 ऑगस्ट रोजी जन्मदिवस होऊन गेले. त्यानिमित्त देशभरात नौजवान भारत सभा या युवक क्रांतिकारी संघटनेतर्फे, तसेच विविध क्रांतिकारी संघटनांतर्फे आयोजित कार्यक्रमांचा एक संक्षिप्त अहवाल येथे देत आहोत.

शहीद चंद्रशेखर आजाद यांच्या जन्मदिनानिमित्त 'नौजवान भारत सभे' तर्फे





पुण्यातील दांडेकर पूल भागात अभिवादनपर कार्यक्रम करून पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेत भाष्य करतांना कार्यकर्त्यांनी चंद्रशेखर आझादांचे कार्य, क्रांतिकारकांचा वैचारिक वारसा, आजच्या परिस्थितीमध्ये क्रांतिकारक विचारांची प्रासंगिकता, संघटित होण्याची गरज हे सर्व मुद्दे मांडले. पदयात्रेत काही नागरिक आणि नौभास चालवत असलेल्या शिक्षण सहाय्यता केंद्रातील मुले सुद्धा सहभागी झाली होती. घोषणा देत, पत्रक वाटत पदयात्रा पार पडली. कार्यक्रमात सांस्कृतिक टीमने काही क्रांतिकारी गाणी सुद्धा सादर केली. उत्तराखंडच्या हरिद्वार जिल्ह्यातील रोशनाबाद येथे 'चंद्रशेखर आझाद यांचा क्रांतिकारी वारसा' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यावेळी आझादांचे व्यक्तित्व, त्यांचे विचार आणि एका क्रांतिकारी संघटनेला नेतृत्व देण्याची त्यांची क्षमता यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. नौजवान भारत सभेद्वारे आझादांच्या जन्मदिनानिमित्त संपुर्ण दिल्ली शहरात 15 दिवसीय 'शहीद स्मृती अभियान' व्यापक भागात चालवले गेले. याअंतर्गत, दिल्लीमधील करावल नगर, शहाबाद डेअरी, मेट्रो विहार, खामपुर, खजूरी, बवाना, वजीरपुर आणि दिल्ली विश्वविद्यालय या सर्व भागात कोपरा सभा, पदयात्रा, दुचाकीयात्रा, गीत गायन आणि चर्चासत्र अशा विविध सृजनात्मक पद्धतींनी आझादांच्या विचारांना जनतेपर्यंत घेऊन जाण्यात आले. मेट्रो विहार भागात 'चंद्रशेखर आझाद युथ क्लब' च्या अंतर्गत कामगार-कष्टकरी पार्श्वभूमीतून येणाऱ्या तरुणांसाठी व्यायामशाळेची सुरुवात केली गेली. नौजवान भारत सभेच्या आंबेडकरनगर, उत्तरप्रदेश येथील युनिटने आझाद जन्मदिनानिमित्त मुलांना आणि तरुणांना 'दी लीजेंड ऑफ भगतसिंह' हा सिनेमा दाखवुन विस्तृत चर्चा केली. हरियाणा येथील कलायत आणि चौशाला येथे नौभास तर्फे 'दी लीजेंड ऑफ भगतसिंह' हा सिनेमा दाखवुन हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशनच्या विचारांबद्दल उपस्थितांसोबत विस्तृत चर्चा करण्यात आली. तसेच नरवानाच्या कर्मगढ आणि कैथल येथे आझादांबद्दलचे पत्रक वाटून कामकरी जनतेसोबत संवाद साधण्यात आला.

अलाहाबादेतील आझाद पार्क येथे 27 फेब्रुवारी 1931 रोजी आझादांना ब्रिटीश पोलिसांनी सर्व बाजूंनी घेरले होते. पोलिसांशी त्यांनी जवळजवळ एक तास लढा दिला आणि शेवटी जेव्हा गोळ्या संपल्या तेव्हा त्यांनी शेवटच्या गोळीने स्वतःला मारून शहादत पत्करली. त्याच आझाद पार्क येथे नौभास आणि दिशा विद्यार्थी संघटनेतर्फे सभा आयोजित केली गेली. 'उठो जवानों आगे आओ, लडकर नया समाज बनाओ' हा नारा देत उपस्थितांनी तरुणांना संघटित होण्याचे आवाहन केले. तसेच उत्तरप्रदेशातील मथुरा आणि जहांगीरगंज येथे 'जन एकता संकल्प अभियाना' अंतर्गत पदयात्रा आणि कोपरा सभा आयोजित करण्यात आल्या. जहांगीरगंज येथे पदयात्रेत फॅसिझम, जातीयवाद, अस्पृश्यता, महागाई पासून मुक्तीचे नारे देत असताना 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'च्या 8-10 गुंडांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. परंतु नौभासच्या कार्यकर्त्यांनी त्यांना सडेतोड उत्तर दिले. संघी लोकांच्या प्रत्येक आरोपाला तर्काने उत्तर दिल्यानंतर जनतेने सुद्धा संघी गुंडांचा विरोध करण्यास सुरुवात केली. शेवटी संघी गुंडांनी माघार घेतली आणि पदयात्रा यशस्वी झाली. ग्रामीण कामगार युनियन, उत्तरप्रदेश तर्फे मुडियारी, बरोहीपुरा-पांडे आणि कसमा का पुरवा गावांमध्ये कोपरा सभा करत पदयात्रा करण्यात आली.

शहीद शिवराम राजगुरू यांच्या जन्मदिनी पुण्यातील एफ.सी. रोड येथे नौजवान भारत सभेतर्फे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. नौभासच्या कार्यकर्त्यांनी क्रांतिकारी गाणी सादर केली आणि जनतेसोबत संवाद साधला. पोस्टर प्रदर्शन लावल्यामुळे नौभासची संक्षिप्त ओळख जनतेला मिळाली. यावेळी विद्यार्थी-तरुणांना नौभासच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन सुद्धा करण्यात आले. शेवटी घोषणा देऊन राजगुरु यांना अभिवादन करण्यात आले. त्याचदिवशी पुणे शहरातील बिबवेवाडी येथील सुपर भागात अभिवादनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात राजगुरूंचा जीवनपट मांडला गेला. तसेच कामकरी जनतेसमोर क्रांतिकारकांचे विचार मांडण्यात आले. कार्यक्रमात क्रांतिकारी गीत सादर केल्यामुळे सर्वांचे लक्ष वेधले गेले होते. नौभासच्या मुंबई येथील कार्यकर्त्यांनी राजगुरूंच्या जन्मदिनानिमित्त चर्चासत्र आयोजित केले ज्यात राजगुरूंच्या जीवनाविषयी आणि त्यांच्या क्रांतिकारी प्रवासाबद्दल चर्चा करण्यात आली. दिशा विद्यार्थी संघटनेतर्फे वाराणसी येथील बनारस हिंदु विश्वविद्यालय (बीएचयू) येथे "क्रांतिकारी आंदोलनाचा वैचारिक विकास" या विषयावर चर्चासत्र आयोजित केले गेले. चर्चेमध्ये महाराष्ट्र, बंगाल आणि पंजाब येथील क्रांतिकारी प्रवाहांच्या विकासावर चर्चा झाली. तसेच कानपूर, गोरखपूर आणि वाराणसी या क्रांतिकारक कारवायांच्या केंद्रांच्या विकासाबद्दल सुद्धा चर्चा झाली. गदर पार्टीची स्थापना, एच.आर.ए.ची स्थापना, काकोरी घटना, एच.एस.आर.ए.ची स्थापना आणि भगतसिंग-राजगुरु-सुखदेव यांचे बलिदान हे क्रांतिकारी राजकारणाच्या विकासातील महत्त्वाचे टप्पे म्हणून चर्चिले गेले. चर्चेच्या शेवटी शिववर्मा यांनी लिहिलेल्या 'संस्मृतियां' मधून राजगुरूंच्या जीवनाशी संबंधित काही उतारेही वाचण्यात आले.

आज खऱ्या अर्थाने सर्वहारा वर्गाला संघटीत करायचे असेल तर जुन्या समाजव्यवस्थेवर आधारित अप्रासंगिक धार्मिक सणांच्या जागी जनतेच्या नायकांचे जन्मदिन-शहीददिन, जनतेने लढलेल्या योग्य लढाया हे सामुहिक सण म्हणून स्थापित करावे लागतील. भगतसिंहाने सांगितल्याप्रमाणे क्रांतीचा संदेश गिरण्या-कारखान्यांची क्षेत्रे, शहरातील बकाल वस्त्या आणि खेड्यातील जीर्ण झोपड्यांमध्ये राहणाऱ्या कोट्यवधी लोकांमध्ये पोहोचवून त्यांच्यात क्रांतीची चेतना जागवावी लागेल.

## कामगारविरोधी, स्त्री-विरोधी, जातीयवादी, दहशतवादी, भ्रष्टाचारी, दुतोंड्या फॅसिस्टांचा पर्दाफाश करा!

पान 15 वरून

सर्वांकरिता राज्यघटनेचाच आधार घेतला आहे, आणि भारताच्या राज्यघटनेत व कायद्यांमध्येच त्या पुरेशा तरतुदी आहेत ज्या लोकशाही अधिकार रद्द करण्यापासून ते आणीबाणी घोषित करण्यापर्यंतचे अधिकार सरकारला देतात. भांडवलदार वर्गाच्या बदललेल्या गरजेमुळेच भाजप सोडून इतर कोणता भांडवली पक्ष जरी आज सत्तेत आला, तरी जातीय-धार्मिक मुद्यांवर किरकोळ फरक वगळता त्यालाही आर्थिक-राजकीय धोरणे त्याच हुकूमशाही पद्धतीने लागू करावी लागतील, ज्या पद्धतीने भाजप करत आहे. त्यामुळेच कामगार वर्गाने आज भांडवली धोरणे मांडणाऱ्या आणि उदारवादाचा बुरखा पांघरणाऱ्या काँग्रेस, राष्ट्रवादी, राजद, आप, सपा, वंचित सारख्या पक्षांकडून आशा न लावता, कामगार वर्गाचे क्रांतिकारी नेतृत्व करणाऱ्या पक्षाच्या पायाभरणीचे काम हाती घेतले पाहिजे, असा पक्ष जो फक्त निवडणुकांपुरता मर्यादित राहणार नाही तर क्रांतिकारी मार्गाने त्या संपूर्ण शोषणकारी आर्थिक संरचनेलाच उध्वस्त करून समाजवादाच्या निर्माणाचे काम हाती घेईल.

# कामगारविरोधी, स्त्री-विरोधी, जातीयवादी, दहशतवादी, भ्रष्टाचारी, दुतोंड्या फॅसिस्टांचा पर्दाफाश करा!

पान 1 वरून

कमी-शिक्षित वा अशिक्षितांना रोजंदारीने खटण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

दुसरीकडे मालकवर्गाला श्रमशक्तीच्या खुल्या लुटीची परवानगी दिली गेली आहे. परिणामी कारखाने, बांधकाम, खाणकाम क्षेत्रातील कामगारांपैकी दोन तृतीयांश पेक्षा जास्त कामगारांची महिन्याची कमाई रु. 8000-10000 पर्यंत खाली आली आहे. 1984 मध्ये भांडवलदारांनी गुंतवलेल्या एकूण रकमेच्या 45 टक्के हिस्सा मजुरीवर खर्च होत होता, जो 2010 पर्यंत 25 टक्क्यांवर आला, आणि मोदी सरकारच्या काळात तर अजूनच घसरला आहे. थोडक्यात मालकांचा नफा जोरदार वाढतो आहे, आणि कामगारांची दैन्यावस्था सुद्धा. मजुरी तळ गाठत असताना महागाईचा फेरा आज परत एकदा कामगार-कष्टकऱ्यांची चूल विझवत आहे, आणि अशा स्थितीत मोदी सरकारने मात्र अन्नधान्यावर सुद्धा जी.एस.टी. लावण्याचा निर्णय घेतला आहे. डाळी, गहू, आटा, लाह्या, ताक, दही सारख्या अनेक खाद्यपदार्थांवर आता 5 टक्के जी.एस.टी. लावला जाईल आणि महागाईच्या आगीत तेल ओतण्याचे काम मोदी सरकार करणार आहे.

मोदी सरकारला कामगारांच्या जगण्या-मरण्याशी काहीही देणेघेणे नाही याचे सर्वात मोठे उदाहरण आहे कोणत्याही पूर्वतयारीविना सक्तीने लागू केलेला कोव्हिड लॉकडाऊन, ज्यामध्ये कोट्यवधी कामगारांना हजारो किलोमीटर पायी चालत आपल्या गावी उपाशी-तापाशी जावे लागले, तर दुसरीकडे या महामारीने 47 लाख लोकांचे जीव घेतले, ज्यापैकी बहुसंख्य कामगार-कष्टकरीच होते. गंगेच्या पात्रात पुरलेली आणि नद्यांमध्ये तरंगणारी प्रेतं आणि अहोरात्र धडधडणाऱ्या चितांची दृष्ये कधीही विसरता येणार नाहीत.

या सर्वांचा परिणाम आहे की आज आत्महत्या करणाऱ्या प्रत्येक 4 व्यक्तींपैकी एक व्यक्ती रोजंदारी कामगार आहे! 2014 मध्ये जे प्रमाण 12 टक्के होते, ते आता 25 टक्क्यांवर आले आहे. 2014 मध्ये दरवर्षी 15,735 रोजंदारी कामगार आत्महत्या करत होते, जो आकडा वाढून 2021 मध्ये वर्षभरात जवळपास 42,004 रोजंदारी कामगारांनी आत्महत्या केल्या अशी राष्ट्रीय गुन्हे रेकोर्ड ब्युरो (एन.सी.आर.बी.) ची सरकारी आकडेवारी आहे. निश्चितपणे नोंदवल्या न गेलेल्या आत्महत्या यापेक्षा खूप जास्त आहेत. यामध्ये बेरोजगारांनी केलेल्या आत्महत्या (13,714), स्वरोजगारी व्यक्तिंनी केलेल्या आत्महत्या (20,231), पगारदारांनी केलेल्या आत्महत्या (15,870), विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्या (13,089), शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या (10,881) जोडल्या तर दिसून येते की कामगार वर्गाच्या विविध हिश्श्यांमध्ये गेल्या 8 वर्षांमध्ये किती मोठ्या प्रमाणात ताणतणाव, दैन्यावस्था, विषण्णता, नैराश्य भरले गेले आहे!

## स्त्री-विरोधी भाजप

"बेटी बचाओ", "बहुत हुआ नारी पर वार" सारखे नारे देणारे संघी स्वत: किती स्त्री-विरोधी मानसिकतेचे आहेत, याची तथ्ये द्यावीत तेवढी थोडी. नुकतेच गुजरातमध्ये भाजपने बिल्किस बानोवर बलात्कार करणाऱ्या गुन्हेगारांची आयुष्यभर जन्मठेप रद्द केली आणि हिंदुत्ववाद्यांनी त्यांची सुटकाही साजरी केली! उत्तरप्रदेशात हाथरस येथे 2020 मध्ये दलित महिलेवर झालेल्या बलात्कारानंतर अनेक संघी नेत्यांनी आरोपींच्या समर्थनात वक्तव्ये केली, 2018 मध्ये जम्मूतील कठुआ येथे एका अल्पवयीन मुलीवर बलात्काराचा आरोप सिद्ध झालेल्या आरोपींच्या समर्थनात आंदोलने केली, 2017 मध्ये उत्तरप्रदेशात उन्नाऊ येथे तर भाजपच्या आमदारानेच बलात्कार केला जो नंतर सिद्धही झाला. अशा अनेक घटनांमध्ये संघ परिवारातील संघटनांनी मोर्चे काढले, महिलांनीच नीट वागावे अशी वक्तव्ये केली आणि याबद्दल मोदींसहीत एकाही नेत्याने चकार शब्दही काढला नाही. महाराष्ट्रातच आता शिंदे-गट-भाजपचे सरकार बनल्यानंतर शिवसेनेचे आमदार संजय राठोड, ज्यांच्यावर भाजपनेच एका महिलेच्या खूनाचा आरोप करत राजीनामा द्यायला भाग पाडले होते, त्यांना मंत्री बनवले आहे. थोडक्यात भाजपात जा आणि सर्व गुन्हे धूवून काढा!

भाजपच्या राजस्थानातील सरकारने 2014 मध्ये एक अध्यादेश काढला, ज्याद्वारे ग्रामपंचायत निवडणुकींकरिता 5 वी ते 8 वी शिक्षण अट घातली, आणि अशाप्रकारे 80 टक्क्यांच्या वर स्त्रियांचा निवडून जाण्याचा अधिकारही काढून घेतला! अशाच प्रकारचा अध्यादेश हरियाणातही काढला होता, ज्यावर नंतर कोर्टाद्वारे स्थगिती देण्यात आली.

ऑगस्ट 2022 मध्ये उत्तरप्रदेशातील भाजप नेते विनिता अग्रवाल आणि त्यांचे पती कृष्णमुरारी अग्रवाल यांनी 1.8 लाख रुपये देऊन एका तान्ह्या बाळाला विकत घेतले, कारण यांना मुलगी असतानाही मुलगा हवा होता! एकीकडे "बेटी बचाओ" चा नारा देणारे मोदी सरकार, आणि दुसरीकडे भाजपच्या नेत्या मनेका गांधी यांनी यावर्षी असा प्रस्ताव दिला की अर्भकाचे लिंग ठरवणे सक्तीचे केले जावे, आणि असेही म्हटले की वैवाहिक बलात्काराला भारतीय संदर्भात वेगळे करून पाहिले पाहिजे!

महिलांकरिता असलेल्या इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट स्कीम (आय.सी.डी.एस.) मधील खर्चातही मोदी सरकारने गेल्या 8 वर्षाचा जमाखर्च पाहता एकंदरीत खर्चात मोठी कपात केली आहे. "बहुत हुआ नारीपर वार" म्हणणाऱ्या या सरकारच्या काळात महिलांवरील हिंसाचाराच्या नोंदवलेल्या घटनांमध्ये (कारण की न नोंदवलेल्या घटनांचे प्रमाण फार मोठे आहे) 2020 च्या तुलनेत 2021 मध्ये 15.3 टक्के वाढ झाली आहे आणि 2021 मध्ये 4,28,278 गुन्हे नोंदवले गेले आहेत. भाजपशासित उत्तरप्रदेश राज्य या गुन्ह्यांमध्ये अग्रणी आहे यात काही आश्चर्य नाही.

देशभरात सर्वत्र "लव्ह जिहाद"च्या नावाने खोटा प्रचार करून संघी लोकांनी महिलांना जोडीदाराच्या निवडीच्या अधिकारापासून सतत वंचित केले आहे, आणि स्त्रिला एक स्वतंत्र व्यक्ती न मानता तिला तिच्या "समाजाची" मालकी मानले आहे. उत्तरप्रदेशात तर सरकारने "रोमिओ स्क्वाड" स्थापले आहेत, ज्यांचे कामच लोकांना प्रेम करण्यापासून परावृत्त करणे आहे.

परिणाम आहे की 2022 मध्ये जगातील 146 देशांमध्ये लैंगिक समानतेच्या बाबतीत भारताचा क्रमांक 135 वा आहे, आणि बांग्लादेश, नेपाळ, श्रीलंका, मालदीव्स, भूतान पेक्षाही भारताचा क्रमांक खाली आहे! 2017 मध्ये हा क्रमांक 108 होता, म्हणजे घसरण चालूच आहे.

## जातीयवादी भाजप

गेल्या 8 वर्षात एस.सी., एस.टी. समुदायांवर होणाऱ्या जातीय अत्याचारांमध्ये सतत वाढ झाली आहे. 2021 मध्ये एस.सी. आणि एस.टी. समुदायांवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये 1.2 टक्के आणि 6.4 टक्के वाढ झाली आहे. यामध्ये भाजपशासित उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश राज्ये सर्वात आघाडीवर आहेत. कॉंग्रेस शासित राजस्थान सुद्धा यात मागे नाही हे विसरता कामा नये. एस.सी. अत्याचारांसदर्भातील एकूण 2,63,512 खटले आणि एस.टी. अत्याचारांसंदर्भातील एकूण 42,512 खटल्यांपैकी जवळपास 96 टक्के खटले न्यायालयांमध्ये प्रलंबित होते. म्हणजेच या खटल्यांमध्ये न्याय मिळावा याकरिता केंद्र आणि राज्य सरकारांचे काहीही प्राधान्य नव्हते.

ऑगस्ट 2022 मध्येच भाजपच्या नेत्या सीमा पात्रा यांनी एका आदिवासी घरकामगार महिलेला छळल्याचे पुरावे समोर आले आहेत. असे असतानाही जुलै मध्येच ज्यांचा भाजपने "आदीवासी राष्ट्रपती" म्हणून गवगवा केला, त्या भाजपच्या नेत्या द्रौपदी मुर्मू यांनी मात्र चकार शब्दही काढलेला नाही. राजस्थानातील जालोर मधील पाणी पिले म्हणून शालेय विद्यार्थ्याला मारहाणीची घटना असो वा उत्तरप्रदेश अथवा ओरिसात थुंकी चाटायला लावण्यापासून पाय चाटायला लावण्यापर्यंतच्या घटना असोत, भाजप नेत्यांनी रस्त्यावर उतरणे सोडाच, सोशल मीडियावरही निषेध नोंदवल्याचे अपवादानेच दिसेल!

देश स्वतंत्र झाल्यापासून दलित, आदिवासींवर होणाऱ्या अत्याचारांचे सत्र नेहमीच वाढत गेले आहे. भाजप केंद्रात सत्तेवर आल्यापासून तर ब्राह्मणवादी शक्तींना विशेष जोर आला आहे. हिंदू एकतेच्या गोष्टी करणाऱ्या भाजपच्या नेत्यांनी आजवर जातीय अत्याचाराच्या घटनांवर कधीही निर्वाणीचा आवाज उठवलेला नाही, याचे कारणच आहे की यांच्या हिंदुराष्ट्राच्या कल्पनेमध्ये जातीय उतरंडीच्या आधारावर भेदभाव करणे गुन्हा नाहीच!

## लोकशाही अधिकार विरोधी भाजप

लोकशाही, नागरी अधिकारांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांचे, संघटनांचे दमन ही 2014 पासून एक सर्वसाधारण परिघटना बनली आहे. ब्रिटीशांनी बनवलेल्या राजद्रोहाच्या कायद्याचा वापर भाजपने एका सर्वोच्च टोकावर नेऊन ठेवला आहे. 2014 पासून देशात तब्बल 399 राजद्रोहाचे खटले भरले गेले आहेत, ज्यामध्ये कामगार नेते, विरोधी राजकीय कार्यकर्ते, लोकशाही-नागरी अधिकारांसाठी लढणारे कार्यकर्ते, आदिवासी-दलित अत्याचारांविरोधात लढणारे कार्यकर्ते, पत्रकार, जनपक्षधर वकील अशा अनेकांवर खोटे खटले दाखल केले गेले आहेत. यापैकी 2020 पर्यंत फक्त 144 खटल्यांमध्ये चार्जशीट दाखल केले गेले होते, म्हणजेच या दमनकारी कायद्यातील तरतुदींआधारे जनतेकरिता आवाज उठवणाऱ्यांना फक्त तुरुंगात सडवण्याच्या उद्दिष्टाने खटले भरले जात आहेत हे स्पष्ट आहे. आश्चर्याची गोष्ट नाही की भाजप शासित आसाम, उत्तरप्रदेश, कर्नाटक अशी राज्ये यात आघाडीवर आहेत.

याचाच भाग म्हणून भाजपने गुन्हेगारी प्रक्रिया संहिता (क्रिमिनल प्रोसिजर कोड) मध्ये असे बदल केले आहेत ज्याद्वारे आता कोणत्याही व्यक्तीचे सर्व जैविक नमुने (रक्त, लघवी, थुंकी, इत्यादी) पोलिस घेऊ शकतात! मोदी सरकारने जाहीर केले आहे की आय.पी.सी, सी.आर.पी.सी.मध्ये ते अजून मोठे बदल करवणार आहेत. यात शंका नाही की उपलब्ध असलेल्या नागरी-लोकशाही अधिकारांच्या अधिक संकुचनाकडेच नेणारे हे बदल असतील.

गेल्या वर्षभरात मात्र न्यायव्यवस्थेने भाजपसमोर जे लोटांगण घातले आहे त्यात गुणात्मक उंची गाठली आहे. संविधानातील मूलभूत अधिकाराचा वापर करत न्याय मागण्याकरिता कोर्टापुढे येणाऱ्यांनाच दोषी ठरवून शिक्षा देण्याचे सत्र आता सुरू झाले आहे. गांधीवादी कार्यकर्ते हिमांशू कुमार यांना सर्वोच्च न्यायालयाने केलेली शिक्षा अजून काही नाही तर न्याय मागणाऱ्यालाच शिक्षा देण्याच्या सत्राची सुरुवात आहे. याच साखळीत टीस्टा सेटलवड (ज्यांच्या एन.जी.ओ.पंथी राजकारणाशी पूर्ण मतभेद असले तरीही) यांच्यावर दाखल केला गेलेला खटला आहे. अल्ट-न्यूज या खोट्या बातम्यांचा पर्दाफाश करणाऱ्या वेबसाईटचे मुख्य पत्रकार जुबैर यांच्यावर दाखल खटला असो वा आजवर जामीन नाकारत तुरुंगात ठेवलेल्या इतर अनेक कार्यकर्त्यांची उदाहरणे, ही सर्व हेच दाखवतात की वरवर लोकशाहीचा दिखावा कायम ठेवत, भाजपने सर्व लोकशाही संस्थांना आतून पोखरून काढले आहे आणि सर्व जनांदोलनांना चिरडू शकणाऱ्या यंत्रणेची निर्मिती केली आहे.

## दहशतवाद्यांना खतपाणी घालणारा भाजप

एकीकडे दहशतवादाच्या विरोधात भाजप सतत ओरडा करत असते परंतु खुद्द भाजप आणि संघाचे कार्यकर्ते सतत दहशतवादी कारवायांमध्ये पकडले गेले आहेत. 3 जुलै 2022 रोजी जम्मूमध्ये भाजपच्या अल्पसंख्यांक मोर्चाच्या सोशल मीडिया प्रमुखपदी असलेल्या तालिब हुसेन शाह याला दहशतवादाच्या आरोपांखाली अटक केली गेली. जानेवारी 2020 मध्ये जम्मू-काश्मिर पोलिसांनी दविंदर सिंह या पोलिस अधिकाऱ्याला हिज्बुल मुजाहिदीनच्या एका अतिरेक्याला दिल्लीला घेऊन जाताना अटक केली होती. अटक होताना दविंदर सिंह इशारा देत होता की यामागे मोठी लोक आहेत आणि पोलिसांनी यामध्ये पडू नये. मे 2021 मध्ये त्याला भाजपचे गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी नोकरीतून काढून टाकले, परंतु काढताना असे म्हटले की "देशाची सुरक्षा लक्षात घेता या प्रकरणात चौकशी करणे गरजेचे वाटत नाही". दविंदर सिंहला इतकी कमी शिक्षा देऊन का सोडले असेल? काश्मिरमध्येच भाजपचा कार्यकर्ता असलेला तारीक अहमद मीर याला दहशतवाद्यांना शस्त्रे पुरवल्याच्या आरोपाखाली 2020 मध्ये अटक केली गेली होती. काश्मिरमध्येच श्रीनगर नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने मसूद अझर या दहशतवाद्याच्या सहाय्यक असलेल्या

पान 15 वर

# कामगारविरोधी, स्त्री-विरोधी, जातीयवादी, दहशतवादी, भ्रष्टाचारी, दुतोंड्या फॅसिस्टांचा पर्दाफाश करा!

पान 14 वरून

महंमद फारुक खान याला तिकीट दिले होते.

भाजपचा आसाममधील एक नेता निरंजन होजाई याला 2017 मध्ये दहशती कारवायांकरिता पैसे पुरवण्याच्या आरोपाखाली कोर्टाने शिक्षा सुनावली होती. 2017 मध्ये भाजप युवा मोर्चा आय.टी. सेलचा कार्यकर्ता ध्रुव सक्सेना याला पाकिस्तानी आय.एस.आय. सोबत असलेल्या संबंधांकरिता अटक केली गेली होती. विश्व हिंदू परिषदेचा कार्यकर्ता असलेल्या बलराम सिंह राठोड याला सुद्धा आय.एस.आय. सोबत असलेल्या संबंधांकरिता अटक केली गेली होती. 2019 मध्ये मणिपूर मध्ये कुकी नॅशनल आर्मी या दहशतवादी संघटनेने भाजपला मतदान करावे अन्यथा हल्ले होतील अशी धमकी दिली होती. रोज पाकिस्तानच्या नावाने गळे काढणाऱ्या संघाचे नेता वेद प्रताप मलिक हे 2014 मध्ये पाकिस्तानमध्ये जाऊन अतिरेकी हाफीज सईद याला भेटून आले होते, ज्याचा कधीच खोलवर तपास झाला नाही!

इतकेच नव्हे तर हिंदूंवर केल्या जाणाऱ्या अनेक हल्ल्यांमागे सुद्धा संघ-भाजपचे कार्यकर्ते असल्याचे पुढे आले आहे. उदयपुर मध्ये कन्हैया लाल या व्यक्तीचे मुंडके उडवणारा महंमद रियाज हा व्यक्ती भाजपचा कार्यकर्ता निघाला. अमरावती येथे उमेश कोल्हे या केमिस्टच्या खुनाकरिता जबाबदार असलेला इर्फान खान याचेही भाजपशी जवळीक असलेल्या नवनीत राणा-रवी राणांसोबत जवळचे नाते असल्याचे आरोप आता समोर आले आहेत. मालेगाव बॉंब स्फोटातील आरोपी खासदार प्रज्ञा ठाकुर, कर्नल पुरोहित आणि इतरांना सत्तेचा गैरवापर करून भाजपने सोडवण्याचे काम केले आहे, परंतु हेमंत करकरे यांनी उपलब्ध करून दिलेले पुरावे स्पष्टपणे दाखवतात की हिंदुत्ववादी संघटनांनीच हे स्फोट केले होते.

या सर्वांपलीकडे हिंदुत्ववादाशी निगडीत अनेक संस्था (जसे की सनातन संस्था, विश्व हिंदू परिषद, दुर्गा वाहिनी, इत्यादी) देशभरामध्ये ठिकठिकाणी हत्यारांचे प्रशिक्षण देणारे वर्ग आयोजित करत असतात, संघाचे अनेक कार्यकर्ते देशाच्या विविध भागात बॉंब बनवताना आढळले आहेत (उदा: जानेवारी 2022 मध्ये केरळमध्ये अलकोडे बिजू हा संघाचा कार्यकर्ता घरात बॉंब बनवताना जखमी झाला). नुकतेच यशवंत शिंदे या संघाच्या कार्यकर्त्याने नांदेड येथे अफेडेविट करून कोर्टासमोर मांडले आहे की त्याने स्वत: 2004 च्या अगोदर बॉंब बनवण्यात सहभाग घेतला होता आणि देशभरात अनेक ठिकाणी झालेल्या बॉंबस्फोटांमध्ये संघाशी जोडलेल्या संस्था सामील होत्या. त्याने असेही मांडले की सिंहगडाच्या पायथ्याशी बॉंब बनवण्याची प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली गेली होती.

भाजपच्या 83 आमदार-खासदारांवर गुन्हे दाखल आहेत, आणि या बाबतीत इतर पक्षांना मागे टाकून हा पक्ष पहिल्या क्रमांकावर आहे. लोकसभेत गुन्हेगारी खटले असणाऱ्यांपैकी 55 टक्के खासदार भाजपचे आहेत. इतर सर्व पक्षांमधील गुन्हेगारांकरिता भाजपने दरवाजे सताड उघडले आहेत. या गुन्हेगारी वृत्तीला खतपाणी घालण्यामागे आपली सत्ता कोणत्याही प्रकारे टिकवणे हेच भाजपचे उद्दिष्ट आहे. लोकशाही, नितिमत्ता, तत्त्वे या फक्त बोलाच्या कढी आहेत!

## भ्रष्टाचारी भाजप

नुकतेच स्मृती इराणींच्या कुटुंबियांद्वारे गोव्यामध्ये एक दारूचे दुकान बेकायदेशीररित्या चालवले जात असल्याचे समोर आले. अशी छोटी भ्रष्टाचाराची प्रकरणे म्हणजे फक्त हिमनगाचे टोक आहे. खालपासून वरपर्यंत भाजपची सरकारे भ्रष्टाचारात आकंठ बुडालेली आहेत.

सामान्य माणसाच्या जीवनात ज्या भ्रष्टाचाराला तोंड द्यावे लागते, त्यात कुठेही कमी आहे का? नाही! सर्व देशभरामध्ये भाजपने जी मोठमोठी आलिशान कार्यालये उभी केली आहेत, दिल्लीमध्ये जे पंचतारांकित कार्यालय उभे केले आहे, त्याचा निधी कुठून आला आहे? कॉंग्रेसच्या काळात जी भ्रष्टाचाराची प्रकरणे समोर आली (आठवा टू जी घोटाळा, कोळसा घोटाळा, इत्यादी) त्यापैकी कोणत्या खटल्यांमध्ये भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई झाली आहे? देशभरामध्ये अनेक राज्यांमध्ये (गोवा, महाराष्ट्र, मणिपुर, इत्यादी) भाजपने इतर पक्षांना फोडून आमदार विकत घेण्यासाठी जे पैसे वापरले ते कुठून आले?

सर्व भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये कॉंग्रेसी व इतर पक्षांच्या नेत्यांसहित मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्या सुद्धा सामील आहेत. याच त्या कंपन्या आहेत ज्या आज भाजपवर एकदम फीदा आहेत आणि भाजपच्या मुख्य पाठिराख्या व आधारस्तंभ आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराचे मुद्दे हे फक्त जनतेला भ्रमात ठेवण्यासाठी आहेत!

सर्व देशभरामध्ये भाजपने ईडीला कामाला लावून अनेक पक्षांच्या भ्रष्ट नेत्यांवर कारवाया चालवल्या आहेत. परंतु जे नेते भाजपत सामील होत आहेत, त्यांच्यावर मात्र ईडी कारवाया थंडावल्या आहेत. नारायण राणे, भावना गवळी, प्रताप सरनाईक, यशवंत जाधव असे महाराष्ट्रातील अनेक नेते आहेत ज्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, परंतु हे सगळे आता भाजपमध्ये जाऊन "पवित्र" झाले आहेत. देशभरात पाहिले तर आसाममध्ये हेमंत बिस्व शर्मा, कर्नाटकात येडियुरप्पा, बंगालमध्ये मुकुल रॉय अशी नेत्यांची अनेक नावे आहेत ज्यांना भाजपने त्यांच्या भ्रष्टाचारासहित सामावून घेतले आहे.

राफेल विमान घोटाळा, महाराष्ट्रात चिक्की घोटाळा, कर्नाटकातील जमिन आणि खाणी घोटाळा, ललित मोदी घोटाळा, विजय मल्ल्या घोटाळा, निरव मोदी घोटाळा, अडानी वीज घोटाळा, महाराष्ट्रातील तूरडाळ घोटाळा, राजस्थानातील खाण घोटाळा, छत्तीसगढ मध्ये रेशन घोटाळा, गोव्यातील घरप्रकल्प घोटाळा, कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील गॅस घोटाळा, उद्योगपतींना कर्जमाफी घोटाळा, वैद्यकीय प्रवेश परिक्षा 'नीट' मधील घोटाळा, मध्यप्रदेशातील व्यापम घोटाळा असे अनेक घोटाळे आहेत ज्यांची फक्त नावे वरवर समजली आहेत. याचे मुख्य कारण आहे बड्या भांडवलदारांचा आणि त्यांनी नियंत्रित केलेल्या भांडवली प्रसारमाध्यमांचा मोदी सरकारला असलेला एकमुखी पाठिंबा, ज्यामुळे भ्रष्टाचाराला मुद्दा बनवलेच जात नाही आणि आजही दैनंदिन जीवनात नित्याची गोष्ट असलेल्या सर्व मोठमोठ्या भ्रष्टाचारांवर पांघरूण घातले जाते.

## भांडवलदारांच्या सेवेत लीन भाजप

भाजपचे खरे वास्तव हे आहे की तो बड्या भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष आहे. भाजपचा उदय आणि निरंतर "विकास" यामागे खरी शक्ती आहे ती बड्या भांडवलदारांनी ओतलेल्या पैशांच्या राशींची, भांडवलदारांनी आपल्या टीव्ही चॅनेल्स व वर्तमानपत्रांमार्फत दिलेल्या साथीची.

गेल्या 8 वर्षांमध्ये बड्या कॉर्पोरेट कंपन्यांद्वारे दिल्या जाणाऱ्या अधिकृत आणि अनधीकृत निधीचा सर्वात मोठा वाटा भाजपलाच मिळाला आहे. 2019-20 मधील अधिकृत आकडे सांगतात की एकट्या भाजपला 4,847 कोटी रुपयांचा निधी भांडवलदारांनी दिला व इतर सर्व राष्ट्रीय पक्षांना मिळून फक्त 2,141 कोटी रुपये दिले. गेल्या 7 वर्षातील कॉर्पोरेट देणग्यांचा 82 टक्के हिस्सा भाजपला गेला आहे. या सर्वांची परतफेड सुद्धा भाजपने इमाने-इतबारे केली आहे.

मोदीचे सर्वात लाडके "मित्र" असलेले गौतम अडानी आता जगातील तिसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती झाले आहेत आणि जवळपास 138 अब्ज डॉलर्स, म्हणजे 10 लाख कोटी रुपयांच्या (1वर तेरा शून्य) उद्योगांचे ते आता मालक बनले आहेत. दुसरे "मित्र" मुकेश अंबानी सुद्धा 103 अब्ज डॉलर्स सहित खूप मागे नाहीत. जनता करोनाच्या आगीत होरपळत असताना यांच्या संपत्तीमध्ये दरवर्षी 24 टक्के वाढ होत होती.

भाजपचे केंद्रिय मंत्री नितीन गडकरी सांगतात की त्यांनी 80 लाख कोटी रुपयांचे रस्ते प्रकल्प बांधले आहेत. या सर्व रस्त्यांवर टोल घेतला जातो. या सर्व बांधकाम कंपन्या भाजपच्या मोठ्या समर्थक व देणगीदार बनल्या आहेत.

अनेकदा मोदी सरकारला "अडानी-अंबानी"चे सरकार म्हटले जाते, ते मात्र योग्य नाही. भारतात सरकारचे काम भांडवली व्यवस्थेचे रक्षण, संवर्धन करणे /आहे ना की मूठभर भांडवलदारांचे. एखाद्या पक्षाला जवळ असलेल्या उद्योगपतींवर विशेष मेहेरबानी होतही असेल परंतु व्यवस्था चालवणाऱ्या सर्व भांडवलदरांच्या वर्गाचे हितरक्षण करणे त्यांसाठी आवश्यकच आहे. यामुळेच आज भारत अब्जाधीशांच्या यादीत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे, आणि भारतात 215 अब्जाधीश आहेत! आज देशातील संपत्तीच्या 77 टक्के हिस्सा फक्त 10 टक्के लोकांकडे आहे, 2017 मध्ये निर्माण झालेल्या संपत्तीच्या 73 टक्के वाटा वरच्या फक्त 1 टक्के लोकांकडे गेला, तर खालच्या 50 टक्के लोकांकडे फक्त 1 टक्के संपत्ती वाढली. ज्या देशात सर्वाधिक गरीब लोक राहतात त्याच देशात सर्वाधिक अब्जाधीश असणे हा तर भांडवली उत्पादन व्यवस्थेचाच सर्वसाधारण परिणाम आहे कारण मेहनत करणाऱ्यांना गरिब ठेवूनच तर मालक वर्ग श्रीमंत होत असतो.

या भांडवलदार वर्गाला अनिर्बंधपणे श्रमाची लूट करता यावी याकरिताच कामगार कायदे बदलले जात आहेत, या लुटीतून निर्माण होणारा महागाई, बेरोजगारीविरोधातील जनतेचा असंतोष दाबता यावा म्हणूनच सी.आर. पी.सी. बदलला जात आहे, या असंतोषाला दाबण्यासाठीच संघ परिवारातील गुंड संघटना पोसल्या जात आहेत आणि जातधर्मांचे मुद्दे सतत उपस्थित केले जात आहेत, दहशतवाद्यांना अप्रत्यक्ष वा प्रत्यक्ष समर्थन यासाठीच दिले जात आहे कि जनतेला सतत या मुद्दाभोवती भयभित करता यावे, सर्व प्रकारच्या स्त्री-विरोधी, लंपट, जातीयवादी तत्त्वांना भाजप सामावून घेत आहे कारण की जनतेचे दमन करण्याकरिता अशाच शक्तिंची आवश्यकता असते!

## भांडवलदारांची निवड: काल कॉंग्रेस, आज भाजप.

2014 पासून देशातील भांडवलदार वर्गाचा लाडका पक्ष भाजपच आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून नेहरुंपासून ते मनमोहन सिंहांपर्यंत ज्या कॉंग्रेसने देशातील भांडवली व्यवस्थेची वाढ केली, ती कॉंग्रेस आता भांडवलदार वर्गाला तुलनेने नावडती होण्याचे कारणच आहे की आर्थिक संकटाच्या काळात भांडवलदार वर्गाला आता अशा हिंस्त्र शक्तीची गरज आहे जी राज्यसत्तेच्या मजबुतीची जास्त सक्षम हमी देऊ शकेल. भांडवलदार वर्गाने भाजपची कास धरण्याचे कारण आहे की जगभरात गडद होत चाललेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर, ज्याची चाहूल भारतात 2012 पासूनच लागलेली होती, देशातील भांडवली अर्थव्यवस्थेला चालू ठेवण्याकरिता ज्या प्रकारच्या "फौलादी", दमनकारी, "प्रचार" कुशल, जनतेला भरकटवू शकणाऱ्या नेतृत्वाची गरज होती ते नेतृत्व देण्याची क्षमता सर्वाधिक भाजपमध्येच होती. याचे कारण आहे भाजपमागे असलेली संघ परिवाराची संघटित शक्ती, जी एका प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलनाच्या स्वरूपात जनतेमध्ये सुस्थापित आहे. भाजपने सुद्धा हा "विश्वास" सार्थ ठरवत गेली 8 वर्षे भांडवलदार वर्गाची सेवा करत सत्ता चालवली आहे. नेहरुंचा नकली समाजवादाच्या धोरणांपासून ते मनमोहन सिंहांनी राबवलेल्या नव-उदारवादी धोरणांपर्यंत, कॉंग्रेसने 60 वर्षांपेक्षा जास्त काळ देशातील जनतेच्या श्रमाच्या लुटीतून देशी भांडवलदार वर्गाला बलाढ्य बनण्याची सर्व परिस्थिती उपलब्ध करून दिली. त्याच कॉंग्रेसची परंपरा आज त्याहीपेक्षा निरंकुशपणे भाजप पुढे नेत आहे. भांडवलदार वर्गाने फक्त चेहरा बदलला आहे, चरित्र नाही, हे विसरता कामा नये.

हा भ्रम दूर केला पाहिजे की फॅसिझम फक्त हिटलर वा मुसोलिनीच्या सत्तेप्रमाणे सर्व लोकशाही यंत्रणा मोडीत काढून पुर्णपणे हुकूमशाही पद्धतीनेच काम करू शकतो. 1930 च्या दशकातील अकस्मातपणे आलेल्या आर्थिक संकटाच्या तुलनेने आजचे आर्थिक संकट हे अकस्मात नसून दीर्घकालिक आहे आणि त्यामुळेच जर्मनी-इटलीमध्ये झालेल्या फॅसिझमच्या अकस्मात उभाराच्या तुलनेत भारतातील फॅसिझमचा उदय आणि कालखंड सुद्धा दीर्घकालिक आहे व असेल. आर्थिक संकटाच्या या बदलत्या रूपामुळेच फॅसिझमचा हा नवा अवतार लोकशाहीला ध्वस्त न करता वरवर लोकशाहीची संरचना टिकवेल परंतु तिला आतून पूर्णपणे पोखरून काढून भांडवलदार वर्गाच्या सेवेकरिता गरजेनुसार अधिकारशाही, हुकूमशाही धोरणे लागू करत राहील. उदारवाद्यांनी पसरवलेला हा भ्रम सुद्धा डोक्यातून काढून टाकला पाहिजे की या सर्वांकरिता भाजपला राज्यघटना गुंडाळून ठेवावी लागेल. खरेतर आजवर भाजपने जे काही केले आहे त्या

पान 13 वर

## 28ऑगस्ट, महान जातीविरोधी योद्धे अय्यंकालींच्या जन्मदिनानिमित्त

# अय्यंकालींचा जातीअंताचा वारसा पुढे न्या!

✍ सुस्मित

ज्यावेळी भारतात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत होता त्याच वेळी राजस्थानच्या जालोरमध्ये एका 9 वर्षाच्या मुलाला स्वत:ला उच्च जातीय समजणाऱ्या शिक्षकाने सवर्णांसाठीच्या मडक्यातले पाणी पिले म्हणून इतके मारले की उपचारादरम्यान मुलाचा मृत्यू झाला; 10 एप्रिल 2022 रोजी उत्तरप्रदेशात एका दलित मुलाला उच्च जातीय मुलाचे पाय चाटायला लावले गेले, जातीय शिवीगाळ करण्यात आली; मार्च 2022 मध्ये एका दलित माहिती अधिकार कार्यकर्त्याला मध्यप्रदेश मध्ये मारहाण केली गेली आणि मूत्र प्यायला लावले. अशा जातीय हिंसाचाराच्या घटना आजही देशात घडत आहेत. या घटनांनी हे स्पष्टच आहे की स्वतंत्र भारताने कागदावरून अस्पृश्यता नष्ट केली असली तरी जमिनीवर ती अजूनही अस्तित्वात आहे. त्यामुळे आजच्या शोषणकारी व्यवस्थेच्या विरोधातल्या लढ्यात जातीच्या प्रश्नाला विचारात घेतल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. यासाठीच इतिहासातल्या महान नेत्यांना आठवणे गरजेचे आहे ज्यांनी जाती विरोधात झुंजार संघर्ष केला. असेच एक महान योद्धे म्हणजे अय्यंकाली. अय्यंकाली केरळमधील जातिअंताच्या लढाईतले महत्त्वाचे नेते होते ज्यांनी ब्राह्मणवादाविरुद्ध आणि त्याला पोसणाऱ्या सामंतवाद, ब्रिटीश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. यासाठी त्यांनी सरकारला अर्ज, विनंत्या केल्या नाहीत तर जनतेच्या सामूहिक ताकदीवर विश्वास ठेवून क्रांतिकारी लढे उभे केले. यात ते यशस्वी सुद्धा झाले. त्यांनी दाखवून दिले की शोषित जनता फक्त लढू शकते असे नाही तर जिंकू सुद्धा शकते. अय्यंकालीना आज आठवणे खूप महत्त्वाचे आहे कारण आज जातिअंताची चळवळ सुधारवाद आणि व्यवहारवादाच्या दलदलीत फसली आहे. लेखाच्या पुढील भागात आपण अय्यंकालींच्या जीवनकार्याबद्दल माहिती घेऊ तसेच आजच्या जातिअंताच्या चळवळीसाठी काही महत्त्वाचे धडे सुद्धा घेऊ.

### कोण होते अय्यंकाली?

अय्यंकालींचा जन्म 28 ऑगस्ट 1863 ला ब्रिटीश भारतातील दक्षिणेकडील त्रावणकोरच्या संस्थानातील तिरुवनंतपुरम जिल्ह्याच्या वेंगनूर मध्ये झाला. त्यांचा जन्म केरळमधील सर्वाधिक दमित आणि अत्याचारित दलित जातींमधील एक असलेल्या पुलयार जातीमध्ये झाला. त्रावणकोर मध्ये पुलयार लोकांना ब्राह्मणवादी उतरंडी मध्ये सर्वात खालचे स्थान देण्यात आले होते. त्यांना नायर जातीच्या जमीनदारांपासून इतर सर्व तथाकथित उच्चजातीयांकडून होणारे अपमान आणि दमन सहन करावे लागत होते. या स्थितीने अय्यंकालींच्या मनात बंडाची आग लावली. सुरुवातीला तर ते आपल्या इतर पुलयार मित्रांसोबत शेतमजुराचे काम केल्यावर अशा गीतांची आणि नृत्याची निर्मिती करू लागले जे या स्थितीच्या विरोधात आवाज उचलत होते. यामुळे अनेक युवक दलित त्यांना येऊन मिळू लागले. अय्यंकाली सुरुवातीपासूनच समजत होते की उच्च जातींद्वारे दलितांचे दमन आणि त्यांच्या विरोधात केल्या जाणाऱ्या हिंसेच्या प्रश्नावर इंग्रज सरकार काहीच करणार नाही. त्यामुळे या दमन आणि हिंसेचे उत्तर त्यांनी स्वत: रस्त्यावर देण्याचा मार्ग निवडला. त्यांच्या आजूबाजूला युवकांचा एक समूह अस्तित्वात येऊ लागला आणि हा समूह प्रत्येक हल्ल्याचे उत्तर ब्राह्मणवाद्यांना रस्त्यांवर देऊ लागला. ही हिंसा खरेतर आत्मरक्षणासाठी केली जाणारी हिंसा होती. पण या प्रकारच्या पलटवाराने ब्राह्मणवादी शक्ती धाकात आल्या. अय्यंकालींच्या या मार्गावर चालण्यामुळे दलित सामान्य कष्टकरी जनता त्यांच्यावर प्रेम करू लागली आणि त्यांना अनेक उपाधी दिल्या, जसे की उर्पिल्लई आणि मूथपिल्ला (मोठा भाऊ).



अय्यंकाली अनेक प्रकारच्या धार्मिक सुधारकांनी प्रभावित झाले ज्यामध्ये अय्यावू स्वामिकल आणि नारायण गुरू हे प्रमुख होते. हे दोघेही हिंदू धर्मामधील जातीय भेदभावाविरुद्ध संघर्ष करत होते. मानवतावाद त्यांच्या धार्मिक तत्वज्ञानाचा आधार होता. अय्यंकाली धार्मिक सुधारवादाच्या पुढे गेले नाही. असे असूनही अय्यंकाली सामाजिक आणि राजकीय क्रांतिकारक होते कारण अय्यंकालींना त्या वेळेच्या इंग्रज राज्यसत्तेचे वर्गीय चरित्र समजले होते जे नेहमी ब्राह्मणवादी सामंतांच्या बाजूनेच होते. म्हणून त्यांनी कधीही सरकारला अर्ज, विनंत्या करण्यावर विश्वास ठेवला नाही तर जनतेच्या सामूहिक शक्तीवर त्यांना विश्वास होता. राज्यसत्तेचे कामच शोषणकारी व्यवस्था टिकवून ठेवायचे आहे त्यामुळे त्या सत्तेविरोधात रस्त्यावर उतरून संघर्ष केल्याशिवाय समानतेची आणि अधिकारांची लढाई लढता येत नाही हे त्यांना समजले होते. त्यामुळे तत्त्वज्ञानाच्या पातळीवर जरी ते भौतिकवादी नसले तरी समानतेच्या लढाईत ते कुठल्याही ईश्वरी शक्तीवर अवलंबून राहिले नाहीत तर जनतेच्या संघटित शक्तीद्वारे बळाच्या वापराचे महत्त्व समजून होते. त्यांच्या आयुष्यात लढलेल्या आंदोलनांतून हे दिसून येते.

### अय्यंकाली यांनी लढलेली आंदोलने: स्वातंत्र्य फेरी आणि चेलियार जनविद्रोह

अय्यंकालींच्या वेळची सामाजिक स्थिती ब्रिटिश इतिहासकार रॉबिन जेफ्री यांच्या खालील परिच्छेदावरून समजून घेता येऊ शकते. “एक नायर नंबुद्रि ब्राम्हणाजवळ जाऊ शकतो पण शिवू शकत नाही; एखाद्या एझवाने 36 पावले आणि पूलयान गुलामाने 96 पावले अंतर ठेवावे. एझवाने नायर पासून 12 पावले आणि पूलयान गुलामाने 66 पावले अंतर ठेवावे. एखादा सिरियन ख्रिश्चन नायरला शिवू शकतो पण त्यासोबत खाऊ शकत नाही. पुलयार आणि परयार, जे सर्वाधिक खालच्या जातीचे आहेत, ते एकमेकाजवळ येऊ शकतात पण शिवू शकत नाही.” अशा परिस्थितीत जेव्हा दलितांना सार्वजनिक रस्त्यांवरून चालायला बंदी होती, गुढघ्यापर्यंत वस्त्र परिधान करण्याची सक्ती होती, गळ्यात दगड अडकवून चालण्याची सक्ती होती अशा वेळेस अय्यंकालींनी या सर्व अत्याचारांविरोधात निर्णायक लढा दिला. 1863 मध्ये अय्यंकाली सार्वजनिक रस्त्यावरून बैलगाडी (विल्लूवंडी) घेऊन, पांढरी लुंगी, पांढरा सदरा (अंगवस्त्रम), पांढरी पगडी (थलपव्वू पगडी) घालून रस्त्यावरून निघाले. अय्यंकालींवर ब्राह्मणवाद्यांनी अनेक ठिकाणी हिंस्त्र हल्ले केले पण अय्यंकाली डगमगले नाहीत आणि जशास तसे उत्तर देत गेले. यानंतर अशा कृतींची केरळमध्ये लहरच पसरली आणि अनेक ठिकाणी उच्चजातीय आणि दलितांमध्ये संघर्ष झाले ज्याला इंग्रजांनी चेलीयार दंगली म्हटले. पण शोषक वर्ग नेहमीच जनतेच्या विद्रोहांना बदनाम करण्याचे काम करत असतो. पण यामुळेच 1900 सालापर्यंत दलितांना सार्वजनिक रस्त्यावरून चालण्याचा अधिकार मिळाला होता.

### केरळ मधील पहिला कामगारांचा संप

1905 मध्येच अय्यंकालींनी शेतमजुरांचा पहिला ऐतिहासिक संप घडवून आणला. त्यात कामगारांच्या अनेक महत्तवपूर्ण मागण्या होत्या. त्यात मजुरांना फिरण्याचे स्वातंत्र्य, मुलांना शाळेत प्रवेश, तसेच गैर हंगामाच्या काळात पगार मिळाला पाहिजे, कामा दरम्यान विश्रांती, पैशाच्या रूपात मजुरी या मागण्या होत्या. अशाप्रकारे अय्यंकालींनी कामगारांची वर्गीय एकजूट बांधून संघर्ष केला, आणि अस्मितेचे राजकारण नाकारले. अय्यंकाली समजत होते की दलितांच्या शोषणाचे मूख्य कारण ते संपत्ती संबंध आहेत जे सवर्ण जातींना बळकट करतात.

### शाळांमध्ये प्रवेशासाठी लढा

त्या काळी दलितांना शाळांमध्ये शिकायला बंदी होती. त्यामुळे अय्यंकालींनी दलितांसाठीच्या शाळा काढल्या. पण ब्राह्मणवाद्यांनी अनेक शाळा जाळून टाकल्या. अय्यंकालींनी साधु जन प्रपालना परिषद (गरिबांच्या रक्षणासाठी संघटन) बनवले ज्यांनी दलितांना शाळेत प्रवेश मिळण्यासाठी सरकारला निवेदने दिले. त्यामुळे 1907 मध्ये ब्रिटिश सरकारने म्हणायला दलितांना शाळांमध्ये प्रवेशाचा अधिकार दिला पण ब्राह्मणवाद्यांनी हा अधिकार वास्तवात मिळू दिला नाही. अय्यंकालींनी पंचमी नावाच्या एका दलित मुलीचा दाखला एका सरकारी शाळेमध्ये करण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या उत्तरामध्ये ब्राह्मणवाद्यांनी दलितांवर हिंस्त्र हल्ले केले आणि ऊरुट्टमबलम मध्ये एका शाळेला जाळून टाकले. यामुळेच अय्यंकालींनी त्यांचा मोर्चा ब्राह्मणवाद्यांविरोधात आणि त्यांना बळ देणाऱ्या सामंती संपत्ती-संबंधांविरोधात वळवला. त्यांनी ब्राह्मणवाद्यांना म्हटले “जर तुम्ही आमच्या मुलांना शिकू दिले नाही तर तुमच्या शेतात गवत उगवेल”. अय्यंकालींनी संपूर्ण केरळमधील दलित शेतमजुरांना एकजूट करवून संप घडवून आणला आणि ब्राह्मणवादी सामंतवर्गाचे नाक दाबले. आर्थिक नाकेबंदी केल्यामुळे सामंतवर्गाला, ब्राह्मणवाद्यांना झुकावे लागले आणि दलितांना शाळेत शिकण्याचा अधिकार मिळाला.

### स्त्रियांचे शरीर झाकण्याचा लढा

केरळच्या समाजात ब्राह्मणवाद्यांनी दलितांवर पोषाखाची सक्ती केली होती. त्यांना फक्त गुडघ्यापासून कमरेपर्यंत अंग झाकता येत होते. त्यांना साधा पोशाख घालण्यास बंदी होती. पोशाख थोडा जरी वेगळा घातला तर झाडाला बांधून फटके देण्यात येत. स्त्रियांना सुद्धा शरीराचा वरचा भाग झाकण्यास बंदी होती. नादर लोकांना हा अधिकार 1917 पर्यंत त्यांच्या आंदोलनाने मिळाला होता पण पुलयारांना हा अधिकार मिळायला 1915 उजाडले. अय्यंकालींनी कोल्लम येथे 1915 साली एक सभा बोलावली आणि कल्लूमळा (गळ्यातील माळ) आंदोलन छेडले. त्यांनी सभेमध्ये जमा झालेल्या हजारो महिलांना आवाहन केले की गळ्यातील अपमानजनक दगडांच्या माळा झुगारून द्या आणि या आंदोलनाच्या परिणामी पोशाखाच्या अपमानजनक बंधनांपासून मुक्ती मिळवली.

### अय्यंकालींपासून आजच्या जातीअंताच्या चळवळीने काय शिकले पाहिजे?

अय्यंकालींनी लढलेल्या सर्व आंदोलनातून हे स्पष्टपणे दिसून येते की अय्यंकालीं मुख्यत: एक सामाजिक, राजकीय क्रांतिकारी होते. अय्यंकालींपासून आजच्या जातीअंताच्या चळवळीला शिकण्यासारखे बरेच काही आहे.

पान 5 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित